# ध्वनी प्रदुषण

## विषय :- सण, उत्सव मिरवणुकीत वापरण्यात येणा-या डॉल्बी यंत्रणेबाबत.

## कायदा, नियम व नियमावली व कार्यप्रणाली

प्रामुख्याने सण उत्सव मिरवणुक मध्ये ध्वनीवर्धक (लाऊड स्पिकर्स) वापरण्याचा प्रघात असल्याने उत्सव मंडळे ही विविध प्रकारचे अत्याधुनिक साधन सामुग्रीचे ध्वनीवर्धक मंडळाचे ठिकाणी व मिरवणुकीचे वेळी ध्वनीचे प्रमाणामध्ये क्षेपण करणे ऐवजी अवास्तव ध्वनीचे क्षेपण करित असल्याने सर्वसामान्य जनतेच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर अनिष्ठ परिणाम होतात. त्याकरिता वातावरणामध्ये योग्य ते ध्वनीचे प्रमाण ठेवणे आवश्यक आहे. सदर बाबत पोलीस ठाण्याद्धारे फौजदारी दंड प्रक्रिया कलम १४९ प्रमाणे नोटीस, आचारसंहिता, चेकलिस्ट तसेच आवाहन सर्व मंडळाना आदा करणे आवश्यक आहे.

## कार्यप्रणाली

उपरोक्त विषय व संदर्भास अनुसरुन सविनय सादर करण्यात येते की, पर्यावरण संरक्षण कायदा सन १९८६ त्यास अधीन ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) २००० या कायदयाखाली **पोलीस खात्याला पोलीस स्टेशनला गुन्हा दाखल करता येत नाही.** त्या संदर्भातील कारवाईची पध्दत शासनाने विहीत केली आहे. ती खालीलप्रमाणे -

**ध्वनी प्रदुषण (नियम व नियंत्रण ) नियम २००० च्या तरतुदीखाली करावयाच्या कारवाईबाबतची पध्दत.**

---

ध्वनी प्रदुषण ( नियमन व नियंत्रण ) नियम २००० या पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या तरतुदींना अनुसरुन करण्यात आलेल्या आहेत. त्यामुळे या कायदयाखाली कायद्यांचे उल्लंघन करणा-या व्यक्तींविरुध्द करावयाच्या कार्य पध्दतीत खूप फरक आहे. आपण नेहमी कॉग्नीझेबल गुन्हयांची तक्रार झाली असता पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद करुन त्याचा तपास करुन योग्य त्या न्यायालयात दोषारोपपत्र पाठवितो. परंतु ध्वनी प्रदुषण नियम २००० या प्रकरणी कारवाई करताना पोलीस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करुन त्याचा तपास झाल्यावर न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करता येत नाही. या कायदयाचा अभ्यास केला असता या प्रकरणी खालील प्रमाणे कार्यवाही करणे जरुरीचे आहे.

१) पोलीस ठाण्याचे हद्दीतील शांतता क्षेत्राची माहिति घेवून सदर भागातील ध्वनीमापक संयंत्राव्दारे ध्वनीचे कंट्रोल नमुने घ्यावेत. त्याबाबत पंचनामा व ठाणे दैनंदिनीमध्ये नोंद घ्यावी. ( शांतता क्षेत्र, मिरवणुकीचा मार्ग, महत्वाची ठिकाणे )

२) एखादया ठिकाणी ध्वनी प्रदुषण होवून आजुबाजूच्या लोकांना व सर्व सामान्य जनतेस त्रास होत आहे. अशी तक्रार आल्यास ती लिहून घ्यावी. व स्टेशन डायरीला नोंद करुन या तक्रारीचा खरे खोटेपणा पाहण्यासाठी घटनास्थळी जावे.

CamScanner

३) घटनास्थळी जाणेपूर्वी पोलीस स्टेशनमध्ये दोन सुशिक्षीत व्यक्तीना बोलावून त्यांना घटनेविषयी पूर्ण कल्पना देवून ध्वनी प्रदूषण मोजण्याचे जे उपकरण आहे त्या उपकरणाची कार्यरिती समजावून देवून त्या दोन व्यक्तीना पंच म्हणून बरोबर न्यावे.

४) घटनास्थळी गेल्यावर दोन पंचाच्या समक्ष ध्वनीची तिव्रता मोजण्याचा उपकरणाच्या सहाय्याने घटनास्थळी ध्वनीची तिव्रता किती आहे. याची नोंद करावी. ध्वनी तिव्रता यंत्राने मोजलेल्या तिव्रतेची घटनास्थळीच यंत्रामधून ३ प्रिंट काढाव्यात. घटनास्थळी शक्य असलेस घटनास्थळाचे छायाचित्रण करावे. मोजलेली तिव्रता ही निवाशी क्षेत्रात ५५ डेसीबल व शांतता क्षेत्रात ५० डेसीबल या मानद मर्यादेपेक्षा १० डेसीबल पेक्षा अधिक असल्याचे आढळून आल्यास घटनास्थळी दिसते परिस्थीतीचा व ध्वनी तिव्रता किती आहे याची स्पष्ट नोंद करुन सविस्तर पंचनामा करावा. याचवेळी ध्वनीची तिव्रता मानद डेसीबल पेक्षा १० डेसीबलने जास्ती असल्यास घटनास्थळावरील ध्वनी प्रदूषण निर्माण करणारी सर्व उपकरणे पंचाच्या समक्ष पंचनाम्यानी जप्त करुन ताब्यात घ्यावीत. या पंचनाम्याची एक प्रत, ध्वनी तिव्रता यंत्राद्वारे काढलेल्या प्रिंटची एक प्रत मंडळाच्या अध्यक्षास अथवा जबाबदार व्यक्तीस देवून प्रत मिळाल्या बाबत मुळ पंचनाम्यावर त्यांची सही घ्यावी. संबंधीतानी पंचनामा व प्रिंट प्रत घेणेस नकार दिला तर त्याची नोंद पंचनाम्यावर करावी.

तसेच घटनास्थळी गेलेल्या अधिकारी, कर्मचारी व पंचाचे जबाब हे नमूना जबाब दिलेले प्रमाणे नोंद करावेत.

५) याचवेळी ध्वनीच्या तिव्रतेने म्हणजेच ध्वनी प्रदुषणाने होत असलेल्या त्रासाबाबत जवळ पासच्या लोकांचे जबाब नोंदवून घ्यावेत. जवळपास दवाखाने, शाळा, प्रार्थनास्थळे असल्यास तेथील व्यक्तींचे जाब-जबाब न विसरता नोंदवावेत.

६) घटनास्थळावरुन परत आल्यानंतर स्टेशन डायरीमध्ये घटनास्थळावरील घटनेची व तेथे जप्त करण्यात आलेल्या उपकरणाची नोंद करावी.

७) त्यानंतर घटनास्थळी जाणा-या पोलीस अधिका-याने आपल्या अहवालासोबत चौकशीचे सर्व कागदपत्र त्वरीत ध्वनी प्रदुषण नियम २००० च्या तरतुदीप्रमाणे निर्माण करण्यात आलेल्या प्राधीकरणाच्याकडे म्हणजेच मा.पोलीस अधीक्षक यांचेकडे पाठवून दयावेत.

८) संबंधीत पोलीस अधिका-यांनी सादर केलेल्या चौकशीचा अहवाल प्राधिकरणाकडे म्हणजेच मा.पोलीस अधीक्षक यांना प्राप्त झालेनंतर कागदपत्राचे अवलोकन करुन ज्या कोणी व्यक्तीनी ध्वनी प्रदुषण केले आहे. अशा उक्त व्यक्तींना प्राधिकरण नोटीस देवून स्वत:पुढे उपस्थित राहण्याची आणि पुढील कायदेशिर कार्यवाहीबाबतची माहिती देवून संबंधीत व्यक्तींला कारणे दाखवा नोटीस देतील. सदरची नोटीस मिळाल्यापासून संबंधीतांनी ६० दिवसाचे आत समक्ष स्वत: हजर राहून खुलासा सादर करणेचा आहे. प्राधिकरणाने दिलेल्या नोटीसीसंदर्भाने संबंधीतांनी मुदतीत खुलासा सादर न केल्यास संबंधीतांना काहीही खुलासा करावयाचा नाही असे समजून ध्वनी प्राधिकरण अधिकारी पुढील कायदेशिर कारवाई करेल याची जाणीव करुन देणेची आहे.

९) ध्वनी प्राधिकरण अधिकारी दिलेल्या नोटीसीनंतर संबंधीतांनी दिलेला खुलासा समाधानकारक न वाटल्यास तो अमान्य करुन पोलीस अधिकारी यांनी केलेल्या चौकशी अहवालाची कागदपत्रे तसेच खुलाशाची कागदपत्रे याची चौकशी करुन त्यात ध्वनी प्रदूषण करणारी व्यक्ती, संस्था, मंडळे हे दोषी असलेचे

CamScanner

आढळून आल्यास त्यांचेविरुध्द योग्य त्या सक्षम न्यायालयाकडे सी.आर.पी.सी.कलम २०० अन्वये फिर्याद दाखल करतील. सक्षम न्यायालय प्राधिकरणाने दाखल केलेल्या फिर्यादीची तपासणी करुन फिर्यादीची दखल घेवून त्यामध्ये नमुद असलेल्या आरोपींविरुध्द सी.आर.पी.सी.कलम २०४ नुसार इश्यु प्रोसेसचा आदेश जारी करतील. सदरची फिर्याद ही पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ कलम १५ व १९ द्वारे दाखल केली जाते.

शासनाने निर्देशित केलेल्या वरील सुचनांप्रमाणे सक्षम न्यायालयात फिर्याद दाखल करण्याचे अधिकार पोलीस खात्याला आहेत. पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्याचे अधिकार पोलीस खात्याला नाहीत.

**टिप-** ध्वनीची तिव्रता मोजण्याकामी बिनतारी संदेश कक्षातील तज्ञ यांत्रिकाची नेमणुक करावी

**सोबत :-**

१) ध्वनी प्रदुषण नियंत्रण व नियमन कायदा २००० संदर्भातील नियमावली, परिपत्रके.
२) ध्वनी प्रदुषण मोजमापाच्या व त्या संदर्भाने करावयाच्या आदर्श पंचनाम्याचा नमुना.
३) ध्वनी संयत्र वितरक यांना दयावयाच्या नोटीसीचा मसुदा.
४) नोटीसीचा मसुदा. - २
५) ध्वनी प्रदुषणाची तांत्रीक चाचणी घेतलेल्या पोलीस अधिकारी / कर्मचारी यांच्या जबाबाचा नमूना.
६) संबंधीत पो.स्टे च्या कारवाई केलेल्या अधिकारी यांनी ध्वनी प्रधिसकरण अधिकारी यांना सादर करण्याच्या रिपोर्टचा नमूना.

**माहिती अवलोकनासाठी -**

१. पर्यावरण (संरक्षण)अधिनियम,१९८६(१७)
२. शासन निर्णय क्रमांक ध्वनीप्र/२०००/प्र.क्र.-२४/ता.क३/ पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई दिनांक १५/०८/२००० (पर्यावरण वनमंत्रालय यांचे दिनांक १४/०२/२००० ची आधिसुचना)
३. मा.सर्वोच्च न्यायालयाचे निकालपत्रक
४. क्रमांक ध्वनीप्र/२०००/प्र.क्र.-२४/ता.क .३/ पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई दिनांक ०७/०४/२००३.
५. शासन निर्णय प्रत

CamScanner

# बिनतारी संदेश

क्रमांक २२ सीआर/ध्वनी प्रदूषण /           /२०--                                          दि.   .--.-----

**विषय :- डॉल्बी सिस्टिम पुरवणारे मालक/चालकांचे माहिती बाबत.**

---०००---

दिनांक ००.००.०००० ते ००.००.०००० या दरम्यान गणेशोत्सव साजरा होत आहे. गणेशोत्सवा दरम्यान विशेषत: विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी साऊंड सिस्टीमच्या वापरामुळे होणा-या ध्वनी प्रदुषण, सामाजिक सुरक्षिततेच्या व पर्यावरणाच्या दृष्टीकोणातून तसेच पर्यावरण संरक्षण कायदा सन १९८६ त्यास अधिन ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) २००० या कायदया अन्वये योग्य नाही. तसेच गणेशोत्सव दरम्यान कायदयाने बंदी घातलेल्या डॉल्बी साऊंड सिस्टीमचा कोणत्या प्रकारे वापर कायदेशीर वा अनुज्ञेय नाही.

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांना आदेशीत करण्यात येते की, आपआपल्या पोलीस ठाणे हददीत गोपनीय अंमलदार नेमून गतवर्षी स्थापन झालेल्या गणेशोत्सव मंडळाना तसेच चालु वर्षी भाडोत्री पुरविणारे डॉल्बी साऊंड सिस्टिम चालक व मालक यांचे संपूर्ण नांव व पत्ता, टेलिफोन नंबर, मोबाईल नंबर, कार्यालयाचा पत्ता इत्यादी माहिती प्राप्त करुन त्यांची यादी तयार करुन वाचक शाखेमध्ये दिनांक ००.००.०००० रोजी पर्यत बिनचूक पणे पाठविण्यात यावी.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी यांनी वैयक्तीक लक्ष पुरवून नमुद माहिती वेळेत पोहचेल याची दक्षता घ्यावी.

प्रति,

सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी.

CS CamScanner

# बिनतारी संदेश

क्रमांक २२ सीआर/ध्वनी प्रदूषण /            /२०--                                दि.   ००.००.००००

**विषय :-** ध्वनी प्रदूषणामुळे होणारे परिणाम बाबत.

----०००----

दिनांक ००.००.०००० ते ००.००.०००० या दरम्यान ------ उत्सव साजरा होत आहे. या उत्सवाचे दरम्यान विशेषत: विसर्जन मिरवणुकीत डॉल्बी साऊंड सिस्टीमच्या वापरामुळे होणा-या ध्वनी प्रदुषण, सामाजिक सुरक्षिततेच्या व पर्यावरणाच्या दृष्टीकोणातून तसेच पर्यावरण संरक्षण कायदा सन १९८६ त्यास अधिन ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) २००० या कायदया अन्वये योग्य नाही. तसेच गणेशोत्सव दरम्यान कायदयाने बंदी घातलेल्या डॉल्बी साऊंड सिस्टीमचा कोणत्या प्रकारे वापर कायदेशीर वा अनुज्ञेय नाही.

उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी आपले विभागातील पोलीस स्टेशन हददीतील कान, हृदयरोग, रक्तदाब, पोटविकार, बालरोग, मनोविकार, न्यूरोसर्जन, यावरील तज्ञ डॉक्टर तसेच जेष्ठ नागरीक यांचेशी स्वत: संपर्क साधून डॉल्बी सिस्टिमचा वापरामुळे होणारे ध्वनी प्रदुषण,सामाजिक स्वास्थ्यावरील व पर्यावरणावरील होणारे दृष्ट परिणामाबाबत त्यांचे अभिप्राय व लेख घेवून ते वाचक शाखेत दिनांक ००.००.०००० रोजी पर्यंत बिनचूक पणे सादर करावेत.

प्रति,

सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी.

CamScanner

**फौजदार दंड प्रक्रिया संहिता कलम १४९** जावक क्र. /२०

--------------पोलीस ठाणे

----------,दि. / /२०

प्रति,

**अध्यक्ष,**

---------------------

---------------------

---------------------

दिनांक ते या दरम्यान ----- उत्सव साजरा होत आहे. गतवर्षीचे ------ उत्सवात ---- ------ मिरवणुकी दरम्यान आपण डॉल्बी साऊंड सिस्टीमचा वापर केल्यामुळे आपणाविरुध्द मुंबई पोलीस कायदा १९५१ अन्वये कारवाई करण्यात आली होती.

गतवर्षी साज-या झालेल्या ----------- उत्सवापुर्वी डॉल्बी साऊंड सिस्टीमचा वापर न करण्याबाबत अनेक बैठका दरम्यान व परवाना देतेवेळी आपणास लिखीतपणे सुचीत करुनही आपण डॉल्बी साऊंड सिस्टीमचा वापर केला होता. सदरवेळी आपण डॉल्बी साऊंड सिस्टीमची ऑर्डर अगोदरच दिली असल्याने ऐनवेळी ती रदद करणे शक्य नाही, पुढील वर्षापासून लवकर प्रयत्न करा, आम्ही प्रतिसाद देवु असे आश्वासित केले होते.

---------- उत्सवादरम्यान विशेषत: ---------- मिरवणुकीत होणारी महीला, मुली व बालाकांची गर्दी, डॉल्बी साऊंड सिस्टीमच्या वापरामुळे होणारे ध्वनी प्रदुषण व त्याचा मिरवणुकीतील व मिरवणुक मार्गावरी ल रहिवाशांना होणारा त्रास या पार्श्वभुमीवर डॉल्बी साऊंड सिस्टीमचा वापर सामाजिक सुरक्षिततेच्या व पर्यावरणाच्या दृष्टीकोनातुन योग्य नाही.

दिनांक रोजी या ठिकाणी बैठक घेवुन मागील वर्षी डॉल्बी साऊंड सिस्टीमचा वापर केलेल्या ---------- मंडळाना यावर्षी-------उत्सवादरम्यान डॉल्बी सिस्टीमचा वापर न करण्यातबाबत सूचना दिल्या आहेत.

आपणास सुचीत करणेत येते की, पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व त्यास आधीन ध्वनी प्रदुषण ( नियमन व नियंत्रण) नियम २००० चे अन्वये कलम १५ व १९ नुसार कायदेशिर कार्यवाही केली जाते. सदर कलमान्वये सार्वजनिक ठिकाणी ध्वनीक्षेपणाचा वापर करणेवर निर्बंध घातले असुन त्याचे उल्लंघन केल्यास ५ वर्षापर्यंत कारावासाची शिक्षा अथवा १,००,०००/- रुपये पर्यंत दंड किंवा दोन्हीही शिक्षा होवु शकतात. तसेच नोटीस मिळालेपासून कायदयाचे उल्लंघन चालूच ठेवल्यास प्रत्येक दिवशी ५,०००/- रुपये दंडाची तरतूद कायदयामध्ये नमूद आहे.

-----------उत्सव दरम्यान कायदयाने बंदी घातलेल्या डॉल्बीसाऊड सिस्टीमचा कोणत्याही प्रकारे वापर कायदेशीर वा अनुज्ञेय नाही. सदर डॉल्बी साऊड सिस्टीमचे वापराचा सामाजीक स्वास्थावरील व पर्यावर्णावरील परिणाम लक्षात घेवून आपण ---------- शहरात कोणत्याही ----------उत्सवमंडळास डॉल्बी साऊड सिस्टीम पुरवू नये.

आपणाकडून पुरविलेल्या डॉल्बी साऊड सिस्टीमचा --------- मंडळाकडून ----------उत्सव दरम्यान वापर झाल्यास आपणाविरुध्द वरील नमुद कायदेशीर तरतुदीस अनुसरुन कारवाई केली जाईल याची विशेष गांभीर्याने नोंद घ्यावी.

--------उत्सवादरम्यान आपण कोणत्याही प्रकाराच्या डॉल्बी साऊंड सिस्टीमचा वापर केल्यास आपणाविरुध्द वरील कायदेशिर तरतूदीस अनुसरुन कारवाई केली जाईल याची विशेष गांभिर्याने नोंद घ्यावी.

पोलीस निरीक्षक,

------------ पोलीस ठाणे, जिल्हा-

CS CamScanner

पंचनामा ( कंट्रोल सॅम्पल ) ता. --/--/२०--.

पंच १.------------------------------------------------------------------------------------------

२.------------------------------------------------------------------------------------------

मी-----------------------------------------------------------पो.हवा.------------

पो.ना.--------------- --पो.शि. ----------------------- वरील नमुद पंचाना ------------------ -------------- आम्ही ------ पोलीस ठाणे, -------- येथे बोलावले त्यावरुन ते हजर झाले आम्ही पंचाना कळविले की, ----------------या ठिकाणी ध्वनी प्रदुषण होते अगर कसे याबाबत पडताळणी करणेची असलेने आपण पंच म्हणून समक्ष हजर राहून दिसते वस्तुस्थितीचे परिस्थितीचा पंचनामा करणेबाबत कळविले. त्यानुसार ते पंच म्हणुन उपस्थित राहीले. आम्ही पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व त्यास आधीन ध्वनी प्रदुषण ( नियमन व नियंत्रण) नियम २००० चे अन्वये कलम १५ व १९ नुसार कायदेशीर कार्यवाही व क्षेत्र/झोन प्रवर्ग अन्वये दिवसा व रात्री असलेली आवाजाच्या संबंधातील सभोवताच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा डेबि (ए) एल ईक्यु प्रमाणे केली जाते. याबाबत थोडक्यात माहिती दिली व आम्ही आमचे ताब्यात असलेले ध्वनीमापक सयंत्र दर्शविले व ते पंचा समक्ष चालू करुन सदरचे यंत्र कार्यपध्दती व त्याचा उपयोग, वापर व हाताळणी बाबत थोडक्यात माहिती दिली व पुर्णपणे प्रात्यक्षित दाखविले त्याप्रमाणे सदरचे ध्वनीमापक सयंत्र योग्य रित्या कार्यरत असल्याची खात्री केली.

------------------- याठिकाणी सध्याचे आवाजाची तिव्रता (ध्वनी) किती आहे हे आम्ही सन -------मधील सार्वजनिक -------उत्सव --------मिरवणुकांचे पार्श्वभुमीवर डेसीबल मोजमाप मशीनद्वारे चेक करीत आहोत. सदर वेळी आपण समक्ष पंच म्हणुन हजर राहा वगैरे कळविले, त्यास पंचानी सहमती दर्शविल्यानंतर आम्ही पंचनामा केला तो खालीलप्रमाणे-

सदरवेळी कोणताही ध्वनीक्षेपक नजरचे टप्यात नाही.

आम्ही स्वत: सोबतचे स्टाफसह व पंचाचे उपस्थितीत ---------------------------------------- -------------- या चौकामध्ये ध्वनीप्रदुषण चेक करण्याकरिता आवाजाची तिव्रता डेसीबल ( मशीन) गनद्वारे चेक केले असता सदर मशीनचे स्क्रिनवर----------डेसीबल असल्याचे दिसून आले. त्याची एक प्रिंट काढून सदर प्रिंट आम्ही व पंचानी वाचून पाहिली. त्यावर रिर्डींग-------------असे असल्याचे आम्ही पाहून सांगतो. सदर प्रिंटवर आमची सही करुन पंचाच्या स्वाक्ष-या घेण्यात आल्या. सदर मशीन ही - ---------------कंपनीची असून तिचा सिरीयल क्रमांक ---------------- असा आहे.

हा. पंचनामा ------------------ वा सुरु करुन ------------------ वा पुर्ण केला आहे.

हा पंचनामा केला स ता म

पोलीस उप निरीक्षक,
------ पोलीस ठाणे, ----.

सदरचा पंचनामा आम्ही पंचानी वाचून पाहिला असून तो आमचे उपस्थितीत केला असून तो बरोबर असल्याची खात्री करुन आम्ही सहया करीत आहोत.

पंच १.--------------------------------

२.--------------------------------

CS CamScanner

## घटनास्थळाचा नमुना पंचनामा

पंचनामा दिनांक - / /२०

पंच नबर १

पंच नबर २

आज रोजी आम्हां वर नावे नमुद करुन दिले पंचास आपण स.पो.नि/पोउनि -------------- पो.ह.--------, पो.ना.---------पो.शि. यांनी ----------- पोलीस ठाणे येथे बोलावलेवरुन हजर झालो व तेथे --------------- पोलीस ठाणेत आम्हा पंचाना कळविले की, ----------------या ठिकाणी ध्वनी प्रदुषण होते अगर कसे याबाबत पडताळणी करणेची असलेने आपण पंच म्हणून समक्ष हजर राहून दिसते वस्तुस्थितीचे परिस्थितीचा पंचनामा लिहून देणेस कळविले त्यानुसार आम्ही पंच म्हणुन उपस्थित राहीलो. पोलीसांनी पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ व त्यास आधीन ध्वनी प्रदुषण ( नियमन व नियंत्रण) नियम २००० चे अन्वये कलम १५ व १९ नुसार कायदेशिर कार्यवाही व क्षेत्र/झोन प्रवर्ग अन्वये दिवसा व रात्री असलेली आवाजाच्या संबंधातील सभेवताच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा डेबि (ए) एल ईक्यु प्रमाणे केली जाते. याबाबत थोडक्यात माहिती दिली व पोलीसांनी त्यांचे ताब्यात असलेले ध्वनीमापक सयंत्र दर्शविले व ते आमचे पंचासमक्ष चालू करुन सदरचे यंत्र कार्यपध्दती व त्याचा उपयोग, वापर व हाताळणी बाबत थोडक्यात माहिती दिली व पुर्णपणे प्रात्यक्षित दाखविले त्याप्रमाणे सदरचे ध्वनीमापक सयंत्र योग्य रित्या कार्यरत असल्याची खात्री केली. त्याप्रमाणे पोलीसांनी स.पो.नि/पोउनि ----------------- यांचे आदेशानुसार ठाणे अंमलदार -------------- यांनी -------------- पोलीस ठाणेतील ठाणे डायरी मध्ये नोंद क्र------------- वेळ --------------- येथे नोंद घेतली त्यानंतर आम्ही व पोलीस स्टाफ अधिकारी, कर्मचारी, पंच ----------------- सदर ठिकाणी मोजणीसाठी लागणारी ध्वनी तिव्रती मोजणी यंत्रे (db (A)) यंत्रावर मोजलेल्या चाचणीची प्रत काढणेकरीता प्रिंटर --------------------जिल्हा - -- येथे सरकारी वाहनाने हजर झालो व सदर ठिकाणी दिसते वस्तुस्थितीचा पंचनामा लिहून देणेस कळविलेने लिहून देतो पंचनामा असा की,

आता आमच्या समक्ष ------------------ मोठया ध्वनी क्षेपण यंत्राचा वापर सुरु असुन, सदर ठिकाण ---------------------------- ठिकाणी असुन डॉल्बीच्या आवाजावर बेधुंद स्थितीत नाचत आहेत.

सदर ठिकाणी -------------- ध्वनी प्रदुषण करणारे हे ------------------ असल्याचे चौकशीत समजुन आले. तेथे ट्रॅक्टर नंबर ------------------- व त्यास जोडलेली टॉली नंबर -------------- या वाहनावर ध्वनी क्षेपक ----------------- स्टेरिओ बॉक्स बसविले आहेत. त्याचा आवाज मोठा कर्कश आहे. त्या आजुबाजुचे लोकांना व सर्वसामान्य लोकांना होत आहे. म्हणून आम्ही त्यांना आवाज कमी करणेस त्यांना सांगितले असता त्यास त्यांनी नकार दिलेने सदर होणा-या आवाजाची ध्वनी तिव्रता यंत्राद्वारे मोजत आहे. तशी तोडी सुचना त्यांना दिली. त्या आवाजाची तिव्रता मोजणे बाबत समक्ष ध्वनी तिव्रता मोजनी यंत्र ऑपरेटर ------------------ यांना सांगण्यात आले. त्यांनी ध्वनी तिव्रता मोजणी यंत्राचा वापर करुन ध्वनी तिव्रता मोजली व जागीच

CS CamScanner

त्याबाबतचा अहवाल ध्वनी प्रक्षेपणाच्या मर्यादेपेक्षा व निवासी क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आहे. त्या रिपोर्टवर पंचनामा करणारे अधिकारी व आम्ही पंचानी --------------- वापरलेले वाहन ही माहिती लिहुन सहया केलेल्या आहेत.

------------------या ठिकाणी ध्वनी प्रदुषणासाठी वापरलेले ध्वनी क्षेपक स्टेरिओ बॉक्स वापरलेले वाहन व इतर साहित्य जप्त केल्यास प्रचंड जनसमुदाय असल्याने कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने पंचनामा करतेवेळी नमुद साहित्य या वेळी जप्त करण्यात आलेले नाही. ध्वनी तीव्रता मोजणी यंत्राद्वारे मोजणी झालेनंतर त्या डेसिबल रिपोर्ट प्रिन्टची प्रत ------------------ देवू करीत असताना ती त्यांनी घेण्यास नाकारली. तसेच मुळ कामात सामील करण्यात येणा-या डेसिबल रिपोर्ट प्रिंटवर देखील सही करणेस नकार दिला. सदर रिपोर्टची प्रिंट मुळ कामात पंचनाम्यासोबत समाविष्ठ केली. व पंचनाम्या नुसार काढलेल्या रिपोर्टवर सही करण्यासही --------------------- नकार दिला

सदरचे ठिकाण हे ---------------- चर्तुसीमे ---------------- येथे असून सदर ठिकाण -------------- परिसर हा नागरी वस्तीचा व लोकांनी गजबजलेला आहे.

पंचनामा आम्हा पंचानी समक्ष हजर राहून दिसते वस्तुस्थितीचे दिसते परिस्थितीप्रमाणे तो आम्ही वाचुन या पंचनाम्यावर सहया करण्यात येत आहेत.

पंचनामा ------------- वा सुरु करुन ---------------- वा पुरा करणेत आला.

समक्ष पंच

अधिकारी यांचे नांवे १.

नेमणूक ठिकाण २.

**टिप :- सदरचा पंचनामा हा नमुना पंचनामा आहे. प्रत्यक्ष कारवाई करणा-या अधिका-यांनी घटना व घटनास्थळानुसार आवश्यक ती माहिती नमुद करावी.**

CS CamScanner

## पोलीस अधिकारी व कर्मचारी

जबाब                    दिनांक -  --/--/२०--

श्री.--------------------------------वय-- वर्षे, काम-----, रा.ठी.----------------------------------
-----------------------------------------------------------------------------------जिल्हा------.

-*-

मी वरील प्रमाणे असून दिल्या पत्यावर माझे कुटुंबियासमवेत राहतो. मी पोलीस दलामध्ये सन------ला भरती झालो बसून सद्या-------------पोलीस ठाणे येथे-----------या पदावर कार्यरत आहे.

-------शहरात ------या सणाचे कालावधीत मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा (डॉल्बी) चा वापर केला जाणार आहे याची पोलीस खात्यास माहिती मिळाल्याने कोणीही अशाप्रकारे ध्वनी प्रदूषण करु नये म्हणून सन ------मध्ये साजरा होणा-या या सणाचे कालावधीपूर्वीच ---------मंडळांनी -----------स्थापना करणेसाठी तसेच ------------मिरवणूकीमध्ये सहभागी होण्याकरीता पोलीस दलाकडे परवानगीची मागणी केली होती. शहरातील सर्व --------मंडळांना परवानगी देतेवेळी त्यांचेकडून विहित नमुन्यातील परवानगी अर्ज ------मंडळाचे नांव, जबाबदार पदाधिका-यांची नांवे, पत्ते, या माहितीसह भरुन घेवून त्याचप्रमाणे सदर देण्यात येणारी परवानगी एकूण --- अटी व बंधनांचे पालन करण्याच्या शर्तीवरच मंडळाना परवानगी देण्यात आली होती. मंडळांवर घालण्यात आलेल्या अटी व बंधनामध्ये ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण ) नियम २००० चा भंग होणार नाही त्याचप्रमाणे रात्री --.--वा. ते सकाळी --.-- वा.पर्यत कोणत्याही प्रकारच्या ध्वनीक्षेपण यंत्रणेचा वापर करणार नाही तसेच मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा वापर करणार नाही या प्रमुख अटीची जाणीव करुन देवूनच मंडळांना परवानगी देण्यात आली होती.

सन ---------- मध्ये दिनांक ००.००.०००० ते००.००.०००० या कालावधीमध्ये हा सण साजरा होणार असल्याने या मुदतीत कोणीही ध्वनी प्रदूषण करु नये व केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करता यावी म्हणून आम्ही -------येथे ध्वनी प्रदूषण तपासणी व कार्यवाही साठी पथके स्थापन केली होती. या पथकामध्ये पथक प्रमुख ---------------- यांची नेमणूक करण्यात आली होती त्यांचे मदतीस मी, ----------------, ध्वनी प्रक्षेपण तिव्रता मोजणे करीता बिनतारी संदेश विभागाकडील --- कर्मचारी ध्वनी तिव्रता मोजण्याचे यंत्रणेसह व मदतीस प्रत्येक पथकामध्ये एकुण ---------पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती.

या सणाचे काळात मंडळानी ध्वनी प्रदूषण करु नये याकरीता वर्तमानपत्र तसेच वेळोवेळी मंडळाच्या बैठका घेवून ध्वनी प्रदूषण टाळावे याबाबत आवाहन करण्यात आले होते. पोलीस खात्याने केलेल्या आवाहानास ब-याच मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. असे असताना देखील दिनांक --.--.---- रोजी --------- रोडवर ----------- तरुण मंडळ,-----जिल्हा. मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा वापर करुन ध्वनी प्रदूषण करीत आहे याची माहिती ----------- पोलीस ठाणे यांना मिळाल्याने त्यांनी सदरची माहिती ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक पथक यांना कळविल्याने सदर पथक ---------- पोलीस स्टेशन येथे दाखल झाले. दोन पंचाना बोलावून घेतले. व आलेली तक्रार ही खरी आहे किंवा खोटी आहे याची खात्री करणेस घटनास्थळी रवाना होणेपूर्वी सोबत घेतलेल्या पंचाना करण्यात येणा-या कारवाई विषयी माहिती दिली. तसेच ध्वनी प्रदूषण मोजण्याचे जे उपकरण आहे त्या उपकरणाची कार्यरिती देखील समजावून सांगितली व त्यानंतर स्टेशन ठाणे डायरी क्रमांक -------- ला नोंद करुन तक्रारीनुसार

CS CamScanner

मिळालेल्या घटनास्थळी पंचासह रवाना झालो. पथक घटनास्थळी पोहचल्यानंतर त्यांना --------------तरुण मंडळ, ----, जिल्हा ---- हे एकूण -----(स्पिकर) मोठया क्षमतेच्या स्पीकरचा वापर करुन मोठया प्रमाणात ध्वनी प्रक्षेपण करुन ध्वनी प्रदूषण करीत असल्याचे आढळून आले. मंडळ वापरत असलेली ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा ही ट्रॅक्टर नंबर--------व ट्रॉली नंबर---------वर ठेवण्यात आली होती.

----------तरुण मंडळ, -----,जिल्हा------ हे ध्वनी प्रदूषण करीत होते म्हणून पथक प्रमुखानी मंडळाच्या जबाबदार पदाधिका-यांची समक्ष भेट घेवून ध्वनी प्रदूषण करण्यास कायदयाने बंदी आहे आपण ध्वनी प्रदूषण करीत आहात तरी तात्काळ आपण करत असलेले बेकायदेशीर कृत्य त्वरीत थांबवावे याबाबत संबंधीतांना समज देण्याचा प्रयत्न केला. तथापी ------------------- तरुण मंडळ, -----,जिल्हा.-- --व त्यांच्या पदाधिका-यांनी पथक प्रमुखांनी केलेल्या विनंतीचा अव्हेर करुन ध्वनी प्रदूषणाचे कृत्य चालूच ठेवल्याने पथक प्रमुखांनी आपण करत असलेल्या ध्वनी प्रदूषणाचे शास्त्रीय दृष्टया मोजणी करीत आहोत याबाबत सुचना दिली व त्याप्रमाणे घटनास्थळी बिनतारी संदेश विभागाकडील कर्मचारी यांनी त्यांचेकडे असलेल्या ध्वनी तिव्रता यंत्राचे मदतीने ध्वनी तिव्रता मोजून त्यांच्या घटनास्थळीच यंत्राद्वारे तीन प्रती काढण्यात आल्या. मोजलेली तिव्रता ही कायदयाने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा --------- इतकी जास्त होती. ------------ मंडळ ध्वनी प्रदूषण करीत असले बाबत घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा करण्यात आला त्याचबरोबर घटनास्थळाचे छायाचित्रण करण्यात आले. पथक प्रमुखांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत व ध्वनी तिव्रता यंत्राने मोजलेल्या प्रिंटची प्रत -------- मंडळाच्या जबाबदार व्यक्तीस देण्याचा प्रयत्न केला. परंतु -------- मंडळाच्या अध्यक्ष/पदाधिकारी----------------रा.ठी.------------ यांनी पंचनामा व प्रिंटची प्रत स्वीकारण्यास नकार दिला. तसेच मुळ पंचनाम्यावर सही करणेचे देखील नाकारले म्हणून त्याबाबतची नोंद मुळ पंचनाम्यावर घेण्यात आली आहे./ पंचनाम्यावर स्वाक्षरी केली ------- मंडळ, -----,जिल्हा --. हे ----- -------तील प्रमुख मार्गावर मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा वापर ध्वनी प्रदूषणासाठी करीत होते. सदर ठिकाणी नागरीकांची ब-याच मोठया प्रमाणात गर्दी जमली होती. घटनास्थळी होत असलेल्या ध्वनी प्रदूषणामुळे रस्त्यावर जमलेल्या नागरीकांना व घटनास्थळांच्या जवळपास रहात असलेल्या नागरीकांना त्याचा त्रास जाणवत होता. परंतु ------- मंडळाचे पदाधिकारी हे पोलीसांच्या कोणत्याही सुचनेचे पालन करण्याच्या मनस्थितीत नव्हते. सदर प्रश्नी धार्मीक भावना जोडल्या असल्याने ध्वनी प्रदूषण करणारी यंत्रणा जप्त केलेस कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असता म्हणून ------ मंडळ, -----,जिल्हा-------. करीत असलेली ध्वनी प्रदूषण यंत्रणा जप्त करण्यात आलेली नाही.

पथक प्रमुखांनी कारवाई पूर्ण केलेनंतर पुन्हा ----------- पोलीस ठाणे येथे येवून ठाणे डायरी नोंद क्रमांक ------ येथे नोंद केली.

माझा जबाब मी वाचला तो बरोबर आहे.

समक्ष,

( )
सहा. पोलीस निरीक्षक/ पोलीस उपनिरीक्षक,
----------पोलीस ठाणे,-------

CamScanner

जबाब दि

मी

समक्ष विचारलेवरुन लिहून देतो जबाब असा की, मी वरील प्रमाणे काम करीत असून नमुद पत्यावर माझ्या कुटूंबासह राहणेस आहे. मी महाराष्ट्र पोलीस बिनतारी संदेश विभागात दिनांक ---------------- पासून -------------------------- म्हणून कार्यरत आहे. मी पासून -------------------------- कोल्हापूर जिल्हयात रेडिओ मॅकॅनिक म्हणून काम करीत आहे. तसेच माझ्याकडे नॉईज लेव्हल मिटर हे उपकरण हाताळण्याचे तांत्रीक ज्ञान व कौशल्या असल्याने ते उपकरण चालविण्याचे काम मी करतो.

दिनांक -----------------रोजी ------------ पोलीस ठाणेत जमलो तेथे ठाणा डायरीस नोंद ------------- वा करुन पोलीस स्टाफ पंच असे आम्ही जवळील ध्वनी तिव्रता मोजणी यंत्र व त्याचा प्रिंटर घेवून घटनास्थळाकडे रवाना झालो.

सदर आदेशाप्रमाणे मी बिनतारी संदेश विभागाकडील माझ्या ताब्यात दिलेले नॉईज लेव्हल चेकींग उपकरण चेक करुन पाहिले ते सुस्थितीत असल्याची माझी खात्री झाल्यानंतर नॉईज लेव्हल चेकीग उपकरणाची ------------------ यांच्या समक्ष दोन पंच, पोलीस स्टाफ याना सदर उपकरणाविषयी व चालविण्याच्या पध्दतीविषयी माहिती दिली घटनास्थळी -------------------- या ठिकाणी ध्वनी क्षेपण यंत्रण लावून ती ठेवलेल्या वाहनासमोर बेधुंदपणे नाचत होते. त्यावेळी मी ध्वनी क्षेपण यंत्रणे पासून १० ते १५ फुटावर थांबुन सदर ध्वनी क्षेपण यंत्राच्या आवाजाची तिव्रता ध्वनी मापक यंत्राने मोजली व जागीच त्याबाबतच्या रिपोर्टच्या प्रिंटा काढून आमच्या समवेत असलेले ------------------------ यांना दिल्या. सदर ध्वनी यंत्राच्या आवाजाची तिव्रता ---------------- डेसिबल आहे. आणि तो तपासणेत आलेला आवाज ध्वनी प्रदूषण नियमावीलत नमुद व निवासी क्षेत्रासाठी निश्चित केलेल्या मर्यादेपेक्षा जास्त आहे. आता मला आपण सदर ------------------ मी ध्वनी तिव्रता मोजणी यंत्राद्वारे प्रिंटर मधून काढून दिलेला ध्वनी तिव्रतेचा रिपोर्ट दाखविला. तो मीच दिलेला असून तो बरोबर आहे. त्या रिपोर्टमध्ये तारीख वेळ व सरासरी ध्वनी तिव्रता दाखविलेली आहे. त्याखाली ---------------- दोन पंच व माझी स्वाक्षरी आहे. रिपोर्टच्या पाठीमागे बाजुस ---------------------- नाव, वाहनाचे नंबर अशा नोदी केल्या असुन त्याखाली माझी, पंचाची, अधिका-यांची स्वाक्षरी आहे.

CamScanner

मी डयुटी करीत असताना कर्णकर्कश स्टेरिओ बॉक्सच्या आवाजामुळे आजुबाजूचे सर्व सामान्य नागरिकांना त्रास होत असलेचे मला दिसून आहे. मला स्वत:लाही मोठया आवाजाचे कंपनामुळे छातीत धडधडत होते. तसेच श्र्वासोश्र्वासासदेखील त्रास होता मी सुध्दा ध्वनी क्षेपन तिव्रता मोजणीचे काम कानात कापसाचे बोळे घालुन केले आहे.

माझा वरील जबाब मी वाचुन पाहिला तो मी सांगीतलेप्रमाणे तो बरोबर आहे.

समक्ष हा दिला जबाब स.ता.म.

पोलीस अधिका-यांचे नांव

नेमणुकीचे ठिकाण

टिप :- सदरचा जबाब हा नमुना जबाब आहे. प्रत्यक्ष कारवाई करणा-या अधिका-यांनी घटना व घटनास्थळानुसार आवश्यकता माहिति नमुद करावी.

CamScanner

## नमुना रिपोर्ट

मा. पोलीस निरीक्षक सो,

पोलीस ठाणे, याना सविनय सादर,

**प्रतिवदेक** :- रिपोर्ट देणा-या अधिका-याचे नांव,

नेमणूक ठिकाण याजकडून विनंती पुर्वक की,

**विषय :- ध्वनी प्रदुषण कायदयाचा भंग केले बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरुन सादर करतो की, -------------------- त्यात पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ च्या अंतर्भुत ध्वनी प्रदुषण तरतुदीनुसार ध्वनी प्रदुषण होते किंवा कसे त्यानुसार त्याचे सुधारीत (नियंत्रण व नियमन ) नियम २००० नुसार कारवाई करण्यासाठी --------------- हे मोठया क्षमतेच्या ध्वनी क्षेपण यंत्रणेचा वापर करत होते. त्यावेळी त्यांना ध्वनी क्षेपण यंत्रणेचा आवाज कमी करणेस सांगितला त्यास त्यांनी नकार दिला तेव्हा पुढील कायदेशीर कारवाई म्हणून ध्वनी प्रक्षेपण तिव्रतेची तांत्रीक तपासणी करत असलेबाबत तोडी सुचना दिली व लागलीच ध्वनी तिव्रतेची मोजणी करणारे ऑपरेटर ------------- यांना सोबत घेवून सदर ध्वनी क्षेपण यंत्राची ध्वनी मोजणी यंत्राद्वारे तपासणी केली असता मोजणी ध्वनी प्रक्षेपण तिव्रतेचा रिपोर्ट ------- आला. त्या रिपोर्टच्या प्रती काढल्या सदरचा रिपोर्ट ------ वाजताचा असून त्यामध्ये कायदेशिर तरतुदीनुसार आवश्यक माहीती नमुद आहे. सदरच्या काढले मोजणी रिपोर्टाची प्रत -------------देवू करता त्यांनी तो घेणेस ---------------------- नकार दिल. तसेच घटनास्थळी पंचनाम्यासह केलेल्या रिपोर्टाच्या प्रतिवर सही करण्यासही त्यांनी नकार दिला. त्यामुळे त्यांनी ------------------- ध्वनी प्रदुषण संदभ्रात सुचना देवूनही ध्वनी प्रदुषण कायदयातील तरतुदीचा भंग केला आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे.

| | |
|---|---|
| १. ध्वनी प्रदुषण कायदयाचे भंग करणा-या | :. |
| २. नांव व पत्ता | : |
| ३. ध्वनी प्रकार | : स्टेरिओ बॉक्स संख्या |
| ४. ध्वनी तीव्रता | : ------- डेसिबल |
| ५. ध्वनीक्षेपक ठेवलेल्या वाहनाचा प्रकार व नंबर | : ट्रॅक्टर नं.----------<br>टॉली नं.---------- |
| ६. ध्वनी प्रदुषण कायद्याचा भंग केले ठिकाण | : |
| ७. ध्वनी प्रदुषण कायद्याचा भंग केलेचे तारीख व वेळ | : दि. रोजी ------------- वा |

सोबत वरील घटनेचा पंचनामा व ध्वनी तिर्वता मापन यंत्राचा अहवाल जोडलेला आहे.

मा. सादर व्हावे

दिनांक

अधिका-याचे नांव नेमणूक ठिकाण.

टिप :- सदरचा रिपोर्ट हा नमुना रिपोर्ट आहे. प्रत्यक्ष कारवाई करणा-या अधिका-यांनी घटना व घटनास्थळानुसार आवश्यकती माहिती नमुद करणेची आहे.

CamScanner

# CERTIFICATE

## ( u/s 65 B (4) (b) of the Evidence Act 1872)

Certified that this electronic record output has been produced from ---------------( description of the system) ----------------- using -------------------------- ( description of the out put device) and that its contents are true reproduction of the original to the best of my knowledge and belief. Further certified that conditions as laid down in section u/s 65 B (4) (b) of the Evidence Act 1872 regarding the admissibility of device output in relation to the information and the device in question are fully satisfied in all aspects

These certicates are to be isssued by a person occupying a responsible position in relation to the operation of the relevant system or the management of the relevant activities, whichever is appropriate.

Place-

Date (Seal and Signature of Resposible person)

CamScanner

# कारणे दाखवा नोटीस

प्रति,

----------------------------------

----------------------------------

--------------------------------

मी--------- (सक्षम अधिकारी)--------------जिल्हा--------- या नोटीसीद्वारे आपणास कळवितो की, ध्वनी प्रदुषण ( नियंत्रण व नियमन ) नियम २००० मधील तरतुदीनूसार माझी ---------विभागासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून नियुक्ती झालेली आहे.

या नियमाचे तरतुदीनुसार मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार, मी आपणास कळवितो की, आपण -------------- तरूण मंडळाचे सदस्य आहात.----------हा उत्सव सार्वजनिकरित्या साजरा करण्यासाठी आपण ------------------------- पोलीस ठाण्याकडे लेखी परवाना मागितला होता. हा परवाना देताना आपणास संपुर्ण गणेशोत्सव काळात व गणेश विसर्जन मिरवणुकीचेवेळी ध्वनी प्रदुषण ( नियंत्रण व नियमन ) नियम २००० मधील तरतुदीस बाधा येणार नाही याबाबत लेखी सुचना देण्यात आल्या होत्या व आहेत.

या खेरीज आपणास लेखी सुचनेद्वारे देखील ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेच्या वापराबाबत असलेल्या निर्बंधाबाबत लेखी सुचना देण्यात आल्या होत्या व आहेत. असे असतानाही आपण दिनांक --/०९/२०१० रोजी --------------------------- या ठिकाणी आपल्या मंडळाच्या गणेश विसर्जनच्या मिरवणुकीत ध्वनी प्रदुषण ( नियंत्रण व नियमन ) नियम २००० च्या तरतुदींचे आपणाकडून जाणून बुजुन हेतूपुरस्कर उल्लंघन झालेबाबत माझेकडे ------------------------------------------यांचेकडून अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार आपण केलेल्या उल्लंघनाबाबत आपणाविरुध्द पुढील कायदेशिर कारवाई का करू नये. याबाबत ही नोटीस मिळालेपासून ६० दिवसांचे आत आमचे समक्ष आपण स्वत: हजर राहून खुलासा सादर करावा.

सोबत :- ध्वनी तिव्रता मोजनी रिपोर्ट प्रिंटची व घटनास्थळ पंचनाम्याची झेरॉक्स प्रत जोडली आहे.

उपरोक्त नोटीसबाबत आपण मुदतीत खुलासा सादर न केलेस आपणास काहीही खुलासा करावयाचा नाही असे समजून आपणाविरुध्द पुढील कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

दि.    /    /२०१०

(सक्षम अधिकारी )

CS CamScanner

# प्रथम खबर

स.क्रि.के.नं. /२०--

मे. प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सो, कोर्ट क्र. ,जिल्हा---- यांचे न्यायालयात

श्री- , वय --वर्षे, व्यवसाय- नोकरी
कार्यालय, जिल्हा------ (ध्वनी प्रधिकरण) } **फिर्यादी**

**विरुध्द**

१. वय धंदा - नाही
अध्यक्ष -
रा. ठी.

२. वय धंदा - नाही
सचिव -
रा. ठी.

३. वय धंदा - नाही
सदस्य -
रा. ठी.

४. वय धंदा - नाही
सदस्य -
रा. ठी.

५. वय धंदा - नाही
सदस्य -
रा. ठी.

६. वय धंदा - नाही
सदस्य -
रा. ठी.

७. वय धंदा - नाही
सदस्य -
रा. ठी.

} **आरोपी**

CamScanner

# फिर्याद -

पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ तसेच ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण ) २००० चे नियमावली प्रमाणे फिर्याद -

------------------------------------------------------------------------------------

मी, ------------, ------------, जिल्हा------ या पदावर कार्यरत असून मला पर्यावरण संरक्षण कायदा सन १९८६ च्या ध्वनी प्रदूषण नियमन व नियंत्रण नियमावली सन २००० चे कलम २ (क) नुसार वर नमुद कलमाप्रमाणे मे.कोर्टात फिर्याद दाखल करण्याचे अधिकार मला ध्वनी प्रधिकरण म्हणून प्राप्त आहेत. सन २०-- चे ------या उत्सव / सणाचे कालावधीत कायदयाने घालून दिलेल्या नियम व अटीचा भंग करुन यातील आरोपी यांनी ध्वनी प्रदूषणाचा गुन्हा केला असल्याने मला ध्वनी प्रधिकरण म्हणून प्राप्त असलेल्या अधिकारान्वये मी सदरची फिर्याद दाखल करीत आहे.

-------जिल्हा / शहरात -------या सण / उत्सवाचे कालावधीत मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा (डॉल्बी) चा वापर केला जाणार आहे याची पोलीस खात्यास माहिती मिळाल्याने कोणीही अशाप्रकारे ध्वनी प्रदूषण करु नये म्हणून सन २०-- मध्ये साजरा होणा-या ------या उत्सव / सणाचे कालावधीपूर्वीच ----- या मुर्तीची स्थापना करणेसाठी तसेच -------या सण / उत्सव मिरवणूकीमध्ये सहभागी होण्याकरीता पोलीस दलाकडे परवानगीची मागणी केली होती. शहरातील सर्व उत्सव मंडळांना परवानगी देतेवेळी त्यांचेकडून विहित नमुन्यातील परवानगी अर्ज उत्सव मंडळाचे नांव, जबाबदार पदाधिका-यांची नांवे, पत्ते, या माहितीसह भरुन घेवून त्याचप्रमाणे सदर देण्यात येणारी परवानगी एकूण --- अटी व बंधनांचे पालन करण्याच्या शर्तीवरच मंडळाना परवानगी देण्यात आली होती. मंडळांवर घालण्यात आलेल्या अटी व बंधनामध्ये ध्वनीप्रदूषण (नियमन व नियंत्रण ) नियम २००० चा भंग होणार नाही त्याचप्रमाणे रात्री --.--वा. ते सकाळी --.-- वा.पर्यत कोणत्याही प्रकारच्या ध्वनीक्षेपण यंत्रणेचा वापर करणार नाही तसेच मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा (डॉल्बी) चा वापर करणार नाही या प्रमुख अटीची जाणीव करुन देवूनच मंडळांना परवानगी देण्यात आली होती.

सन २०-- मध्ये दिनांक ००/००/००० ते ००/००/०००० या कालावधीमध्ये गणेशोत्सव साजरा होणार असल्याने या मुदतीत कोणीही ध्वनी प्रदूषण करु नये व केल्यास त्यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करता यावी म्हणून आम्ही जिल्हा -----येथे ध्वनी प्रदूषण तपासणी व कार्यवाही साठी पथके स्थापन केली होती. या पथकामध्ये पथक प्रमुख ----------------- यांची नेमणूक करण्यात आली होती त्यांचे मदतीस ---------------, ध्वनी प्रक्षेपण तिव्रता मोजणे करीता ------ या विभागाकडील --- कर्मचारी ध्वनी तिव्रता मोजण्याचे यंत्रणेसह व मदतीस प्रत्येक पथकामध्ये एकुण --पोलीस कर्मचारी यांची नेमणूक करण्यात आली होती.

--------- या उत्सवाचे काळात मंडळानी ध्वनी प्रदूषण करु नये याकरीता वर्तमानपत्र / ई मेल / स्थानिक केबल नेटवर्क / संकेत स्थळ तसेच वेळोवेळी मंडळाच्या बैठका घेवून ध्वनी प्रदूषण टाळवे याबाबत आवाहन करण्यात आले होते. पोलीस खात्याने केलेल्या आवाहानास ब-याच मंडळांनी सकारात्मक प्रतिसाद दिला होता. असे असताना देखील दिनांक ००/००/०००० रोजी --------- रोडवर ---------- तरुण मंडळ, जिल्हा --------. मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा वापर करुन ध्वनी प्रदूषण करीत आहे याची माहिती ---------- पोलीस ठाणे /नियंत्रण कक्षाकडील १०० नंबर, यांना मिळाल्याने त्यांनी
सदरची माहिती ध्वनीप्रदूषण प्रतिबंधक पथक यांना कळविल्याने सदर पथक ---------- पोलीस स्टेशन येथे दाखल झाले. दोन पंचाना बोलावून घेतले. व आलेली तक्रार ही खरी आहे किंवा खोटी आहे याची खात्री करणेस घटनास्थळी रवाना होणेपूर्वी सोबत घेतलेल्या पंचाना करण्यात येणा-या कारवाई विषयी माहिती

CamScanner

दिली. तसेच ध्वनी प्रदूषण मोजण्याचे जे उपकरण आहे त्या उपकरणाची कार्यरिती देखील समजावून सांगितली व त्यानंतर स्टेशन ठाणे डायरी क्रमांक -------- ला नोंद करुन तक्रारीनुसार मिळालेल्या घटनास्थळी पंचासह रवाना झाले. पथक घटनास्थळी पोहचल्यानंतर त्यांना ---------------तरुण मंडळ, ----,जिल्हा ------ हे एकूण -----(स्पिकर) मोठया क्षमतेच्या स्पीकरचा वापर करुन मोठया प्रमाणात ध्वनी प्रक्षेपण करुन ध्वनी प्रदूषण करीत असल्याचे आढळून आले. मंडळ वापरत असलेली ध्वनी प्रक्षेपण यंत्रणा ही ट्रॅक्टर नंबर--------व ट्रॉली नंबर---------वर ठेवण्यात आली होती.

----------तरुण मंडळ, -----,जिल्हा------. हे ध्वनी प्रदूषण करीत होते म्हणून पथक प्रमुखानी मंडळाच्या जबाबदार पदाधिका-यांची समक्ष भेट घेवून ध्वनी प्रदूषण करण्यास कायदयाने बंदी आहे आपण ध्वनी प्रदूषण करीत आहात तरी तात्काळ आपण करत असलेले बेकायदेशीर कृत्य त्वरीत थांबवावे याबाबत संबंधीतांना समज देण्याचा प्रयत्न केला. तथापी ------------------तरुण मंडळ, -----, जिल्हा----. व त्यांच्या पदाधिका-यांनी पथक प्रमुखांनी केलेल्या विनंतीचा अव्हेर करुन ध्वनी प्रदूषणाचे कृत्य चालूच ठेवल्याने पथक प्रमुखांनी आपण करत असलेल्या ध्वनी प्रदूषणाचे शास्त्रीय दृष्टया मोजणी करीत आहोत याबाबत सुचना दिली व त्याप्रमाणे घटनास्थळी -------या विभागाकडील कर्मचारी यांनी त्यांचेकडे असलेल्या ध्वनी तिव्रता यंत्राचे मदतीने ध्वनी तिव्रता मोजून त्यांच्या घटनास्थळीच यंत्राद्वारे तीन प्रती काढण्यात आल्या. मोजलेली तिव्रता ही कायदयाने घालून दिलेल्या मर्यादेपेक्षा --------- इतकी जास्त होती. ------------ मंडळ ध्वनी प्रदूषण करीत असले बाबत घटनास्थळाचा सविस्तर पंचनामा करण्यात आला त्याचबरोबर घटनास्थळाचे छायाचित्रण करण्यात आले. पथक प्रमुखांनी केलेल्या पंचनाम्याची प्रत व ध्वनी तिव्रता यंत्राने मोजलेल्या प्रिंटची प्रत -------- मंडळाच्या जबाबदार व्यक्तीस दिली व किंवा देण्याचा प्रयत्न केला. परंतु ---------- मंडळाच्या अध्यक्ष/पदाधिकारी----------------रा.ठी.------------ यांनी पंचनामा व प्रिंटची प्रत स्वीकारण्यास नकार दिला. तसेच मुळ पंचनाम्यावर सही करणेचे देखील नाकारले म्हणून त्याबाबतची नोंद मुळ पंचनाम्यावर घेण्यात आली आहे./ पंचनाम्यावर स्वाक्षरी केली ------- मंडळ, -----,जिल्हा-----.हे ------------तील प्रमुख मार्गावर मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा वापर ध्वनी प्रदूषणासाठी करीत होते. सदर ठिकाणी नागरीकांची ब-याच मोठया प्रमाणात गर्दी जमली होती. घटनास्थळी होत असलेल्या ध्वनी प्रदूषणामुळे रस्त्यावर जमलेल्या नागरीकांना व घटनास्थळांच्या जवळपास रहात असलेल्या नागरीकांना त्याचा त्रास जाणवत होता. / परंतु ------- मंडळाचे पदाधिकारी हे पोलीसांच्या कोणत्याही सुचनेचे पालन करण्याच्या मनस्थितीत नव्हते. सदर प्रश्नी धार्मीक भावना जोडल्या असल्याने ध्वनी प्रदूषण करणारी यंत्रणा जप्त केलेस कायदा व सुव्यवस्थेचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असता म्हणून ------ मंडळ, -----, जिल्हा------ करीत असलेली ध्वनी प्रदूषण यंत्रणा जप्त केली / करण्यात आलेली नाही.

पथक प्रमुखांनी कारवाई पूर्ण केलेनंतर पुन्हा ----------- पोलीस ठाणे येथे येवून ठाणे डायरी नोंद क्रमांक ------ येथे नोंद केली. त्याच प्रमाणे पथकामध्ये समावेश असलेल्या सर्व अधिकारी व कर्मचारी यांची तसेच घटनास्थळ व शेजारील नागरीकांची टिपणे नोंदवून त्याबाबतचा सविस्तर अहवाल कायदेशी तरतुदीनुसार आम्हास सादर करण्यात आले. पथकाने केलेल्या चौकशीच्या सर्व कागदपत्रांचे अवलोकन केले नंतर ------ मंडळाने दिनांक --.--.---- रोजी ----------------तील प्रमुख रस्त्यावर मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेच्या साहय्याने ध्वनी प्रदूषण केले असले बाबतची आमची खात्री झाल्याने त्यांचेवर फिर्याद दाखल करणेपूर्वी कायदयाने बंधनकारक असलेली करणेपूर्वी नोटीस संबंधीत ------ मंडळाच्या अध्यक्ष व पदाधिकारी यांचेवर बजावण्यात आली होती. परंतु संबंधीतांनी नोटीस मिळालेपासून कायदेशीर मुदतीत म्हणजेच ६० दिवसाचे आत कोणताही खुलासा सादर केला नाही. यावरुनच संबंधीतांना कोणताही खुलासा करावयाचा नाही हे स्पष्ट दिसून येते.

CamScanner

मी सादर करत असलेल्या फिर्यादीच्या पृष्ठयर्थ पथक प्रमुख यांनी सादर केलेला अहवाल, घटनास्थळ पंचनामा, ध्वनी तिव्रता यंत्राद्वारे मोजलेल्या तिव्रतेची प्रिंट, छायाचित्रण, पथकातील अधिकारी व कर्मचारी, यांची नोंदविलेली टिपणे ही सर्व कागदपत्रे स्वतंत्र यादीने जोडली आहेत ती या फिर्यादीच्या पृष्ठयर्थ पुराव्याचा भाग म्हणून समजण्यात यावा.

तरी ------- मंडळाने दिनांक --.--.---- रोजी ------------ येथील प्रमुख रस्त्यावर मोठया क्षमतेच्या ध्वनी प्रक्षेपण यंत्रणेचा वापर करुन ध्वनी प्रदूषणांचे कृत्य केले आहे. म्हणून त्यांचेविरुध्द माझी पर्यावरण संरक्षण कायदा १९८६ चे कलम १५ व १९ त्यास आधीन प्रदूषण (नियमन व नियंत्रण ) २००० चे प्रमाणे कायदेशीर फिर्याद आहे. सदर फिर्यादीची मे. कोर्टात चौकशी होवून आरोपीना जास्तीत जास्त शिक्षा व जास्तीत जास्त दंड करण्यात यावा ही मे. कोर्टाना फिर्यादी तर्फे नम्र विनंती आहे.

जिल्हा ------ मे.जा.व्हावे

दि. / /

(ध्वनी प्राधिकरण)

**ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकरणाची नियुक्ती करण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**पर्यावरण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : याचिका-२०१५/प्र.क्र. ०६/तां.क.१**
१५ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मादाम कामा मार्ग,
हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई.
**दिनांक: २८/०७/२०१५**

वाचा :- १) शासन निर्णय क्र.ध्वनीप्र-२०००/प्र.क्र.२४/तां.क.३, दि.१६/०८/२००० आणि दि.१५/०६/२००१.
२) मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठामध्ये दाखल करण्यात आलेल्या सार्वजनिक हिताच्या याचिका क्र.(१) २०५३/२००३, (२) ७४/२००७, (३) ८५/२००७ आणि (४) १/२००९ मधील दिनांक २६/०२/२००९ चे आदेश
३) शासन निर्णय क्र.ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.९५/तां.क.१, दि.२१/०४/२००९.
४) मा.उच्च न्यायालयाच्या मुंबई खंडपीठामध्ये दाखल याचिका क्र.१७३/२०१० डॉ.महेश बेडेकर वि.महाराष्ट्र शासन संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे दि.१३/०३/२०१५ चे आदेश.

**प्रस्तावना :-**

पर्यावरण विभाग, शासन निर्णय क्र.एनपी/२०००/२४, दि.१६/०८/२००० व शा.नि.क्र.ध्वनीप्र-२००९/प्र.क्र.९५/तां.क.१ दि.२१/०४/२००९ अन्वये ध्वनी प्रदूषण (नियंत्रण व नियमन) नियम-२००० च्या कलम २ (क) नुसार राज्यातील पोलीस आयुक्त असलेल्या शहरांमध्ये पोलीस आयुक्त किंवा उप पोलीस आयुक्त या दर्जाचा अधिकारी व इतर ठिकाणी जिल्हा पोलीस अधिक्षक किंवा उप जिल्हा पोलीस अधिक्षक यांची ध्वनी प्रदूषण नियम-२००० ची अंमलबजावणी करण्यासाठी प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

मा.उच्च न्यायालयाने याचिका क्र.१७३/२०१० मधील दि.१३/०३/२०१५ च्या आदेशान्वये राज्यात ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० ची कडक अंमलबजावणी करण्याकरिता दिलेले आदेश विचारात घेता, उपरोक्त शासन निर्णयामध्ये खालीलप्रमाणे सूधारणा करणे विचाराधीन होते.

**शासन निर्णय :-**

ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम-२००० च्या २(क) नुसार आता राज्यातील पोलीस आयुक्त असलेल्या शहरांमध्ये पोलीस आयुक्त किंवा पोलीस उप आयुक्त किंवा सहायक पोलीस आयुक्त आणि इतर क्षेत्रामध्ये संबंधीत पोलीस अधिक्षक किंवा पोलीस उप अधिक्षक दर्जाचा अधिकारी यांची ध्वनी प्रदूषण नियमांची अंमलबजावणी करण्यासाठी ध्वनी प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे. हे ध्वनी प्राधिकारी या नियमांच्या सुलभ अंमलबजावणीसाठी त्यांच्या कार्यक्षेत्रात विभागनिहाय/ वार्डनिहाय ध्वनी प्रदूषण अधिकारी प्राधिकृत करुन संयंत्रणा विकसित करतील.

CamScanner

नियुक्त ध्वनी प्राधिकारी व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांचे पत्ते, पदनाम, दूरध्वनी क्रमांक, इमेल इत्यादि माहितीस नागरिकांच्या माहितीसाठी विभागनिहाय/ वार्डनिहाय मोक्याच्या ठिकाणी फलक लावावेत, स्थानिक वर्तमानपत्र व केबल नेटवर्कद्वारे वेळोवेळी प्रसिद्धी द्यावी आणि ही माहिती संकेतस्थळावरसुद्धा उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच, ध्वनी प्रदूषणासंबंधीत तक्रार प्राप्त करुन घेण्यासाठी १०० क्रमांकाच्या दूरध्वनी सेवेमध्ये या बाबीचा समावेश करुन ती कार्यान्वित करण्यात यावी. सदरहू शासन निर्णय गृह विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे. याव्यतिरिक्त मूळ शासन निर्णयामध्ये कोणताही बदल नाही.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०७२९१२०७२६१३०४ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Malini Vijay Shankar

Digitally signed by Malini Vijay Shankar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Principal Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Malini Vijay Shankar
Date: 2015.07.29 12:11:40 +05'30'

**(मालिनी शंकर)**
अपर मुख्य सचिव

**प्रत माहितीसाठी :-**

१) मा.मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
२) मा.मुख्य सचिव
३) अपर मुख्य सचिव, गृह विभाग, मंत्रालय
४) प्रधान सचिव (अपिले व सुरक्षा), गृह विभाग
५) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (१), मंत्रालय
६) प्रधान सचिव, नगर विकास विभाग (२), मंत्रालय
७) प्रधान सचिव, महसूल विभाग, मंत्रालय
८) सचिव (परिवहन), गृह विभाग, मंत्रालय
९) मा.मंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
१०) मा.राज्यमंत्री (पर्यावरण) यांचे खाजगी सचिव
११) सर्व मा.मंत्री/ मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
१२) सर्व जिल्हाधिकारी
१३) सर्व पोलीस आयुक्त/ उप आयुक्त/ सह पोलीस आयुक्त
१४) सर्व जिल्हा पोलीस अधिक्षक/ उप अधिक्षक
१५) सर्व अधिकारी/ कार्यासने/ निवडनस्ती-तां.क.१, पर्यावरण विभाग, मंत्रालय.

CamScanner

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१०. डॉ.महेश बेडेकर वि. महाराष्ट्र शासन व इतर. ध्वनी प्रदूषण नियम, २००० व महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ ची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**गृह विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४/वि.शा.१ ब**
दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २८ जुलै, २०१५

वाचा :- मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० मध्ये दिनांक १३.०३.२०१५ व २४.०६.२०१५ रोजी दिलेले आदेश.

<u>परिपत्रक :-</u>

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० (डॉ.महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी निर्देश दिलेले आहेत. त्यानुसार ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील नियम ५ खालीलप्रमाणे असून त्याच्या आधारे कार्यवाही करण्यात यावी. :-

Restrictions on the use of loud speakers / public address system :-

i. A loud speaker or a public address system shall not be used except after obtaining written permission from the authority.

ii. A loud speaker or a public address system shall not be used at night (between 10.00 a.m. to 6.00 a.m.) except in closed premises for communication within, e.g. auditoria, conference rooms, community halls and banquet halls.

iii. Notwithstanding anything contained in sub rule 2 the state Government may, subject to such to such terms and conditions as are necessary to reduce noise pollution, permit use of loud speakers or public address systems during night

hours (between 10.00 p.m. to 12.00 midnight) on or during any cultural or religious festive occasion of a limited duration not exceeding 15 days in all during a calander year.

२. याशिवाय, ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० ची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या अनुषंगाने संबंधितांना खालीलप्रमाणे सूचनासुद्धा निर्गमित करण्यात येत आहेत :-

(१) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० मधील नियम ५ (१) व महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील तरतुदीनुसार लिखित परवानगीशिवाय लाऊडस्पिकर किंवा पब्लिक ॲड्रेस सिस्टीम याचा कोणीही वापर करणार नाही व सदर तरतुदींचा भंग होणार नाही याची योग्य ती दक्षता सर्व संबंधितांनी घ्यावी. ध्वनी प्रदूषण नियमाचा भंग झाल्याचे आढळल्यास ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.

(२) ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार प्राप्त झाल्यावर संबंधीत ध्वनी प्रदूषण नियंत्रक अधिकारी यांनी सदरहु ठिकाणी ध्वनी प्रदूषण मापक यंत्राने ध्वनीची विहित मर्यादा राखली गेली आहे किंवा कसे याचे परिक्षण करुन या संदर्भात नियमाचा भंग झाला असल्यास ध्वनी प्रदुषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या कलम ७ अंतर्गत योग्य ती कार्यवाही करावी. जर लाऊडस्पिकर किंवा पब्लिक ॲड्रेस सिस्टीम विना परवाना सुरु असल्याचे आढळल्यास ते तात्काळ बंद करावेत. तसेच दिलेल्या वेळेनंतर लाऊडस्पिकर किंवा पब्लिक ॲड्रेस सिस्टीमचा वापर सुरु असल्याचे आढळल्यास तो तात्काळ बंद करावा व असा वापर करणार नाही याची दक्षता घ्यावी.

(३) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० च्या कलम ८ नुसार संबंधीत प्राधिका-यांनी ध्वनी प्रदूषण नियमाचा भंग झाल्याचे आढळल्यास ध्वनी प्रदूषण रोखण्यासाठी योग्य ती कायदेशीर कार्यवाही करावी.

(४) लाऊडस्पिकर किंवा पब्लिक ॲड्रेस सिस्टीमचा वापर करण्याची परवानगी देताना संबंधिताने यापूर्वी प्रदूषण नियमाचा भंग केला होता किंवा कसे याबाबतची खातरजमा करुनच परवानगी देण्याची कार्यवाही करावी. यापूर्वी संबंधिताने प्रदूषण नियमांचा भंग केल्याचे आढळल्यास अशी परवानगी नाकारण्यात यावी. तसेच लाऊडस्पिकर किंवा



CamScanner

पब्लिक ॲड्रेस सिस्टीमचा वापर करण्याची परवानगी देण्यात आल्यावर प्रदूषण नियमांचा भंग झाल्याचे आढळल्यास नियमानुसार दिलेली परवानगी रद्द करुन योग्य ती पुढील कायदेशीर कार्यवाही करावी.

(५) ध्वनी प्रदूषणाबाबत मा. उच्च न्यायालयाने दिलेले निदेश सर्व महानगरपालिका तसेच राज्यातील इतर सर्व जिल्ह्याच्या हद्दीतील सर्व पोलीस स्टेशन यांच्या निदर्शनास आणून देण्यात यावेत व या परिपत्रकांतील दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन होईल यांची खबरदारी घ्यावी.

(६) ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम, २००० व महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे अनुषंगाने खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात :-

i) ध्वनी प्रदूषणाचे उल्लंघनाबाबत सामान्य नागरिकांच्या तक्रारी १०० क्रमांकावर नोंदवून घ्याव्यात. निनावी तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची सुध्दा नोंद घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात यावी. तसेच तक्रार करणाऱ्यास तक्रार नोंदीचा क्रमांक तात्काळ उपलब्ध करुन देण्यात यावा.

ii) प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद घेण्यासाठी एक नोंदवही ठेऊन त्यामध्ये तक्रारींची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात यावी.

iii) ध्वनी प्रदूषणाबाबत तक्रार करण्यासाठी ई-मेल ची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

iv) उपरोक्त सुविधांची स्थानिक वृत्तपत्रे, स्थानिक केबल नेटवर्क तसेच इतर प्रसार माध्यमांद्वारे प्रसिद्धी देण्यात यावी.

३. केलेल्या कार्यवाहीचा अहवाल जिल्हादंडाधिकारी व महानगरपालिका आयुक्त यांना त्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्धीसाठी सादर करावा.

४. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी सदरहू परिपत्रकातील सूचना सर्व संबंधीतांच्या निदर्शनास आणून देण्यात याव्यात व त्यानुसार त्याचे पालन होत असल्याची खातरजमा करावी.



CS CamScanner

५. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१५०७२८१३५८५०५०२९ असा आहे. हे शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sunil Jaikumar Sovitkar

Digitally signed by Sunil Jaikumar Sovitkar
DN: CN = Sunil Jaikumar Sovitkar, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Home Department
Date: 2015.07.28 16:31:44 +05'30'

( सु. ज. सोवितकर )
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रत,

१. मा.राज्यपाल महोदयांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री महोदयांचे सचिव.
३. सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा.विरोधी पक्षनेता, विधानपरिषद.
५. मा.विरोधी पक्षनेता, विधानसभा.
६. सर्व विधान परिषद / विधानसभा सदस्य.
७. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
८. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव, मंत्रालयीन विभाग.
९. प्रबंधक, मा.उच्च न्यायालय, मुंबई. (पत्राने)
१०. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
११. सर्व विभागीय आयुक्त.
१२. सर्व जिल्हादंडाधिकारी.
१३. सर्व पोलीस आयुक्त.
१४. सर्व पोलीस अधिक्षक.
१५. निवडनस्ती (वि.शा.१ ब)



CamScanner

ध्वनी प्रदुषणाबाबत पोलीस यंत्रणेकडून करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**महाराष्ट्र शासन**

**गृह विभाग**

**शासन परिपत्रक क्रमांक : डिआयएस ०९१०/प्र.क्र.४३४/वि.शा.१ ब**

दुसरा मजला, मुख्य इमारत, मादाम कामा मार्ग,

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.

दिनांक : १४ जुलै, २०१५

वाचा :- मा.उच्च न्यायालय, मुंबई यांनी जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० मध्ये दिनांक १३.०३.२०१५ व दिनांक २४.०६.२०१५ रोजी दिलेले आदेश.

**प्रस्तावना :-**

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० (डॉ.महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) या याचिकमेमध्ये मा.उच्च न्यायालयाने ध्वनी प्रदुषणाबाबतच्या नियंत्रणाबाबत निर्देश दिले आहेत. त्यानुसार खालील परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**परिपत्रक :-**

जनहित याचिका क्रमांक १७३/२०१० (डॉ.महेश बेडेकर विरुद्ध महाराष्ट्र शासन व इतर) या याचिकेमध्ये मा.उच्च न्यायालयाने "Noise Pollution (Regulation and Control) Rules, २०००" व महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ च्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याचे निर्देश संदर्भाधिन आदेशान्वये दिलेले आहेत. त्याअनुषंगाने सर्व पोलीस आयुक्त आणि पोलीस अधिक्षक यांनी यासंबंधी खालीलप्रमाणे उपाययोजना कराव्यात :-

१) ध्वनी प्रदुषणाचे उल्लंघनाबाबत सामान्य नागरिकांच्या तक्रारी १०० क्रमांकावर नोंदवून घ्याव्यात. निनावी तक्रारी प्राप्त झाल्यास त्याची नोंद घेऊन त्यावर कार्यवाही करण्यात यावी.

२) प्राप्त होणाऱ्या तक्रारींची नोंद घेण्यासाठी एक नोंदवही ठेऊन त्यामध्ये तक्रारींची व त्यावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात यावी.

३) ध्वनी प्रदुषणाबाबत तक्रार करण्यासाठी ई-मेल ची सुविधा उपलब्ध करुन द्यावी.

CS CamScanner

प्रस्तावना :- केंद्रिय पर्यावरण मंत्रालयाच्या ध्वनी प्रदूषण नियमन व नियंत्रण नियम, २००० च्या परिच्छेद ५[ २] नुसार ध्वनीक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्षाच्या सारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी [ रात्री १० वा. पासून सकाळी ०६ वाजेपर्यंत] करता येत नाही. या नियमामध्ये दिनांक ११.१०.२००२ रोजीच्या शासन आदेशाद्वारे केंद्र शासनाने सुधारणा केली असून नियम ५ मध्ये उपनियम [ ३] चा नव्याने समावेश करण्यात आलेला आहे. त्यान्वये ध्वनी प्रदूषणाची पातळी विहित मर्यादित राखून वर्षभरामध्ये १५ दिवस ध्वनिक्षेपक व ध्वनिवर्धक यांचा वापर श्रोतृगृह, सभागृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष या सारख्या बंद जागा खेरीज इतर ठिकाणी रात्री १० वाजेपर्यंत ऐवजी रात्री १२ वा. पर्यंत सांस्कृतिक कार्यक्रम सणांकरीता येऊ शकेल. तथापि वर्षभरातील १५ दिवस कोणते हे ठरविण्याची जबाबदारी राज्य शासनावर होती ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक वापरासाठी वर्षभरातील १५ दिवसांसाठी वेळेत सूट देण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

शासन निर्णय :- ध्वनी प्रदुषण [ नियमन व नियंत्रण] नियम, २००० च्या नियम ५ च्या उपनियम [ ३]नुसार, ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर, श्रोतृगृहे, सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागाखेरीज इतर ठिकाणी खालील प्रमाणे १५ दिवसांसाठी फक्त ध्वनीची विहित मर्यादा राखून सकाळी ७ वाजल्यापासून रात्री १२ वाजेपर्यन्त करता येईल.

| | |
|---|---|
| गणपती उत्सव | - पाचवा दिवस, गौरी विसर्जन दिवस व अनंत चतुर्दशीचा दिवस [ एकूण ३ दिवस] |
| नवरात्री उत्सव | - अष्टमी व नवमी [ एकूण २ दिवस] |
| ख्रिसमस | - एक दिवस |
| ३१ डिसेंबर | - एक दिवस |
| दिवाळी सण | - दोन दिवस [ धनत्रयोदशी व लक्ष्मीपूजन] |
| ईद-ए-मिलाद | - एक दिवस |
| शिवजयंती | - एक दिवस |
| डॉ. आंबेडकर जयंती | - एक दिवस |
| उर्वरित तीन दिवस | - संबंधित क्षेत्रातील ध्वनी प्राधिकरणाने जिल्हाधिकाऱ्यांच्या सल्ल्याने स्थानिक धार्मिक उत्सव व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी त्या क्षेत्रातील लोकांच्या मागणीनुसार परवानगी द्यावी. |

जिल्ह्यातील नगरपालिका/महानगरपालीका क्षेत्रात तीन दिवसापेक्षा जास्त दिवस सर्वसाधारण कार्यक्रमांस परवानगी देता येणार नाही मुंबई महानगरपालिका क्षेत्रात तीन दिवसांसाठी परवानगी देताना राज्य शासनाच्या सहमतीने परवानगी देता येईल. जिल्ह्यातील इतर भागामध्ये तीन दिवसांसाठी परवानगी देताना "ध्वनी प्रदूषण नियंत्रण प्राधिकरण"व जिल्हाधिकारी यांनी निर्णय घ्यावा. वरील प्रमाणे ध्वनीवर्धक व ध्वनीक्षेपक वापरण्याबाबतची सूट वर्षभरातील १५ दिवसापेक्षा जास्त होणार नाही याची जबाबदारी संबंधीत जिल्हाधिकारी व "ध्वनी प्रदुषण नियंत्रण प्राधिकरण यांची राहिल. अशा प्रकारची परवानगी देताना ध्वनीप्रदुषण नियम २००० मधिल नियम ३ व ४

चे अनुपालन करण्यांत यावी. ध्वनी प्रदूषण नियम २००० अंतर्गत स्थापन केलेल्या ध्वनी प्राधिकरणांनी प्राधिकरणाकडे प्राप्त तक्रारींचा व त्यांवर केलेल्या कार्यवाहीचा त्रैमासिक अहवाल राज्य शासनास विलंब न करता पाठवावा.

हे आदेश हा शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिवसापासून लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

सही /-
[ग. नि. वराडे]
संचालक [पर्यावरण], महाराष्ट्र शासन

---

जा. क्र. वि. शा/जातीय/ ४२०८/२००३
पोलीस उप आयुक्त, विशेष शाखा, पुणे शहर
यांचे कार्यालय. दिनांक:- १५ /११/२००३

प्रत :-

सर्व संबंधीतांना.

17/11/2003

पोलीस उप आयुक्त,
विशेष शाखा, पुणे शहर

320

पोलीस निरीक्षक
समर्थ पोलीस स्टेशन
पुणे शहर ४११०११

18/11/3

४८१४

LLB

ध्वनिक्षेपक, बँड, फटाके इत्यादिमुळे होणारे ध्वनीप्रदुषण व त्यामुळे मानवी जीवनावर होणारे दुष्परिणाम हे आता सर्वज्ञात झाले आहेत. ध्वनिप्रदुषणामुळे बहिरेपणा येणे, ह्रदयविकार, रक्तदाब, मेंदूचे आजार, निद्रानाश अशासारखे आजार झाल्याची अनेक उदाहरणे आहेत. ध्वनी प्रदुषणामध्ये महत्वाचा वाटा हा ध्वनीक्षेपकाचा असतो.

या गोष्टीचे गांभीर्य लक्षात घेऊन, केंद्र सरकारने 1986 साली पर्यावरण (संरक्षण) अधिनियम–1986 हा कायदा केला असून त्या कायद्याअंतर्गत ध्वनीप्रदुषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी विविध तरतुदी केलेल्या आहेत. तसेच त्यातील तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी एका प्राधिका–याची नेमणूक करण्याची तरतूदही त्यात करण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे पुणे शहराकरिता पोलीस आयुक्त, पुणे, यांची प्राधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आलेली आहे.

सदर तरतुदीनुसार (1) एक सदस्यीय प्राधिकरणाकडून लेखी परवानगी मिळाल्याशिवाय ध्वनीक्षेपक/ध्वनीवर्धकाचा वापर करता येणार नाही.

(2) ध्वनीक्षेपक व ध्वनीवर्धक यंत्रणेचा वापर श्रोतृगृहे, सामुहिक सभागृहे आणि मेजवानी कक्ष यासारख्या बंद जागेखेरीज इतर ठिकाणी रात्री 10.00 ते 06.00 वा पर्यन्त करता येणार नाही.

(3) रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये या ठिकाणी 100 मीटरच्या कक्षेत ढोल किंवा तत्सम वाद्ये वाजविणे, ताणाचे शिंग, तुतारी किंवा इतर वाद्य वाजविणे किंवा ध्वनीवर्धक/ध्वनीक्षेपकाचा वापर करणे याबाबत बंदी आहे.

(4) आवाजाची पातळी ठराविक मर्यादेपेक्षा 10 डेसिबल(ए) किंवा अधिक वाढली असेल तर कोणाही व्यक्तीस एक सदस्यीय प्राधिकरणाकडे तक्रार करता येते.

(5) वर नमूद 1 ते 3 मधील तरतुदींचा भंग केल्यास या कायद्याच्या अन्वये कारवाई करता येईल.

(6) सदर कायद्यात शहराच्या वेगवेगळया भागात ध्वनीचे प्रमाण डेसिबलमध्ये काय असावे हेही नमूद केले आहे. ते खालीलप्रमाणे :–

| | क्षेत्र | दिवसा | रात्री |
|---|---|---|---|
| 1. | औद्योगिक | 75 डेसिबल | 70 डेसिबल |
| 2. | वाणिज्य क्षेत्र | 65 –""– | 55 –""– |
| 3. | निवासी | 55 –""– | 45 –""– |
| 4. | शांतता क्षेत्र | 50 –"– | 40 –""– |

(7) या कायद्यानुसार दिवसा म्हणजे सकाळी 06.00 ते रात्री 10.00 व रात्री म्हणजे रात्री 10.00 ते सकाळी 06.00 वाजेपर्यन्त असे समजण्यात येईल.

ध्वनीप्रदुषणाच्या संबंधात सन 1999 व सन 2000 अनुक्रमे कलकत्ता उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालान्वये सार्वजनिक ठिकाणी तसेच धार्मिक स्थळांमध्ये ध्वनीक्षेपकाचा अनियंत्रित वापरावर बंदी घालण्यात आलेली आहे. कलकत्ता न्यायालयाचे निवाड्यानुसार ज्या संस्था न्यायालयाच्या हुकुमाची/निर्देशाची अवमान्यता करतील अशा ठिकाणावरील ध्वनीक्षेपके जप्त करण्यात यावीत. अशा प्रकारचे निर्देश देण्यात आले असून त्याची अंमलबजावणीही करण्यात आलेली आहे.

पुणे ही महाराष्ट्राची सांस्कृतिक राजधानी असून या ठिकाणी विविध सण आणि समारंभ मोठ्या प्रमाणावर साजरे केले जातात. हे समारंभ आणि सण साजरे करताना ध्वनीप्रदुषण होणार नाही यासाठी वर नमूद केलेल्या पर्यावरण (संरक्षण) अधिनियमातील तरतुदी तसेच कलकत्ता उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निकाल लक्षात घेणे गरजेचे आहे. पोलीस व जनता समन्वयाची पुणे शहराची परंपरा लक्षांत घेता हे करणे सहज शक्य आहे. [या निवेदनाद्वारे तमाम पुणेकरांना असे आवाहन करण्यात येते की, लग्न, मुंज, सभा, मिरवणूका व अन्य समारंभ, सण/उत्सव साजरा करत असताना वर नमूद केल्याप्रमाणे कायद्याच्या तरतुदीचा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी. पोलीस कायद्याचे अंमलबजावणीसाठी बांधील आहेत.] तथापि, कायद्याची जाण असलेले नागरिक ज्या ठिकाणी सहकार्याचा हात पुढे करतात, त्या ठिकाणी कायदा वापरण्याची गरज भासत नाही याची अनेक उदाहरणे आपणा सर्वांना माहीत आहेत. तथापि, ज्या ज्या ठिकाणी कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी सहकार्याचा हात मिळणार नाही अशा ठिकाणी कायद्यानुसार कारवाई करणे हे पोलीसांना अपरिहार्य आहे. अशा वेळी पोलीसांना सहकार्य करणे जरुरीचे आहे.

शेवटी सर्व समाज कार्यकर्ते, विविध मंडळांचे पदाधिकारी, लोकप्रतिनिधी, प्राध्यापक, अभियंते, वैद्यकीय क्षेत्रातील व्यक्ती, विद्यार्थी, पालक, विविध क्षेत्रातील कामगार, विविध संघटनांचे, राजकीय पक्षांचे प्रतिनिधी या सर्वांना ध्वनीप्रदुषणाच्या विरोधातील अभियानामध्ये पोलीसांच्या बरोबरीने हातात-हात घालून काम करण्याचे पुन्हा एकदा आवाहन करण्यात येत आहे.

# ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २०००[१]

पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९) याच्या कलम ३ च्या पोटकलम (२) च्या खंड (दोन), कलम ६ चे पोटकलम (१) व पोटकलम (२) चा खंड (ब) आणि कलम २५, तसेच पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ याचा नियम ५ याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून केंद्रशासन याद्वारे, आवाज उत्पन्न करणाऱ्या आणि निर्माण करणाऱ्या साधनांचे विनियमन आणि नियंत्रण करण्यासाठी पुढील नियम करीत आहे–

**१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ–**

(१) या नियमांना, ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २००० असे म्हणावे.

(२) ते शासकीय राजपत्रात प्रसिद्ध करण्यात येतील तेव्हापासून अमलात येतील.

**२. व्याख्या–**

या नियमांमध्ये संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,–

(अ) ''अधिनियम'' म्हणजे, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ (१९८६ चा २९);

(ब) ''क्षेत्र/झोन'' म्हणजे, या नियमांना जोडलेल्या अनुसूचीमध्ये देण्यात आलेल्या चार प्रवर्गांपैकी प्रत्येक प्रवर्गामध्ये येणारी सर्व क्षेत्रे;

[२][(क) ''प्राधिकरण'' म्हणजे केंद्रशासनाने किंवा यथास्थिती, राज्यशासनाने तेव्हा अमलात असणाऱ्या कायद्यांनुसार प्राधिकृत केलेला कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी आणि त्यात जिल्हा दंडाधिकारी, पोलीस आयुक्त किंवा त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये आवाजाच्या संबंधात सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा राखण्यासाठी पदनिर्देशित केलेला पोलीस उपअधीक्षकाच्या

---

१. पाहा. स्था. आ. १२३ (ई), दि. १४-२-२०००, भारत सरकारचे राजपत्र-असाधारण, भाग दोन, क ३ (दोन), दि. १४-२-२०००.

२. स्था. आदेश १०४६ (ई), दि. २२-११-२००० द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला. (दि. २४-११-२००० पासून).

दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही इतर अधिकारी यांचा समावेश होतो;]

[३][(ड) "न्यायालय" म्हणजे विवादांचा अभिनिर्णय करण्यासाठी आणि न्यायदान करण्यासाठी बैठकीन पीठासीन असणाऱ्या एका किंवा अधिक न्यायाधीशांचा समावेश असलेले शासकीय मंडळ आणि त्यात एक किंवा अनेक न्यायाधीश किंवा दंडाधिकारी ज्यात पीठासीन असतात अशा आणि दिवाणी, करविषयक आणि फौजदारी प्रकरणात न्यायाधिकरणे म्हणून काम करतात अशा कोणत्याही न्यायालयांचा समावेश होतो.

(ई) "शैक्षणिक संस्था" म्हणजे, शाळा, विद्यालय (सेमिनरी), महाविद्यालय, विद्यापीठ, व्यावसायिक अकादमी, प्रशिक्षण संस्था किंवा इतर शैक्षणिक आस्थापना– मात्र त्या चार्टर्ड संस्था असल्याच पाहिजेत असे नाही, आणि त्यात अशा संस्थांच्या केवळ इमारतींचाच समावेश होतो असे नाही तर शैक्षणिक अनुदेशांची पूर्ण व्याप्ती साध्य करण्यासाठी आवश्यक असलेल्या सर्व मैदानांचा तसेच मानसिक, शारीरिक आणि नैतिक विकासासाठी आवश्यक असलेल्या अशा गोष्टींचाही त्यात समावेश होतो;

(फ) "रुग्णालय" म्हणजे, आजारी, जखमी, विकलांग किंवा वृद्ध व्यक्तींना स्वीकारण्यासाठी आणि त्यांची काळजी घेण्यासाठी असलेली संस्था आणि त्यात शासकीय किंवा खाजगी रुग्णालये, परिचर्या गृहे आणि चिकित्सालये यांचा समावेश होतो;]

[४][(ग) "व्यक्ती" या संज्ञेमध्ये कोणतीही कंपनी किंवा संघटना किंवा व्यक्तींचा संघ यांचा समावेश होतो. मग तो कायद्याने संस्थापित केलेला असो वा नसो;]

[५][(ह)] "राज्य शासन" याचा संघराज्य क्षेत्र यांच्या संबंधातील अर्थ संविधानाच्या अनुच्छेद २३९ अन्वये नियुक्त केलेला त्या भागाचा प्रशासक असा आहे.

**३. वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी/झोनसाठी आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा–**

(१) वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी/झोनसाठी आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा, या नियमांना जोडलेल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे असेल.

(२) वेगवेगळ्या क्षेत्रासाठी आवाजाच्या दर्जाच्या कार्यान्वयनाच्या प्रयोजनासाठी, औद्योगिक, वाणिज्यिक, निवासी किंवा शांतता क्षेत्र/झोन यामधील क्षेत्रांची राज्यशासन

३. स्थायी आदेश १०४६ (ई), दिनांक २२-११-२००० द्वारे समाविष्ट केला (२४-११-२००० पासून)

४. जुन्या (ह) या खंडाला हा नवीन क्रमांक दिला, स्थायी आदेश १०४६ (ई), दि. २२-११-२००० द्वारे (दि. २४-११-२००० पासून).

५. स्थायी आदेश १०४६ (ई), दिनांक २२-११-२००० द्वारे मूळ खंड (ई) याला खंड (ह) असा नवीन क्रमांक दिला. (२४-११-२००० पासून).



[६][विल्हेवारी करील.]

(३) राज्यशासन आवाजासाठी तसेच वाहनांच्या हालचालींमधून निर्माण होणाऱ्या आवाजासाठी अपप्रेरणा देण्याच्या बाबतीत उपाययोजना करील आणि सध्याच्या आवाजाच्या पातळ्या या नियमांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेच्या दर्जापेक्षा अधिक होणार नाहीत याची सुनिश्चिती करील.

(४) सर्व विकास प्राधिकरणे, स्थानिक मंडळे आणि इतर संबंधित प्राधिकरणे विकासविषयक कार्यक्रमांचे नियोजन करताना किंवा नगर नियोजन आणि देश नियोजन याच्याशी संबंधित कार्ये पार पाडताना ध्वनी उपद्रव टाळण्यासाठी आणि आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा टिकवून ठेवणे साध्य करण्यासाठी जीवनाच्या गुणवत्तेचा पॅरामीटर म्हणून ध्वनिप्रदूषणाच्या सर्व बाजू विचारात घेईल.

(५) रुग्णालये, शैक्षणिक संस्था आणि न्यायालये यांच्या सभोवतालचा सुमारे १०० मीटरपेक्षा कमी नसेल अशा क्षेत्राला या नियमांच्या प्रयोजनासाठी शांतता क्षेत्र/झोन म्हणून घोषित करता येईल.

**४. ध्वनिप्रदूषण नियंत्रण उपाययोजना अमलात आणण्याची जबाबदारी–**

(१) कोणत्याही शांतता क्षेत्रातील/झोनमधील आवाजाची पातळी अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेतील गुणवत्तेच्या दर्जापेक्षा अधिक असणार नाही.

(२) ध्वनिप्रदूषण नियंत्रण उपाययोजना अमलात आणण्यासाठी आणि आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेतील गुणवत्तेच्या दर्जाचे अनुपालन करण्यासाठी प्राधिकरण जबाबदार असेल.

**५. लाऊडस्पीकर (ध्वनिक्षेपक)/सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांच्या वापरावरील निर्बंध–**

(१) प्राधिकरणाकडून लेखी परवानगी घेण्यात आल्याखेरीज लाऊडस्पीकर्स किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांचा वापर करण्यात येणार नाही.

(२) रात्री १० ते पहाटे ६ या दरम्यानच्या काळात संपर्क यंत्रणा असलेल्या बंदिस्त जागा म्हणजे प्रेक्षागृह, कॉन्फरन्स रूम, समाज मंदिर (कम्युनिटी हॉल), बँक्वेट हॉल याखेरीज अन्य ठिकाणी ध्वनिक्षेपकाचा किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणांचा वापर करण्यात येणार नाही.

[७][(३) पोटनियम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्यशासनाला, ध्वनिप्रदूषण

६. स्थायी आदेश १०४६ (ई), दिनांक २२-११-२००० याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (२४-११-२००० पासून).

७. स्थायी आदेश १०८८ (ई), दिनांक ११-१०-२००२ द्वारे हा मजकूर ११ ऑक्टोबर २००२ पासून जादा दाखल करण्यात आला.



CamScanner

कमी करण्यासाठी आवश्यक आहेत अशा अटी व शर्ती यांना अधीन राहून कोणत्याही सांस्कृतिक किंवा धार्मिक सणाच्या प्रसंगी एका पूर्ण कॅलेंडर वर्षात एकूण पंधरा दिवसांपेक्षा अधिक होणार नाही अशा मर्यादित कालावधीसाठी रात्रीच्या वेळी (रात्री १० ते रात्री १२ च्या दरम्यान) लाऊडस्पीकर्स किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांचा वापर करण्यास परवानगी देता येईल.]

**६. शांतता क्षेत्राचा/झोनचा कोणताही भंग केल्याचा परिणाम–**

जो कोणी, शांतता क्षेत्र/झोन मध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही ठिकाणी पुढीलपैकी कोणताही अपराध करील तो अधिनियमाच्या तरतुदींनुसार असलेल्या शास्तीस पात्र ठरेल–

(एक) कोणतेही संगीत लावणे किंवा कोणत्याही ध्वनिवर्धक यंत्राचा वापर करणे;

(दोन) ड्रम किंवा टमटम वाजवणे किंवा संगीतयुक्त किंवा दाबयुक्त हॉर्न वाजवणे;

(तीन) गर्दीला आकर्षित करील अशा स्वरूपाची नक्कल किंवा इतर कार्यक्रम करणे.

**७. प्राधिकरणाकडे तक्रार करणे–**

(१) जर आवाजाची पातळी सभोवतालच्या आवाजाच्या दर्जाच्या पातळीपेक्षा १० डेसिबल (ए) ने किंवा कोणत्याही क्षेत्राच्या/झोनच्या समोरच्या संबंधित स्तंभामध्ये देण्यात आल्यापेक्षा अधिक झाली असेल तर, एखाद्या व्यक्तीला त्याच्याविरुद्ध प्राधिकरणाकडे तक्रार करता येईल.

(२) प्राधिकरण त्या तक्रारीवर कृती करील आणि भंग करणाऱ्या विरुद्ध या नियमांच्या आणि अमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्याच्या तरतुदींनुसार कार्यवाही करण्यात येईल.

**८. संगीताचा आवाज किंवा ध्वनी चालू ठेवण्यास प्रतिबंध इ. करण्याचे अधिकार–**

(१) पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या अहवालावरून किंवा त्याच्याकडून मिळालेल्या इतर माहितीवरून, त्रास, उपद्रव, अस्वस्थता किंवा क्षती यांना प्रतिबंध करण्यासाठी किंवा त्रास, उपद्रव, अस्वस्थता किंवा क्षती यांपासून लोकांना किंवा त्याच्या सान्निध्यात राहणाऱ्या किंवा मालमत्ता धारण करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला असलेल्या धोक्यापासून प्रतिबंध करण्यासाठी तसे करणे आवश्यक आहे याबाबत प्राधिकरणाचे समाधान झाले असेल तर, त्याला–

(अ) कोणत्याही जागेत किंवा जागेवर,

(एक) कोणतेही गायन किंवा वाद्य संगीत,



(दोन) सार्वजनिक ध्वनिक्षेपण यंत्रणा, साधने किंवा उपकरणे किंवा आवाज निर्माण करण्यास किंवा पुन्हा सादर करण्यास सक्षम असणाऱ्या यंत्रकाला चालवून, ठोकून, एकमेकांवर आपटून किंवा फुंकून किंवा लाऊडस्पीकरसह कोणत्याही उपकरणाचा वापर करून आवाज निर्माण करणे, किंवा

(ब) ज्याच्या परिणामी किंवा ज्याच्यामुळे आवाज निर्माण होईल असा कोणताही व्यापार, उपव्यवसाय, कामकाज किंवा प्रक्रिया कोणत्याही जागेत किंवा जागेवर पार पाडणे,

याला प्रतिबंध करणे, मना करणे, त्याचे नियंत्रण करणे किंवा विनियमन करणे यासाठी त्याला योग्य वाटतील असे निदेश कोणत्याही व्यक्तीला लेखी आदेशाद्वारे देता येतील.

(२) पोटनियम (१) अन्वये अधिकार प्रदान करण्यात आलेल्या प्राधिकरणाला, एकतर स्वाधिकारे किंवा पोटनियम (१) खालील काढण्यात आलेल्या आदेशामुळे बाधित झालेल्या व्यक्तीने केलेल्या अर्जावरून एकतर असा कोणताही आदेश विखंडित करता येईल, त्यात फेरबदल करता येतील किंवा फेरफार करता येतील :

परंतु असे की, असा कोणताही अर्ज निकालात काढण्यापूर्वी उक्त प्राधिकरण त्या अर्जदाराला एकतर स्वत: जातीने किंवा त्याचे प्रतिनिधित्व करणाऱ्या व्यक्तीमार्फत त्या प्राधिकरणासमोर अशा आदेशाविरोधात कारणे दाखविण्यासाठी हजर होण्याची संधी देईल आणि जर त्याने तो अर्ज पूर्णपणे किंवा अंशत: फेटाळला असेल तर त्याची अशा नाकारण्याची कारणे अभिलिखित करील.

■



CamScanner

# अनुसूची

[नियम ३(१) व ४(१) पाहा]

आवाजाच्या संबंधातील सभोवताच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा

| क्षेत्र संकेतांक | क्षेत्र/झोन प्रवर्ग | डेबि (ए) एल ईक्यू* मधील मर्यादा दिवसा | रात्री |
|---|---|---|---|
| (अ) | औद्योगिक क्षेत्र | ७५ | ७० |
| (ब) | वाणिज्यिक क्षेत्र | ६५ | ५५ |
| (क) | निवासी क्षेत्र | ५५ | ४५ |
| (ड) | शांतता क्षेत्र | ५० | ४० |

**टीप–** १. दिवसा म्हणजे सकाळी ६.०० ते रात्री १०.०० पर्यंत

२. रात्री म्हणजे रात्री १०.०० ते सकाळी ६.०० पर्यंत

[८][३. शांतता क्षेत्र म्हणजे रुग्णालये, शैक्षणिक संस्था, न्यायालये, धार्मिक ठिकाणे किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी क्षेत्रे म्हणून घोषित केलेली इतर कोणतीही क्षेत्रे यांच्या सभोवतालच्या १०० मीटरपर्यंतच्या क्षेत्राचा समावेश असलेली क्षेत्रे.]

४. संमिश्र क्षेत्र हे वर नमूद केलेल्या चारपैकी एक क्षेत्र असल्याचे सक्षम प्राधिकरणाकडून घोषित करण्यात येईल.

■

८. स्थायी आदेश १०४६ (ई), दि. २२-११-२००० याद्वारे मूळ मजकुराऐवजी घातला (दि. २२-११-२००० पासून)

* dB(A) Leq म्हणजे ए स्केल या मानवी ऐकण्याशी संबंधित स्केलवरील डेसिबलमधील समग भारित आवाजाची सरासरी पातळी होय.

ए "डेसिबल" हे आवाज मोजण्याचे युनिट आहे.

"ए" डीबी (ए) एलईक्यू मध्ये म्हणजे, विनिर्दिष्ट कालावधीतील आवाजाच्या पातळीचे ऊर्जासाधन.



# मुंबई-पोलीस अधिनियम, १९५१ व ध्वनिप्रदूषण

मुंबई पोलीस अधिनियमाच्या कलम ३३ व कलम ३८ या दोन कलमांमध्ये ध्वनिप्रदूषण या विषयाच्या संबंधातली तरतुदी अंतर्भूत आहेत.

**कलम ३३–**

या कलमाचा खंड (न) हा ध्वनिप्रदूषणासंबंधीची तरतूद करतो. हा खंड पुढीलप्रमाणे आहे :

रस्ते किंवा सार्वजनिक ठिकाणे यांवर किंवा त्यांच्याजवळ संगीत लावणे, ड्रम, टमटम किंवा इतर उपकरणे वाजवणे आणि भोंगे (हॉर्न) किंवा इतर आवाजी उपकरणे वाजवणे किंवा त्यांचा आवाज करणे यासाठी लायसेन्स देणे, त्याचे नियंत्रण करणे किंवा परिसरातल्या रहिवाशांच्या किंवा प्रवाशांच्या होणाऱ्या अडथळ्यांना, गैरसोयीला, त्रासाला, जोखमीला, धोक्याला किंवा हानीला प्रतिबंध करण्यासाठी त्यास प्रतिबंध करणे;

कोणत्याही रस्त्यांवर किंवा सार्वजनिक ठिकाणी त्या भागाच्या परिसरातील लोकांना किंवा प्रवाशांना त्रास होऊ नये म्हणजेच पर्यायाने ते कोणत्याही प्रकारच्या ध्वनिप्रदूषणाचे शिकार ठरू नयेत – यासाठी अशा गोष्टींसाठी लायसेन्स देण्यासाठी म्हणजेच त्याबाबतीत विचारपूर्वकच लायसेन्स दिले जावे, त्यासाठी योग्य नियंत्रण ठेवले जावे, त्यांना प्रतिबंध कशाप्रकारे केला जावा यासाठीची मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्यासाठी या कलमाच्या या खंडाद्वारे तरतूद करण्यात आली आहे.

मोठ्या आवाजात घंटा वाजवणे – मग त्या देवळाच्या घंटा असल्या तरी तसेच, अवेळी लोकांना त्रास होईल अशा प्रकारे वाजवणे हे जरी अपराध या सदरात मोडत असले व त्यासाठी शिक्षेची सोय आहे; मात्र, निव्वळ घंटा वाजवणे यामुळे जरी आवाज निर्माण होत असला तरी तो नेहमीच ध्वनिप्रदूषक व म्हणूनच शिक्षापात्र ठरत नाही असा निर्णय **इम्परर वि. रामकृष्ण, ४० मुंबई, लॉ रिपोर्टर ५१ यामध्ये देण्यात आला आहे.**

चर्च ऑफ गॉड (फूल गॉस्पेल) इन इंडिया विरुद्ध के. के. आर. मॅजेस्टिक कॉलनी वेल्फेअर असोसिएशन (२०००) ७ एससीसी २८२ या प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, आवाज धार्मिक कार्यक्रमांच्या परिणामी निर्माण झालेला असला किंवा तो त्याच्याशी संबंधित असला तरीही न्यायालयाला ध्वनिप्रदूषणाच्या



CamScanner

नियंत्रणाच्या संबंधात निदेश देण्याचा अधिकार आहे. न्यायालयाने पुढे असे म्हटले आहे की –

"प्रार्थना या इतर लोकांच्या शांततेचा भंग करून किंवा ध्वनिवर्धकाच्यामार्फत किंवा जोरजोरात वाद्यांचा गजर करून केली पाहिजे असे कोणताच धर्म सांगत नाही हे अगदी निर्विवाद सत्य आहे. एखाद्या सुसंस्कृत समाजात धर्माच्या नावाखाली, वृद्ध व अगदी लहान वयाच्या मुलांना त्रासदायक ठरणाऱ्या, विद्यार्थ्यांना व इतर सर्वसाधारण कामे करणाऱ्या लोकांना पहाटेच्या शांत झोपेला वंचित करणाऱ्या आणि एकूणच त्रासदायक ठरणाऱ्या कार्यक्रमांना परवानगी देणे आमच्या मते योग्य ठरणारे नाही. परिसरातल्या छोट्या बालकांना शांत वातावरणात झोप घेण्याचा त्यांचा नैसर्गिक हक्क उपभोगता आला पाहिजे हे विसरून चालणार नाही. परीक्षेची तयारी करणाऱ्या मुलांना कोणत्याही अनावश्यक अडथळ्याविना त्यांच्या अभ्यासावर एकाग्र होण्याचा हक्क वापरता आला पाहिजे तसे वयोवृद्ध व्यक्ती व तान्ही बाळे यांना शांत वेळेस शांतपणाने जगण्याचा हक्क वापरता आला पाहिजे. आजारी व्यक्ती, वृद्ध व्यक्ती, लहान मुले ही आवाजाच्या बाबतीत अधिक हळवी असतात त्यांना त्यांच्या आवाजापासून संरक्षण मिळण्याचा हक्क वापरता आला पाहिजे.

पोलीस अधिनियमाच्या कलम ४० मध्येही ध्वनिप्रदूषणाला प्रतिबंध करणारी तरतूद करण्यात आली आहे. ही तरतूद पुढीलप्रमाणे आहे –

**कलम ३८– संगीत, ध्वनी किंवा आवाज चालू राहण्यास प्रतिबंध इत्यादी करण्याचा अधिकार–**

(१) आयुक्ताचे किंवा अधीक्षकाचे, पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याकडून मिळालेल्या अहवालावरून किंवा त्याला मिळालेल्या इतर माहितीवरून असे मत झाले की, लोकांना किंवा त्या जागेच्या सान्निध्यात राहणाऱ्या किंवा तेथे मालमत्ता संपादन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला त्रास, अशांतता, अस्वस्थता, किंवा क्षती निर्माण होण्यापासून किंवा त्रास, अस्वस्थता किंवा क्षती यांची जोखीम निर्माण होण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी तसे निदेश देणे आवश्यक आहे असे त्या आयुक्ताचे किंवा अधीक्षकाचे मत असेल तर कोणत्याही व्यक्तीला–

(अ) कोणत्याही जागेत किंवा जागेवर,

(एक) एखादे गाणे म्हणणे किंवा वाद्य वाजवणे,

(दोन) जे आवाज निर्माण करण्यास किंवा पुन्हा निर्माण करण्यास सक्षम आहे असे वाद्य, उपयंत्र, उपकरण संच किंवा यंत्रक वाजवून, बडवून, एकमेकांवर आपटून, फुंकून किंवा वापरून आवाज निर्माण करणे.

या गोष्टी करण्यास किंवा करणे चालू ठेवण्यास, किंवा

(ब) कोणत्याही जागेवर किंवा जागेत ज्याच्यामुळे आवाज निर्माण होईल किंवा ज्याच्याबरोबर आवाजाचा सहभाग असेल असा कोणताही व्यापार, उपव्यवसाय



किंवा काम करणे.

यास मनाई करण्यासाठी, प्रतिबंध करण्यासाठी, नियंत्रित करण्यासाठी किंवा त्याचे विनियमन करण्यासाठी त्याला आवश्यक वाटतील असे निदेश लेखी आदेशाद्वारे देता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये अधिकारप्राप्त प्राधिकरणाला एकतर स्वतःहून किंवा पोट-कलम (१) अन्वये काढलेल्या आदेशामुळे बाधित झालेल्या कोणत्याही व्यक्तीने केलेल्या अर्जावरून एकतर असा आदेश रद्द करता येईल, त्यात फेरबदल करता येतील किंवा फेरफार करता येतील :

परंतु असे की, असा कोणताही अर्ज निकालात काढण्यापूर्वी उक्त प्राधिकरण त्या अर्जदाराला त्या प्राधिकरणासमोर एकतर व्यक्तिशः स्वतः किंवा प्लीडरमार्फत उपस्थित राहण्याची आणि त्या आदेशाच्या विरोधातली कारणे दाखविण्याची संधी देईल आणि जर त्या प्राधिकरणाने असा कोणताही अर्ज एकतर पूर्णपणे किंवा भागशः फेटाळला तर अशाप्रकारे फेटाळण्याची कारणे लेखी नमूद करील.

पोलीस अधिनियमाचे वरील कलम हे ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीत तरतूद करणारे आणखी एक कलम आहे. आवाज मग तो संगीत किंवा वाद्याचा असो किंवा उद्योग, व्यवसाय व्यापार यांचा किंवा यांच्यामुळे होणारा असो, तो जर एकूणच जनतेला किंवा असा आवाज ज्या ठिकाणी निर्माण केला असेल किंवा निर्माण होत असेल तर अशा ठिकाणाच्या सान्निध्यात राहणाऱ्या लोकांना त्रासदायक, उपद्रवकारक ठरतो, असे आयुक्त किंवा अधीक्षक यांना आढळून आल्यास किंवा त्यांच्याकडे तशी तक्रार आल्यास त्या आवाजाला प्रतिबंध करणारे, त्याला मनाई करणारे किंवा त्याचे नियंत्रण किंवा नियमन करणारे लेखी आदेश काढून संबंधित व्यक्तीला योग्य ते निदेश देण्याचा अधिकार या कलमाद्वारे अशा अधिकाऱ्यांना देण्यात आला आहे.

मुंबई पोलीस अधिनियमातली ही तरतूद ध्वनिप्रदूषणग्रस्त व्यक्तींना दिलासा देणारी अशीच आहे.

## मुंबई पोलीस अधिनियमाच्या कलम ३३ खालील नियम इत्यादींच्या उल्लंघनाच्या बाबतीत शास्तीची तरतूद

पोलीस अधिनियमाच्या कलम १३१ मध्ये या अधिनियमाच्या कलम ३३ खाली ज्या विविध विषयांवर नियम करण्यात आलेले आहेत त्यांचे पालन होणे गरजेचे आहे आणि जर त्या नियमांचे उल्लंघन झाले तर त्यासाठी अपराध्याला करावयाच्या शिक्षेची तरतूद या कलमान्वये करण्यात आली आहे.

कलम ३३ च्या खंड (न) अन्वये ध्वनिप्रदूषणाच्या संबंधात तरतूद करणारे नियम करण्याचा अधिकार शासनाला देण्यात आला असून, या खंड (न) च्या तरतुदी आपण यापूर्वीच पाहिल्या आहेत. या संबंधातल्या नियमांच्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या



CamScanner

व्यक्तीस द्यावयाची शिक्षा पुढीलप्रमाणे -

"क. १३१ - कलमं ३३ खालील नियम इ. उल्लंघनासाठी शास्ती - कलम १३१ अ मध्ये तरतूद करण्यात आली असेल तेखेरीज करून जो कोणी-

(अ) कलम ३३ अन्वये करण्यात आलेल्या कोणत्याही नियमाचे किंवा आदेशाचे किंवा अशा नियमाच्या किंवा आदेशाच्या अन्वये देण्यात आलेल्या लायसेन्सच्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करील; किंवा

(तीन) उल्लंघन केलेला नियम किंवा आदेश किंवा ज्या अन्वये उक्त लायसेन्स देण्यात आले होते तो नियम किंवा आदेश हा कलम ३३ च्या खंड (न) आणि (ओ) अन्वये करण्यात आला असेल तर त्यासाठी पाच हजार रुपयांपर्यंत असू शकेल* इतक्या दंडाची शिक्षा होईल.

ध्वनिप्रदूषणासाठी कलम ३३ (१) (न) खालील तरतुदीच्या भंगासाठी ही तरतूद आहे.

पोलीस अधिनियम, १९५१ याचे कलम ३८ हे सुद्धा ध्वनिप्रदूषणाच्या संबंधातले आहे. ध्वनिप्रदूषण पुढे चालू ठेवण्यास कायद्याने प्रतिबंध असल्याबाबतची आहे व या तरतुदीचा भंग झाल्यास कोणती शिक्षा होऊ शकते याची तरतूद या अधिनियमाच्या कलम १३६ मध्ये करण्यात आली आहे. हे कलम १३६ पुढीलप्रमाणे आहे -

**कलम १३६- कलम ३८ अन्वये करण्यात आलेल्या नियम इत्यादींचा भंग केल्यास होणारी शास्ती-**

जो कोणी कलम ३८ अन्वये कायदेशीरपणे दिलेल्या कोणत्याही निदेशाचे पालन करणार नाही किंवा त्यांचे अनुपालन न करण्याची प्रेरणा देईल त्याला अपराध सिद्ध झाल्यावर तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा पाच हजार रुपयांपर्यंत* असू शकेल इतक्या दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

शिक्षेची तरतूद करणारे हे कलम पुरेसे स्पष्ट असेच आहे, त्यामुळे त्याचे आणखी विवरण देण्याची आवश्यकता नाही.

■

* सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ४० याचा कलम २७ (५) द्वारे "रुपये दोन हजारपर्यंत असू शकेल" या मजकुराऐवजी दि. १-१०-२००० पासून हा मजकूर घालण्यात आला.



# मोटार वाहन अधिनियम व मोटार वाहन नियम व ध्वनिप्रदूषण

देशातील रस्त्यावरील वाहतूक तंत्रामध्ये झालेले बदल, प्रवाशांचे स्वरूप, मालाची ने-आण, देशातील रस्त्यांच्या जाळ्यांचा विकास आणि विशेषत: मोटार वाहन व्यवस्थापन तंत्रामध्ये झालेली सुधारणा या गोष्टी विचारात घेऊन या अधिनियमामध्ये सुधारणा करण्याची गरज जाणवत होती व त्यामुळे या सुधारणा करण्यासाठी समिती स्थापन करण्यात आली. राष्ट्रीय परिवहन धोरण समिती, राष्ट्रीय पोलीस आयोग, रस्ता सुरक्षा समिती, कमी ऊर्जेवरच्या दुचाकी वाहनांची समिती व विधिआयोग यांसारख्या विविध समित्यांनी रस्त्यावरील वाहतुकीच्या विविध बाजूंवर विचार केला आणि पुढील गोष्टींच्या संबंधात सुधारणा सुचविल्या-

१) देशात वेगाने वाढत जाणारी व्यापारी व तसेच खाजगी वाहनांची संख्या.
२) स्वयंचलित क्षेत्रामध्ये उच्च तंत्रज्ञानाचा स्वीकार करण्यास प्रवृत्त करण्याची गरज.
३) प्रवासी व मालवाहतूक यांच्या प्रचंड प्रमाणातील वाहतुकीमुळे वेटाच्या आकाराचे वेगळे भाग न पाडल्यामुळे निर्माण झालेला वाहतुकीचा असमतोल.
४) रस्ता सुधारणा दर्जा आणि प्रदूषण नियंत्रण उपाययोजना.
५) परिवहनाची कार्यपद्धती सोपी करणे.
६) वाहतूकविषयक गुन्हेगारांना शोधून काढण्यासाठी प्रभावी उपाययोजना.

वरीलपैकी प्रदूषण नियंत्रण उपाययोजना ही बाब आपल्या या विषयाशी संबंधित अशी आहे. मोटार वाहनांमुळे बाहेर फेकला जाणारा धूर, धूळ आणि वाफ यांप्रकारे प्रदूषक हे हवा प्रदूषित करतात. त्यामुळे रस्त्यावरील वाहनांना हवेच्या प्रदूषणाचे फार मोठे साधन मानले जाते, मात्र या प्रदूषणाबरोबरच वाहनांमुळे ध्वनिप्रदूषणही मोठ्या प्रमाणात निर्माण केले जाऊ शकते व तसे ते केले जाऊ नये म्हणून या अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांमध्ये तरतूद करण्यात आली आहे.

वाहनांद्वारे होणारे ध्वनिप्रदूषण हे दोन प्रकारचे असते. पहिले म्हणजे वाहनाचे हॉर्न निर्माण करीत असलेले प्रदूषण. अतिजोरात वाजणारे, चित्रविचित्र आवाज निर्माण करणारे, कर्कशपणे वाजणारे तसेच अनावश्यक इतक्या वेळा व अनावश्यक ठिकाणी वाजणारे वाहनांचे भोंगे (हॉर्न) हे जसे वाहतुकीवर वाईट परिणाम करतात, चालकांचे किंवा पादचाऱ्यांचे चित्त विचलित करण्यास किंवा त्यांना चुकीचा संदेश देण्यास कारणीभूत



CamScanner

ठरतात, तसेच ते ध्वनीचा वातावरणावर होणारा परिणाम अधिक तीव्र, अधिक घातक करण्यासही कारणीभूत ठरतात. वाहनांच्या भोंग्याचा योग्य प्रकारे, योग्य ठिकाणी व योग्य तितकाच वापर करणे हे त्यासाठी आवश्यक आहे. भोंग्यांचा वापर अधिक चांगल्या पद्धतीने करता यावा म्हणून काही मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यानुसार वेगवेगळ्या प्रकारच्या वाहनांसाठी वेगवेगळ्या प्रकारे आणि विशिष्ट संदेश सूचित करणारे भोंगे बसविण्याची शिफारस केली आहे आणि त्यासाठी केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ मध्ये पुढील नियम ११९ समाविष्ट करण्यात आला आहे.

### "११९. भोंगे (हॉर्न)

(१) केंद्रीय मोटार वाहन (सुधारणा) नियम, १९९९ यांच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्ष समाप्त झाल्यावर व त्यानंतर प्रत्येक मोटार वाहनाला भारतीय मानक संस्थेने विनिर्दिष्ट केलेल्या आय एस १८८४-१९९२ याच्या आवश्यकतांशी अनुरूप असा इलेक्ट्रिक हॉर्न किंवा अन्य साधन, वाहनाच्या चालकाच्या वापरासाठी आणि वाहनाचा रोख किंवा स्थिती कशी आहे हे आवाजाद्वारे व पुरेतेपणाने जाणवून देण्यासाठी बसविण्यात यावे.

(२) कोणत्याही मोटार वाहनाला वेगवेगळे आवाज निर्माण करणारा बहुविध आवाजाचा भोंगा किंवा अनावश्यक कठोर, कर्कश, मोठ्या किंवा भीतिदायक आवाज निर्माण करणारे साधन बसवू नये.

(३) पोटनियम (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही ॲम्ब्युलन्स म्हणून किंवा अग्निशमनासाठी किंवा आपत्तिनिवारण प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांवर किंवा पोलीस अधिकारी किंवा मोटार वाहन विभागाचे अधिकारी त्यांच्या कर्तव्यपालनाच्या प्रयोजनासाठी वापरतात अशा वाहनावर, अशी वाहने ज्याच्या अधिकारितेमध्ये ठेवण्यात येतात अशा क्षेत्राच्या नोंदणी प्राधिकरणाने मान्यता दिली असेल असे आवाजी सिग्नल बसविण्यास प्रतिबंध होणार नाही."

हा नियम पूर्वी थोड्या वेगळ्या स्वरूपात होता. आता १८ मार्च, १९९९ पासून तो या स्वरूपात अमलात आला आहे. वाहतूक सुरळीतपणे चालणे, सर्वच वाहनांच्या चालकांना वाहन चालनासाठी योग्य ते निदेशन केवळ भोंग्यांचे स्वरूप, वाजण्याची पद्धत यामुळे ज्ञात होणे व त्यामुळे त्यांना वाहन चालविणे अधिक सोपे ठरणे हे जसे या नियमाचे वैशिष्ट्य आहे, त्याचप्रमाणे आवाजाचे स्वरूप त्याची पातळी ही पर्यावरणाला आणि पर्यायाने आजूबाजूला वावरणाऱ्या माणसांना घातक ठरणारी नसावी, त्यांचा घातक परिणाम पर्यावरणावर आणि मानवी जीवनावर होऊ नये यासाठी हा सुधारित नियम तयार करण्यात आला असून तो ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यास मदत करणाराच आहे. वाहनातून आवाज निर्माण होण्याचा दुसरा प्रकार म्हणजे त्याच्या इंजिनचा भाग. वाहन सुरू करताना, ते चालवित असताना त्या दरम्यान किंवा वाहन एक जागी इंजिन चालू स्थितीत थांबले असतानाही विशिष्ट प्रकारचा आवाज येतो. वाहनाच्या इंजिनात दोष



असेल तर किंवा अन्य काही कारणाने बऱ्याचदा असा आवाज त्रासदायक पातळीपर्यंत जाऊ शकतो व त्यामुळे ध्वनिप्रदूषणाचे दुष्परिणाम संबंधित व्यक्तींना भोगावे लागतात. मोटारीत/वाहनात सायलेन्सर बसवून या आवाजावर नियंत्रण ठेवणे शक्य असते. म्हणून यासंबंधीची तरतूद वरील केंद्रीय नियमांच्या नियम १२० मध्ये केली आहे तो नियम –

### "१२०. सायलेन्सर (आवाज कमी करणारे साधन)

(१) प्रत्येक मोटार वाहनाला, विस्तार चेंबरच्या मदतीने किंवा अन्य प्रकारे व्यवहार्य होईल तितका, इंजिनमधून बाहेर पडणाऱ्या गॅसमुळे निर्माण होणारा आवाज कमी करणारे (यात यापुढे सायलेन्सर म्हणून निर्देश केलेले) साधन बसविण्यात आले पाहिजे.

(२) **आवाजाची मानके–** प्रत्येक मोटार वाहन खालील तक्त्यात दर्शवण्यात आल्याप्रमाणे असलेल्या आवाजाच्या मानकाशी अनुरूप इतकाच आवाज निर्माण करील, अशाप्रकारे बांधण्यात आले पाहिजे आणि त्याचप्रमाणे त्यांची देखभाल ठेवण्यात आली पाहिजे, आणि या मानकांची भारतीय मानके आय. एस. : ३०२८-१९८० अनुसार चाचणी घेण्यात आली पाहिजे.

## वाहनांच्या आवाजाची अनुज्ञेय मानके

अ. मोकळ्या मैदानात ७.५ मीटरांवर, निर्मितीच्या टप्प्यावरील स्वयंचलित गाड्यांसाठी आवाजाची मर्यादा डीबी (ए) मध्ये

| | |
|---|---|
| (अ) मोटार सायकल, स्कूटर आणि तिचाकी वाहने | ८० |
| (ब) प्रवासी गाडी | ८२ |
| (क) ४ एमटी पर्यंतची प्रवासी किंवा व्यापारी वाहने. | ८५ |
| (ड) ४ एमटी च्या वरच्या आणि १२ एमटी पर्यंतची प्रवासी किंवा व्यापारी वाहने | ८९ |
| (ई) १२ एमटीच्या वरची प्रवासी किंवा व्यापारी वाहने | ९१ |

*[अअ. वाहनांसाठी निर्मितीच्या टप्प्यावर आवाजाची मर्यादा अनुसरावयाची चाचणी. आयएस ३०२८-१९९८ ही असेल.

(१) वाहनाला निर्मितीच्या टप्प्यावर लागू असलेली आवाजाची मर्यादा २००३ या वर्षापासून लागू असेल.

| अनु-क्रमांक | वाहनाचा प्रकार | आवाजाची पातळी डीबी(ए) | कार्यान्वियनाची तारीख |
|---|---|---|---|
| १. | दोनचाकी डिस्प्लेसमेंट ८० सें.मी. पर्यंत | ७५ | |

* ही सुधारणा जी. एस. आर. ७४२ (ई) दि. २५-९-२००० याऐवजी जीएसआर ८४९ (ई) दि. ३०/१२/२००२ द्वारे (३०/१२/२००२ पासून) घालण्यात आली.

| | | | |
|---|---|---|---|
| | डिस्प्लेसमेंट ८० सें.मी. पेक्षा अधिक परंतु १७५ सें.मी. पर्यंत | ७७ | १ जानेवारी २००३ |
| | डिस्प्लेसमेंट १७५ सें.मी. पेक्षा अधिक | ८० | |
| २. | तीनचाकी | | |
| | डिस्प्लेसमेंट १७५ सें.मी. | ७७ | |
| | डिस्प्लेसमेंट १७५ सें.मी. पेक्षा अधिक | ८० | १ जानेवारी २००३ |
| ३. | प्रवासी गाडी (कार) | ७५ | १ जानेवारी २००३ |
| ४. | प्रवासी किंवा व्यापारी वाहने | | |
| | स्थूल वाहन वजन ४ टनांपर्यंत | ८० | |
| | स्थूल वाहन वजन ४ टनांपेक्षा अधिक परंतु १२ टनांपर्यंत | ८३ | १ जुलै २००३ |
| | स्थूल वाहन वजन १२ टनांपेक्षा अधिक | ८५ | |

(२) १ एप्रिल २००५ रोजी आणि तेव्हापासून निर्मितीच्या टप्प्यात वाहनाला लागू असलेल्या आवाजाच्या मर्यादा

| अनु-क्रमांक | वाहनाचा प्रकार | आवाजाची मर्यादा डीबी (ए) |
|---|---|---|
| १.० | दोन चाकी | |
| १.१ | डिस्प्लेसमेंट ८० सी सी पर्यंत | ७५ |
| १.२ | डिस्प्लेसमेंट ८० सी सी पेक्षा अधिक परंतु १७५ सी सी पर्यंत | ७७ |
| १.३ | डिस्प्लेसमेंट १७५ सी सी पेक्षा अधिक | ८० |
| २.० | तीनचाकी | |
| २.१ | डिस्प्लेसमेंट १७५ सीसी | ७७ |
| २.२ | डिस्प्लेसमेंट १७५ सी सी पेक्षा अधिक | ८० |
| ३.० | प्रवाशांना वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारी चालकाच्या आसनासह नऊपेक्षा अधिक आसने नसलेली वाहने | ७४ |
| ४.० | प्रवाशांना वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारी, चालकाच्या आसनासह नऊपेक्षा अधिक आसने असलेली, आणि कमाल स्थूल वाहन वजन ३.५ टनांपेक्षा अधिक असलेली वाहने. | |
| ४.१ | इंजिनशक्ती १५० कि. वॅ. पेक्षा कमी असलेली | ७८ |
| ४.२ | इंजिनशक्ती १५० कि. वॅ. व त्यापेक्षा अधिक असलेली | ८० |
| ५.० | प्रवाशांना वाहून नेण्यासाठी वापरण्यात येणारी, चालकाच्या आसनासह नऊपेक्षा अधिक आसने असलेली : माल वाहून नेण्यासाठी वापरण्यात येत असलेली वाहने. | |
| ५.१ | कमाल स्थूलवाहन वजन २ टनांपेक्षा अधिक असलेली | ७६ |
| ५.२ | कमाल स्थूलवाहन वजन ३ टनांपेक्षा अधिक परंतु ३.५ टनांपेक्षा अधिक नसलेली | ७७ |
| ६.० | मालवाहतुकीसाठी वापरण्यात येणारी, कमाल स्थूल वाहन वजन ३.५ टनांपेक्षा अधिक नसलेली वाहने | |
| ६.१ | इंजिनशक्ती ७५ कि. वॅ. पेक्षा कमी असलेली | ७७ |
| ६.२ | इंजिनशक्ती ७५ पेक्षा अधिक परंतु १५० कि. वॅ. पेक्षा कमी असलेली | ७८ |
| ६.३ | इंजिनशक्ती १५० कि. वॅ. किंवा त्यापेक्षा अधिक असलेली. | ८०] |

*[परंतु असे की, अनुक्रमांक ३.० ते ६.३ येथे नमूद करण्यात आलेल्या वाहनांसाठी पुढील राज्यांसाठीची आवाजाच्या मर्यादेसाठी लागू असलेली तारीखही त्यांच्यासमोर विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या तारखेला आणि त्या तारखेपासून सुरू होईल,

(एक) हिमाचल प्रदेश, १ ऑक्टोबर, २००५ पासून

(दोन) जम्मू व काश्मीर, १ ऑक्टोबर, २००५ पासून

(तीन) मध्यप्रदेश, १ सप्टेंबर, २००५ पासून

(चार) पंजाब, १ ऑक्टोबर, २००५ पासून

(पाच) राजस्थान, १ जून, २००५ पासून

(सहा) उत्तर प्रदेश, (मथुरा, कनुज, मुजफ्फरनगर, अलिगड, फरुखाबाद,

* हा मजकूर जी. एस. आर. २७२ (ई), दिनांक ५/५/२००५ द्वारे (५ मे २००५ पासून) समाविष्ट करण्यात आला.





CamScanner

सहारनपूर, बादौन, बरैली, मोरादाबाद, हथरस, रामपूर, बिजनोर, आग्रा, पिलिभित, ज. पी. नगर, माईनपुरी, ललितपूर, हर्डोई, फिरोजाबाद, झांसी, शहाजहानपूर, एटवा, जलोन, लक्ष्मीपूर खेरी, इटाह, महोबा व सितापूर), १ जून २००५ पासून.

(सात) उत्तरांचल, १ जुलै, २००५]

## शांतता झोन/क्षेत्र

ध्वनिप्रदूषण (विनियमन व नियंत्रण) नियम, २००० याच्या नियम ६ मधील तरतुदीनुसार जो कोणी, शांतताक्षेत्रात समाविष्ट असलेल्या ठिकाणी कोणतेही संगीत लावणे किंवा कोणत्याही ध्वनिवर्धक यंत्राचा वापर करणे, ड्रम किंवा टमटम वाजवणे किंवा संगीतयुक्त किंवा दाबयुक्त हॉर्न वाजवणे, गर्दीला आकर्षित करील अशा स्वरूपाची नक्कल किंवा इतर कार्यक्रम करणे यांपैकी कोणताही अपराध करील, तो त्या अपराधासाठी शास्तीला पात्र ठरेल.

हा शांतता झोन किंवा शांतताक्षेत्र कोठे असते याचा आपण थोडा विचार करू. रुग्णालये, शैक्षणिक संस्था व न्यायालये यांच्या परिसरातले विनिर्दिष्ट करण्यात येईल असे किमान १०० मीटरपेक्षा कमी नसेल असे क्षेत्र हे शांतताक्षेत्र असेल. यावरून हे स्पष्ट होते की, जेथे मोठा आवाज झाला तर रुग्णालयातील रुग्णांच्या आरोग्यासाठी तो घातक ठरू शकतो त्यामुळे रुग्णाला त्रास होऊ शकतो. त्यांना शांत झोपणे अशक्य होऊ शकते व त्यांच्या आजाराचे प्रमाण वाढूही शकते. म्हणून या भागाला शांतता मिळणे रुग्णाच्या व उपचारकांच्याही दृष्टीनेही गरजेचे असते, शाळा व न्यायालये येथेही गोंगाटपूर्ण आवाजामुळे शिक्षणाच्या किंवा न्यायदानाच्या कामासाठी आवश्यक असलेली शांतता राखण्यासाठी ही क्षेत्रे शांतताक्षेत्रे ठरविण्यात आली आहेत व यामध्ये मोटार वाहन नियमांतर्गत व हॉर्नवर असलेल्या बंधनाचा या क्षेत्रात असतानाही अमल असणे गरजेचे आहे म्हणूनच अशा शांतताक्षेत्राच्या ठिकाणी गाडीचा भोंगा शक्यतो न वाजवण्याविषयीच्या सूचना लावलेल्या दिसतात व त्याचा भंग करणे हे शिक्षेस पात्र ठरू शकते.

## भारतीय दंड संहिता, १८६० याखालील ध्वनिप्रदूषणाच्या संबंधातील शास्तीच्या तरतुदी.

भारतीय दंड संहितेमध्ये विविध अपराधांच्या संबंधात विविध तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. त्यापैकी कलमे २६८, २९० आणि २९१ यांमधील तरतुदी या ध्वनिप्रदूषणाच्या संबंधातल्या आहेत. ही कलमे पुढीलप्रमाणे आहेत –

## कलम २६८– सार्वजनिक उपद्रव–

ज्यामुळे सर्वसाधारण जनतेला किंवा त्या क्षेत्राच्या आजूबाजूच्या क्षेत्रात राहणाऱ्या किंवा तेथे वहिवाट असणाऱ्या सर्व लोकांना, सामायिकपणे क्षती पोहोचते किंवा धोका



निर्माण होतो किंवा त्रास होतो किंवा अशा लोकांना कोणताही सार्वजनिक हक्क वापरण्याचा प्रसंग येईल अशावेळी अशा व्यक्तींना क्षती, अटकाव, धोका किंवा त्रास होणे अपरिहार्य आहे अशी कोणतीही कृती करणारी किंवा अशा कोणत्याही अवैध अकृतीबद्दल दोषी असणारी व्यक्ती सार्वजनिक उपद्रवाबद्दल दोषी असेल.

सामायिक उपद्रवामुळे काही सोय किंवा फायदा होतो या कारणावरून तो माफ होत नाही. हे कलम सार्वजनिक उपद्रव म्हणजे काय, याचा तपशील देणारे सार्वजनिक उपद्रवाचा अर्थ सांगणारे कलम आहे. एखाद्या व्यक्तीच्या एखाद्या कृतीमुळे सर्वसाधारण जनतेला किंवा त्या क्षेत्रात राहणाऱ्या किंवा मालमत्ता धारण करणाऱ्या लोकांना उपद्रव पोहोचत असेल तर असा उपद्रव हा सार्वजनिक प्रमाणातील, मोठ्या प्रमाणातील उपद्रव ठरतो. तसेच एखाद्या व्यक्तीने एखादी कृती करणे अपेक्षित असताना ती करण्याचे टाळल्यामुळे जर सर्वसाधारण जनतेला किंवा त्या व्यक्तीच्या आजूबाजूला राहणाऱ्यास उपद्रव किंवा त्रास पोहोचत असेल तर तो सार्वजनिक उपद्रव ठरतो. तसेच सर्वसाधारण जनतेला आपला सामुदायिक अधिकार उपभोगणे ज्यामुळे अशक्य किंवा अडचणीचे ठरते असा उपद्रव हा सार्वजनिक उपद्रव ठरतो. या ठिकाणी सार्वजनिक उपद्रव किंवा त्रास हा ध्वनिप्रदूषणाच्या कारणाने निर्माण होणाराही असू शकतो. उदा. एखाद्या धार्मिक विधीच्या किंवा विवाहादी समारंभांच्या निमित्ताने जर ध्वनिक्षेपकाचा फार मोठ्या आवाजात आणि रात्रंदिवस अगदी वेळेचा विचार न करता वापर करणे हे सार्वजनिक उपद्रवाच्या व्याख्येत बसू शकते किंवा एखाद्या अशा समारंभात विचारात घ्यावयाची आवाजाच्या पातळीची मर्यादा न पाळणे किंवा अशा आवाजाच्या बाबतीत वेळेचे बंधन न पाळणे हे सार्वजनिक उपद्रव या संज्ञेच्या कक्षेत येणारे ठरू शकते व म्हणून ते भारतीय दंड संहितेच्या तरतुदींनुसार शिक्षायोग्य ठरू शकते.

## कलम २९० – ज्यासाठी अन्यप्रकारे तरतूद करण्यात आलेली नाही अशा सार्वजनिक उपद्रवासाठी शिक्षा–

जी कोणी व्यक्ती या संहितेच्या तरतुदीनुसार अन्य प्रकारे शिक्षापात्र नसलेल्या बाबतीत सार्वजनिक उपद्रव करील तिला दोनशे रुपयांपर्यंत असू शकेल अशा द्रव्यदंडाची शिक्षा होईल.

ध्वनिप्रदूषण हे सार्वजनिक उपद्रव किंवा सार्वजनिक किंवा समूहाला दिलेला उपद्रव किंवा त्रास या सदरात बसते व त्यामुळे त्याच्या बाबतीत शिक्षा काय करावी, असा प्रश्न असल्यास अशी शिक्षा या कलमानुसार करता येईल. ज्यासाठी दुसरी कोणतीही विशिष्ट प्रकारची तरतूद नसेल अशा बाबतीत या कलमान्वये शिक्षा फर्मावता येते व अशी शिक्षा ही उपद्रव करणाऱ्या व्यक्तीला जास्तीत जास्त दोनशे रुपयांपर्यंतची शिक्षा करता येते. म्हणून ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीत शिक्षा देताना या कलमाचा आधार घेता येईल.

ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीत ध्वनिप्रदूषण नियमात कोणतीही स्वतंत्र तरतूद केलेली नसून, पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ यामध्ये जी शिक्षेच्या संबंधातली तरतूद



CamScanner

करण्यात आलेली आहे तीच तरतूद ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीतही वापरावयाची आहे. या तरतुदीचे तपशील आपण अन्यत्र पाहू. या ठिकाणी फक्त अन्य तरतुदी लागू नसतील किंवा त्या लागू होत नसतील तर या कलमाचा ध्वनिप्रदूषणाच्या संबंधात उपयोग करून घेता येईल.

**कलम २९१– उपद्रव थांबवण्याच्या बाबतीत व्यादेश काढल्यानंतरही तो उपद्रव चालू ठेवणे–**

सार्वजनिक उपद्रव पुन्हा करू नये याविषयी किंवा तो चालू ठेवण्यात येऊ नये याविषयी व्यादेश काढण्याचा ज्याला कायदेशीर अधिकार आहे अशा कोणत्याही लोकसेवकाने असा व्यादेश काढलेला असतानाही जो कोणी अशा उपद्रवाची पुनरावृत्ती करील किंवा तो करणे चालू ठेवील त्याला, सहा महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या साध्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा दोन्ही शिक्षा होतील.

वरील तरतूद एखादा उपद्रव सतत करीत राहण्याच्या संबंधातली आहे. कलम २९० हे एखाद्या सार्वजनिक उपद्रवाच्या संबंधात करावयाच्या शिक्षेची म्हणजेच दंडाच्या स्वरूपातील शिक्षेची तरतूद करण्यात आलेली आहे तर त्यानंतरही असा उपद्रव करणे चालूच राहिले तर तसे करण्यात येऊ नये यासाठी व्यादेश काढण्यासाठी लोकसेवकांना कायदेशीर अधिकार देण्यात आले आहेत आणि त्या अधिकाऱ्यांनी काढलेल्या कायदेशीर व्यादेशाचे पालन करण्यात आले नाही तर म्हणजे उपद्रवकारक कृतीची पुनरावृत्ती करण्यात आली तर अशा बाबतीत तुरुंगवास किंवा दंड किंवा या दोन्ही शिक्षा देण्यासंबंधीची ही तरतूद आहे.

**भारताचे संविधान आणि ध्वनिप्रदूषण**

ध्वनिप्रदूषणविषयक आरोपांच्या बाबतीत बऱ्याचदा संविधानाने दिलेल्या अधिकारांचा आधार घेण्याचा प्रयत्न केला जातो मात्र असा आधार नेहमीच समर्थनीय ठरत नाही. त्याचा वापर योग्य तो सारासार विचार करूनच करणे गरजेचे आहे. संविधानाच्या या बाबतीतल्या तरतुदींचा थोडक्यात आढावा घेतल्यास ही गोष्ट स्पष्ट होईल.

भारताच्या संविधानाच्या भाग तीनमधील अनुच्छेद १९ हा मूलभूत हक्क देणारा अनुच्छेद असून, अनुच्छेद १९ चा खंड (१) पुढीलप्रमाणे आहे–

**"स्वातंत्र्याचा हक्क**

१९. (१) सर्व नागरिकांस –

(अ) भाषण व अभिव्यक्ती यांच्या स्वातंत्र्याचा;

(ब) शांततेने व विनाशस्त्र एकत्र जमण्याचा;

(क) अधिसंघ वा संघ बनविण्याचा;

(ड) भारताच्या राज्यक्षेत्रात सर्वत्र मुक्तपणे संचार करण्याचा;



(ई) भारताच्या राज्यक्षेत्राच्या कोणत्याही भागात राहण्याचा व स्थायिक होण्याचा; आणि

(फ) * * *

(ग) कोणताही पेशा आचरण्याचा अथवा कोणताही व्यवसाय, व्यापार किंवा धंदा करण्याचा **हक्क असेल."**

भारताच्या नागरिकांना स्वतंत्रपणे, शांततेने जगण्याचा आपला धर्म, पंथ, रीतिरिवाजांचे पालन करण्याचा हक्क देणाऱ्या या अनुच्छेदाचा अनेकदा अनेक अभिव्यक्तींच्या संदर्भात आधार घेतला जातो. मात्र हा अनुच्छेद कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही प्रकारे अनिर्बंध वागण्याचा, इतरांच्या स्वातंत्र्याचा विचार न करता केवळ स्वतःपुरतेच स्वातंत्र्य उपभोगण्याचा अधिकार देत नाही, म्हणूनच, इतरांना त्रासदायक ठरेल, उपद्रवकारक ठरेल किंवा त्याच्या शांतपणे व आरोग्यपूर्ण जीवन जगण्यास प्रतिबंध करणारे ठरेल अशाप्रकारे ध्वनिप्रदूषण करणाऱ्या व्यक्तीला – मग असे प्रदूषण तिच्या धर्माचरणाच्या संबंधातले असेल किंवा तिच्या – व्यवसाय-पेशातून उद्भवलेले असले तरी या अनुच्छेदाचे संरक्षण मागता येणार नाही.

संविधानाचे अनुच्छेद २५ व २६ हे धर्माचरणाच्या स्वातंत्र्याचा हक्क देतात. अनुच्छेद २५ – "सदसद्विवेकबुद्धीचे स्वातंत्र्य आणि धर्माचे मुक्त प्रकटीकरण, आचरण व प्रचार करण्याचा हक्क" देतो तर अनुच्छेद २६ "धर्मविषयक व्यवहारांची व्यवस्था पाहण्याचे स्वातंत्र्य" देतो. या अनुच्छेदांनुसार प्रत्येक नागरिकास आपल्या धर्माचे आचरण, प्रकटण करण्याचा पूर्ण हक्क आहे, तसेच त्याला धर्मविषयक व्यवहार मुक्तपणे करण्याचे स्वातंत्र्य आहे. मात्र यामुळे कोणतीही व्यक्ती इतरांना, आजूबाजूच्या क्षेत्राला त्रासदायक ठरेल अशाप्रकारे धर्माच्या नावाखाली कोणतेही ध्वनिप्रदूषण करीत असेल तर त्या व्यक्तीला या अनुच्छेदाचे संरक्षण असणार नाही. या बाबतीत **दिल्ली उच्च न्यायालयाचा फ्री लीगल एड वि. नॅशनल कॅपिटल टेरिटरी, एआयआर २००१ दिल्ली ४३५ (२००१) ९३ डीएलटी २८** यामधील निर्णय विचारात घेणे गरजेचे आहे. उच्च न्यायालयाने याबाबतीत असे म्हटले आहे की, "देवाचे मंदिर हे शांत व गोंगाटमुक्त ठेवले पाहिजे. सार्वजनिक ठिकाणी घेतलेली बैठक ही धार्मिक कारणासाठी आहे म्हणून त्याला परवानगी नाकारता येणार नाही. संविधानाच्या अनुच्छेद २५ ची तरतूद विचारात घेऊनच हा निर्णय घेण्यात आला. सर्वोच्च न्यायालयापुढील **चर्च ऑफ गॉड (फुल गॉस्पेल) इन इंडिया वि. केकेआर मॅजेस्टिक कॉलनी वेल्फेअर असोसिएशन, एआयआर २००० एससी २७७३ = २००० (७) एससीसी २८१** या प्रकरणात हाच प्रश्न निर्माण करण्यात आला होता. मद्रास उच्च न्यायालयाने **अप्पा राव, मद्रास राज्य वि. गव्हर्नमेंट ऑफ तामिळनाडू, १९९५ डीएलडब्ल्यू ३११ (मद्रास)** या प्रकरणात असे निदेश दिले होते की, आवाजाची पातळी कमी करण्यासाठी उपाय योजणे आवश्यक आहे. उच्च न्यायालयाच्या या निर्णयामुळे नाराज झाल्यामुळे सर्वोच्च

मिक्सर, क्रेन (हलविता येणारी), व्हायब्रेटर्स
आणि करवत ७५ डीबी (ए)

[1][फटाक्यांसाठी आवाजाची मानके

अ. (एक) फटाके लावण्याच्या ठिकाणापासून ४ मीटर्सपर्यंतच्या अंतरावर १२५ डीबी (ए१) किंवा १४५ डीबी (सी) पीके पेक्षा अधिक आवाजाचे असणारे फटाके निर्माण करणे, त्यांची विक्री करणे किंवा वापर करणे यास मनाई आहे.

(दोन) वैयक्तिक फटाके लावणाऱ्यांसाठी फटाक्यांच्या माळा लावण्यासाठी वर नमूद केलेल्या मर्यादेपेक्षा ५ लॉग$_{10}$ (एन) डीबी ने कमी असेल.

एन = एकत्र जोडलेल्या फटाक्यांची संख्या.

ब. फटाक्यांपासून निर्माण होणारा आवाज मोजण्यासाठी काही स्थूल आवश्यकता–

(एक) किमान ५ मीटर व्यासाच्या किंवा त्याला समतुल्य अशा कठीण क्राँक्रीट पृष्ठभागावर मोजमाप करण्यात यावे.

(दोन) मोजमाप मोकळ्या क्षेत्रावर करण्यात येईल. म्हणजेच फटाके लावण्याच्या जागेपासून १५ मीटरपर्यंतच्या अंतरावर कोणताही परावर्तक पृष्ठभाग असणार नाही.

(तीन) मोजमाप आवाजाच्या मान्यताप्राप्त लेवल मीटरद्वारे करण्यात येईल.

क. स्फोटके विभाग या मानकांच्या कार्यान्वयनाची खात्री करून घेईल.

**टीप** – डीबी (ए १) : ए. मोजलेली विस्पंद (impulse) ध्वनी भार पातळी डेसिबलमध्ये.

डीबी (सी) पीके : सी – मोजलेली शिखाध्वनी भारपातळी डेसिबल मध्ये]

[2][९४. डिझेलवर चालणाऱ्या जनरेटरसंचासाठी ध्वनिमर्यादा

१. [3][दि. १ जानेवारी, २००५] रोजी किंवा त्यानंतर निर्माण केलेल्या (१००० केव्हीए पर्यंतच्या) डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांची आवाजाची मर्यादा.

[3][दि. १ जानेवारी, २००५] रोजी किंवा त्यानंतर निर्माण केलेल्या, निर्धारित क्षमता १००० केव्हीए पर्यंत असणाऱ्या डिझेलवर चालणाऱ्या नवीन जनरेटरची कमाल अनुज्ञेय ध्वनिभार पातळी कुंपण पृष्ठभागापासून १ मीटरावर ७५ डीबी (ए) इतकी असेल. डिझेल जनरेटर संचांना त्यांच्या निर्मितीच्या टप्प्यावर असतानाच अविभाज्य ध्वनिक (acoustic) कुंपण पुरविण्यात आले पाहिजे.

डिझेल जनरेटर संचाच्या बाबतीतील या ध्वनिमर्यादांचे कार्यान्वयन खालील परिच्छेद ३ मध्ये देण्यात आलेल्या पद्धतीने नियमित करण्यात येईल.

१. जी. एस. आर. ६८२ (ई), दिनांक ५ ऑक्टोबर, १९९९ द्वारे हा मजकूर समाविष्ट केला. (५ ऑक्टोबर १९९९ पासून)
२. जी. एस. आर. ३७१ (ई), दिनांक १७ मे २००२ द्वारे (१७ मे २००२ पासून) समाविष्ट केले.
३. जी. एस. आर. ४४८ (ई), दि. १७ जुलै २००४ द्वारे मूळ मजकुराऐवजी घातला. (१२ जुलै २००४ पासून).



२. परिच्छेद १ मध्ये समाविष्ट नसलेल्या डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांसाठी ध्वनिमर्यादा.

परिच्छेद १ मध्ये समाविष्ट नसलेल्या डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांसाठीची ध्वनिमर्यादा पुढीलप्रमाणे असेल–

२.१ डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांमधून निर्माण होणाऱ्या आवाजाचे नियंत्रण वापरणारा, ध्वनिक कुंपणाची तरतूद करून किंवा त्या जनरेटरची खोली ध्वनिविषयक प्रक्रियेद्वारे सज्ज करून करण्यात येईल.

२.२ ध्वनिक कुंपण किंवा खोलीची ध्वनिविषयक प्रक्रिया ही किमान २५ डीबी (ए) अंतर्वेशन हानीसाठी किंवा सभोवतालच्या वातावरणातील ध्वनिविषयक मानकांसाठी यांपैकी जे अधिक प्रमाणात असेल त्यानुसार तयार करण्यात येतील. (जर सभोवतालचा प्रत्यक्ष आवाज जर अधिक मोठा असेल तर, ध्वनिक कुंपणाची/ध्वनिविषयक उपचाराची कामगिरी तपासून पाहणे शक्य होणार नाही. अशा परिस्थितीत, आवाज प्रत्यक्षात असणाऱ्या सभोवतालच्या वातावरणातील ध्वनीच्या पातळीपर्यंत कमी असताना, विशेषत: रात्रीच्या वेळी अशा कामगिरीची तपासणी करता येईल.) अंतर्वेशन हानीचे मोजमाप करताना ते ध्वनिक कुंपणापासून/खोलीपासून ०.५ मी. या वेगळ्या टप्प्यावर करता येईल आणि नंतर त्याची सरासरी घेता येईल.

२.३ डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांसाठी निर्गम मफलर (आवाज कमी करणारे साधन) पुरविण्यात येईल याची अंतर्वेशन हानी किमान २५ डीबी (ए) इतकी असेल.

२.४ या मर्यादांचे विनियमन राज्य प्रदूषण नियंत्रण मंडळ व राज्य प्रदूषण नियंत्रण समिती यांच्याकडून करण्यात येईल.

२.५ डिझेलवर चालणारे जनरेटर संच निर्माण करणाऱ्यांसाठी/वापरणाऱ्यांसाठी मार्गदर्शक तत्त्वे पुढीलप्रमाणे आहेत :

१. संचांचा निर्माता वापरणाऱ्यांना २५ डीबी (ए) इतक्या अंतर्वेशन हानीचे प्रमाण ध्वनिक कुंपण आणि तसेच २५ डीबी (ए) इतक्या अंतर्वेशन हानीचे योग्य निर्गम मफलर देऊ करील.

२. संच वापरणारा डिझेलवर चालणाऱ्या जनरेटरचा आवाज त्याच्या जागेच्या बाहेर सभोवतालच्या आवाजाच्या आवश्यक प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात बाहेर पडू नये यासाठी योग्य सेटिंग व नियंत्रणविषयक उपाययोजना करण्याचा प्रयत्न करील.

३. डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचाची संचमांडणी काटेकोरपणे त्या संचांच्या निर्मात्याच्या शिफारशींचे अनुपालन करून करील.

४. डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचाची योग्य ती नेहमीची आणि प्रतिबंधात्मक कार्यपद्धती चालू करण्यात यावी आणि निर्मात्याबरोबर विचारविनिमय

करून ती पुढे चालू ठेवण्यात यावी; त्यामुळे वापरामुळे होणाऱ्या ऱ्हासामुळे आवाजाच्या पातळीत बदल होण्यापासून तो संच वाचू शकेल.

३. [१][दि. १ जानेवारी, २००५] रोजी किंवा त्यानंतर निर्माण केलेल्या (१००० केव्हीए पर्यंतच्या) डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचाची आवाजाची मर्यादा –

३.१ **प्रयुक्ती**

१. [१][दि. १ जानेवारी, २००५] रोजी किंवा त्यानंतर निर्माण केलेल्या (१००० केव्हीए पर्यंतच्या) डिझेलवर चालणाऱ्या निर्धारित उत्पादनाच्या जनरेटर संचाला हे नियम लागू असतील.

२. हे नियम पुढील बाबतीत लागू असणार नाहीत –

(अ) भारताबाहेर निर्यात करण्याच्या प्रयोजनासाठी निर्माण केलेले डिझेलवर चालणारे जनरेटर संचांना, आणि

(ब) नमुन्याच्या प्रयोजनार्थ असलेल्या आणि भारतामध्ये विक्री करण्यासाठी नसलेल्या डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांना.

३.२ **प्रमाणनासाठी आवश्यकता**

हे विनियम ज्यांना लागू होतात अशा डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचांच्या (यात यापुढे ज्यांचा निर्देश "उत्पादन" असा करण्यात आला आहे) प्रत्येक निर्मात्याकडे किंवा आयातकाराकडे (यात यापुढे ज्यांचा निर्देश "पुरवठाकार" असा करण्यात आला आहे.) टाईप अप्रूवलचे प्रमाणपत्र आणि तसेच [१][दि. १ जानेवारी २००५] पासून निर्माण करण्यात येणाऱ्या किंवा आयात करण्यात येणाऱ्या सर्व उत्पादनांसाठी प्रत्येक वर्षासाठी परिच्छेद १ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या आवाजाच्या पातळीशी ते उत्पादन अनुरूप असल्याचे वैध प्रमाणपत्र असले पाहिजे.

३.३ नियमांचे पालन न करणाऱ्या डिझेलवर चालणाऱ्या जनरेटर संचाची विक्री, आयात किंवा वापर यांवर प्रतिबंध घालण्यात आला आहे. कोणतीही व्यक्ती वैध टाईप अॅप्रूवल प्रमाणपत्र नसलेल्या आणि उत्पादन प्रमाणपत्राशी जुळणारे नसणाऱ्या उत्पादन नमुन्यांची विक्री, आयात किंवा वापर करणार नाही.

३.४ अनुरूपता लेबल (चिठ्ठी) लावणे आवश्यक असणे.

(एक) "उत्पादनाच्या" पुरवठाकाराने उत्पादनावर पुढील आवश्यकता पूर्ण करणारे अनुरूपता लेबल चिकटवणे आवश्यक आहे –

(अ) लेबल टिकाऊ आणि वाचता येण्याजोगे असावे.

(ब) हे लेबल त्या उत्पादनाच्या सर्वसाधारण चालनासाठी आवश्यक असलेल्या आणि त्या "उत्पादनाच्या" वापरात असण्याच्या संपूर्ण कालावधीत सर्वसाधारणपणे जो बदलण्याची आवश्यकता नसते अशा भागावर चिकटवण्यात

१. जी. एस. आर. ४४८ (ई) दिनांक १२ जुलै २००४ द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला (१२ जुलै २००४ पासून).



येईल.

(दोन) अनुरूपता चिठ्ठीवर सर्वसाधारणपणे पुढील माहिती असणे आवश्यक आहे –

(अ) पुरवठाकाराचे नाव आणि पत्ता (जर मालकाच्या नियमपुस्तिकेत पत्ता समाविष्ट करण्यात आला असेल तर चिठ्ठीवर पत्ता लिहिला नाही तरी चालू शकेल.)

(ब) "हे उत्पादन पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ यांच्याशी अनुरूप आहे" असे निवेदन.

(क) ध्वनिमर्यादा म्हणजे १ मीटरवर २५ डीबी (ए)

(ड) टाईप अॅप्रूवल प्रमाणपत्र क्रमांक

(ई) उत्पादनाच्या निर्मितीचा दिनांक.

आवाजाचा परिणाम रोजच्या जीवनावर व एकूणच समाजजीवनावर कसा आणि किती होतो याचा आढावा आतापर्यंत आपण घेत आलोच आहोत. आता आपण या संदर्भातील सध्या जोरदार चर्चेत असलेल्या न्यायनिर्णयाबाबत थोडक्यात माहिती घेऊ या.

सन १९९८ मध्ये श्री. अनिल के. मित्तल या अभियंत्याने न्यायालयात एक रिट याचिका दाखल करून अलीकडे समाजात वाढत चाललेल्या ध्वनिप्रदूषण करण्याच्या प्रवृत्तीवर नियंत्रण ठेवण्यासाठी, त्यांचे प्रभावीपणे नियंत्रण करणारा एक नवीन, अधिक व्यापक व सर्वसमावेशक कायदा करण्याची मागणी न्यायालयाकडे केली होती. आपल्या आजूबाजूला सतत या ना त्या कारणाने वेगवेगळ्या स्वरूपात आवाज निर्माण केला जातो. कधी हा आवाज लाऊडस्पीकरचा असतो, कधी फिल्मी गाण्यांच्या कार्यक्रमाचा असतो. कधी नाच-गाण्यांचा असतो, तर कधी भजनाचा असतो; विविध प्रकारच्या कर्कश वाद्यांचा अवलंब धार्मिक प्रयोजनांच्या निमित्ताने केला जातो, तर कधी फार मोठ्या आवाजाचे फटाके अनिर्बंधपणे वाजवण्यात येतात. अशा गोष्टी सतत घडत असतात. अशाच एका प्रसंगी बांधकाम चालू असलेल्या इमारतीत एका १३ वर्षे वयाच्या अल्पवयीन मुलीवर जबरी बलात्कार करण्यात आला. यावेळी त्या असहाय्य मुलीने मदतीसाठी खूप जोरदार आक्रोश केला, मात्र शेजारच्याच इमारतीमध्ये चालू असलेल्या विवाह समारंभात चालू असलेल्या जोरदार आवाजातील वाद्यांमुळे आणि वाजविण्यात येत असलेल्या मोठ्या आवाजातील फटाक्यांमुळे त्या असहाय्य मुलीचा आवाज लोकांपर्यंत पोहोचू शकत नाही व त्यामुळे ती त्या क्रौर्याचा बळी ठरली व या भयानक आघाताने विमनस्क झालेल्या त्या मुलीने नंतर स्वत:ला जाळून घेऊन जीवनाचा अंत करून घेतला. केवळ प्रचंड आवाजामुळे ही दुर्दैवी घटना घडू शकली, म्हणून श्री. अनिल मित्तल यांनी अशा दुर्दैवी प्रसंगाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कोर्टाकडे धाव घेतली. याचिककर्त्याची भूमिका अतिशय प्रामाणिक व समाजहिताची होती व न्यायालयाला त्याची दखल घ्यावी

लागली. याच्या परिणामी भारत सरकारने ध्वनिप्रदूषण नियंत्रण व विनियमन नियम, १९९९ तयार करून ते प्रसिद्ध केले. नंतर ११ ऑक्टोबर २००२ मध्ये या नियमांमधील नियम ५ मध्ये नवीन पोटनियम (३) समाविष्ट करण्यात आले. या पोटनियमानुसार कोणत्याही राज्याच्या शासनयंत्रणेला त्या राज्याच्या दृष्टीने आवश्यक अशा विशिष्ट धार्मिक सणांच्या/समारंभाच्या किंवा अन्य कारणांसाठी आवश्यक असतील अशा एकूण जास्तीत जास्त पंधरा दिवसांसाठी या वेळेत रात्री १० ते १२ पर्यंत सवलत देता येईल. ही सवलत शासनाने आधी घोषित करून द्यावयाची असते. या नवीन सुधारणेमुळे नियमांच्या मूळ उद्देशालाच बाधा पोहोचते असे निवेदन करीत याचिकाकर्त्यांनी विशेष परवानगी विनंतीअर्जाद्वारे पुन्हा न्यायालयाकडे धाव घेतली व त्यात ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीत एकूणच नियम पालनाकडे करण्यात येणारे दुर्लक्ष आणि नवीन सुधारणेमुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीकडे लक्ष वेधण्यात आले. न्यायालयाने दि. ६ एप्रिल ९८ च्या आदेशाद्वारे या अर्जाचे शीर्षक बदलून तो "ध्वनिप्रदूषण-ध्वनिवर्धकाच्या आणि मोठा आवाज निर्माण करणाऱ्या वाद्यांच्या आवाजावर निर्बंध घालण्यासाठी सुधारणा" असे करून हा अर्ज सुनावणीसाठी घेतला. केंद्रशासनाने तसेच, केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने या अर्जाला किंवा त्यामध्ये करण्यात आलेल्या विनंतीला विरोध केला नाही मात्र ते पूर्णपणे अमलात आणण्यासाठी येणाऱ्या अडचणी आणि आवाजाचे नियंत्रण करण्यासाठी असमर्थता व्यक्त केली.

या याचिकेच्या संदर्भात व्यापक चर्चा झाली. याचिकाकर्ता आणि विद्वान न्यायमित्र यांचा रोख विशेषत: धार्मिक किंवा राजकीय कारणांसाठी वाजवण्यात येणारी कर्णकर्कश वाद्ये, ध्वनिक्षेपकाच्या आवाजाची पातळी आणि मोठ्या आवाजातील फटाके यांकडे होता. मात्र हिंदू भोक्ता सभा, तामिळनाडू फायरवर्क्स् आणि अमोरसेस् मॅन्युफॅक्चर्स असोशिएशन, युनिव्हर्सल सोसायटी परफॉर्मर्स ऑल इंडिया फेडरेशन ऑफ फायरवर्क्स् असोशिएशन, इंडियन फायरवर्क्स् मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन व काही व्यक्ती यांचा याला विरोध होता. त्यांची मागणी होती की,

(एक) इंजिनचे भोंगे, ऑटोमोबाईलचे प्रेशर भोंगे, ध्वनिक्षेपक यांसारखे निवासी क्षेत्रातील आणि अनधिकृत ठिकाणांमधून होणाऱ्या आवाजांवर प्रतिबंध घालणे;

(दोन) देवळे, चर्च, मशिदी, गुरुद्वारा यांसारख्या धार्मिक ठिकाणांमधून येणाऱ्या ध्वनिक्षेपकांचे आवाज बंद करणे किंवा किमान कमी करणे;

(तीन) दिवाळी व इतर प्रसंगी किंवा आनंद निर्माण करण्यासाठी वाजविण्यात येणारे फटाके विवक्षित डेसिबलपेक्षा अधिक आवाज निर्माण करीत असतील तर, त्यावर प्रतिबंध घालणे आणि रात्रीच्या काळात फटाके वाजविण्यावर प्रतिबंध घालून ते विनियमित करावे.

दुसऱ्या गटाला असे वाटत होते की,

(एक) धार्मिक सणांच्या किंवा अन्य अशा प्रसंगी फटाके वाजविण्याच्या



बाबतीत वेळेचे बंधन नसावे.

(दोन) निर्मितीच्या प्रक्रियेदरम्यानच निर्बंध ठेवल्यास अवाजवी आवाजाचे फटाके बाजारात येणारच नाहीत.

विविध मागण्या आणि विविध दृष्टिकोनांचा साधकबाधक विचार करून न्यायालयाने आपला निर्णय दिला.

न्यायालयाने या निमित्ताने ध्वनिप्रदूषणाच्या सर्वच अंगांचा व त्यांच्या परिणामांचा विचार केला आणि आपला निर्णय दिला.

ध्वनिप्रदूषणाची विविध साधने आणि त्याचे समाजाच्या विविध थरांमधील लोकांवर, त्यांच्या सामाजिक व्यवहारांवर, लोकांच्या विविध कृतींवर, समाजातील वेगवेगळ्या थरांतील लोकांच्या आरोग्यावर व मानसिक स्वास्थ्यावर होणारा परिणाम व त्यामुळे निर्माण होणारे विविध प्रश्न यांचा साधक बाधक विचार केला आहे आणि या सर्व गोष्टींच्या हितासाठी आणि एकूणच समाजाचे आरोग्य, मानसिक व शारीरिकही जपण्यासाठी, लहान मुलांच्या, आजारी व्यक्तींच्या, वयोवृद्ध व्यक्तींच्या, शाळकरी मुलांच्या, अभ्यास करणाऱ्याच्या आणि आपले नेहमीचे कामकाज पार पाडणाऱ्या लोकांच्या हितासाठी पुढील निदेश दिले.

### ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण कसे ठेवावे?

या रिट विनंतीअर्जातील अर्जदार आणि अन्य मध्यस्थ व्यक्ती यांनी मागणी केलेल्या ध्वनिप्रदूषण नियंत्रणविषयक विचारांचा निश्चितच आदर केला पाहिजे.

ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी आणि त्याला प्रतिबंध करण्यासाठी अद्यापही अधिक चांगल्या विशिष्ट अशा कायद्याची गरज आहे. आतापर्यंत अशा प्रकारचे काही कायदे तयार करण्यात आले आहेत, तरीही, विकसित देशांच्या तुलनेत आपण अजूनही बरेच मागे आहोत हे नि:संशय. ध्वनिप्रदूषणाचा सर्वकष विचार करणारा बहुस्पर्शी असा सर्वसमावेशक नियंत्रण ठेवणारा एकच कायदा तयार करणे आवश्यक आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या कायद्यांची अंमलबजावणी करण्यासाठी यंत्रणा आणि अंतर्गत सुविधा यांचा विकास करण्याचीही तितकीच गरज आहे. ध्वनिप्रदूषणविषयक कायद्यांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ज्यांच्यावर सोपवण्यात आली आहे त्या प्राधिकाऱ्यांना त्याबाबतीतले सुयोग्य मार्गदर्शन व प्रशिक्षण देणे व ध्वनिप्रदूषणावर समर्थपणे मात करण्यासाठी त्यांना सक्षम करणे आवश्यक आहे.

वरील सर्व बाबींबरोबरच घातक अशा ध्वनिप्रदूषणाच्या धोकादायक परिणामांच्या बाबतीत सर्वसाधारणपणे लोकांमध्ये जागृती निर्माण करणे आवश्यक आहे. विशेषत: आपल्या देशातील लोकांमध्ये ध्वनिप्रदूषणाचा किती घातक परिणाम स्वत:वर आणि एकूणच समाजावर होतो याबाबतच्या जाणिवेचा अभाव आहे, तसेच, आवाजाचे प्रमाण नियंत्रणात ठेवले तर त्याचा लाभ स्वत:लाच मिळू शकतो. याबाबतचे ज्ञान आणि भानही नाही. या गोष्टींची अंमलबजावणी करण्यासाठी ध्वनिप्रदूषणाच्या नियंत्रणाची विशेष



CamScanner

वेळेचे कोणतेही बंधन घालण्याची आवश्यकता नाही.

५. फटाक्यांचा प्रत्येक निर्माता फटाक्यांच्या प्रत्येक बॉक्सवर त्यामधील रसायनांविषयीचे तपशील नमूद करील आणि असे तपशील स्फोटके विभागाने आवश्यक ठरविलेल्या तपशिलांशी जुळणारे असतील. फटाक्यांच्या निर्मात्याने असे तपशील नमूद करण्यात हयगय केली तर, किंवा त्या बॉक्सवरील तपशील त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या फटाक्यांमधील रासायनिक सूत्राशी जुळणारे नसतील तर, अशा बाबतीत त्या निर्मात्याला त्यासाठी दोषी मानता येईल.

६. निर्यात करावयाच्या प्रयोजनासाठी निर्माण करण्यात आलेले अधिक मोठ्या आवाजाचे फटाके निर्माण करता येतील, मात्र त्यांना पुढील शर्ती लागू असतील : (१) निर्मात्याकडे निर्यात आदेश असेल तरच त्याला असे फटाके निर्माण करता येतील, एरवी असे फटाके निर्माण करता येणार नाहीत; (२) असे फटाके ज्या देशातील मागणीनुसार निर्माण करावयाचे असतील त्या देशात त्यासाठी विहित करण्यात आलेल्या आवाजाच्या पातळीशी ते जुळणारे असावे; (३) अशा फटाक्यांच्या पुडक्यांच्या आवरणाचा रंग भारतात विकावयाच्या फटाक्यांच्या आवरणाच्या रंगापेक्षा वेगळा असावा; (४) त्यांच्यावर "विक्रीसाठी नाही" किंवा "अब" या देशात निर्यात करण्यासाठीच "फक्त" अशा आशयाची किंवा तत्सम घोषणा असली पाहिजे.

**दोन. ध्वनिक्षेपकाच्या बाबतीतले–**

१. जेथे ध्वनिक्षेपक किंवा सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा किंवा एखादे आवाज निर्माण करणारे साधन वापरण्यात येत असेल अशा सार्वजनिक ठिकाणाच्या सीमारेषांजवळील आवाजाची पातळी त्या क्षेत्रासाठी असलेल्या आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या वातावरणातील प्रमाण दर्जापेक्षा १० डी बी (ए) अधिक किंवा ७५ डी बी (ए) यांपैकी जी कमी असेल अशा पातळीपेक्षा जास्त असणार नाही.

२. कोणतीही व्यक्ती, सार्वत्रिक आणीबाणीची परिस्थिती वगळून अन्य कोणत्याही वेळी, रात्रीच्या वेळी (रात्री १०.०० ते पहाटे ६.०० या दरम्यान) ढोल किंवा टमटम वाजवणे, ट्रम्पेट वाजवणे किंवा कोणतेही आवाज निर्माण करणारी साधने बडवणे या गोष्टी करणार नाही किंवा कोणताही ध्वनिवर्धक वापरणार नाही.

३. खासगी मालकीच्या आवाज यंत्रणेचा ज्या क्षेत्रात वापर करण्यात आला असेल, त्याच्या सीमारेषांजवळील आवाजाची परिघीय पातळी त्या क्षेत्राच्या सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेच्या दर्जापेक्षा ५ डीबी (ए) पेक्षा अधिक असणार नाही.

**तीन. वाहनांच्या आवाजाच्या बाबतीतले–**

अपवादात्मक परिस्थिती वगळून एरवी निवासी क्षेत्रामध्ये रात्री (रात्री १०.०० ते पहाटे ६.०० या दरम्यानच्या काळात) वाहनांचे भोंगे (हॉर्न) वाजवण्यास परवानगी असता कामा नये.



**चार. जाणीव असण्याबाबतचे–**

१. ध्वनिप्रदूषणाच्या घातक परिणामांची सर्वसाधारण जाणीव निर्माण करण्याची गरज आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना नागरी-शिक्षण देणाऱ्या पाठ्यपुस्तकांच्या त्या-त्या भागात ध्वनिप्रदूषणाच्या विषयासंबंधी माहिती देणारे पाठ समाविष्ट करण्यात आले पाहिजेत. शाळांमध्ये आवाजाचा उपद्रव आणि विद्यार्थ्यांची भूमिका याबाबत मार्गदर्शन करणारी व्याख्याने आयोजित करण्यात आली पाहिजेत. ध्वनिप्रदूषणावर प्रतिबंध घालण्यासाठी आणि त्या विषयांवरील कायद्यांचे ज्ञान होण्यासाठी स्वतंत्र प्रशिक्षण आयोजित करावे.

२. या प्रक्रियेत राज्याचा सक्रिय सहभाग असला पाहिजे. रहिवासी कल्याण संघटना, सेवा क्लब आणि आपल्या प्रकल्पाची गरज म्हणून ध्वनिप्रदूषणात गुंतलेल्या संस्था यांना स्थानिक प्रशासनाने प्रोत्साहन दिले पाहिजे आणि त्यांना सक्रियपणे सहभागी करून घेतले पाहिजे.

३. आगामी सण आणि ज्यांमध्ये फटाक्यांचा मोठ्या प्रमाणात वापर केला जाण्याची शक्यता आहे अशा अपेक्षित घटनांच्या अगोदर सार्वजनिक जाणीव निर्माण करणारी विशेष मोहीम सुरू केली पाहिजे.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद १४१ ते १४२ याअन्वये या न्यायालयाला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून वरील मार्गदर्शक तत्त्वे घालून देण्यात आली आहेत.

**पाच. सर्वसाधारण निदेश–**

१. अनुज्ञेय आवाज मर्यादेपेक्षा अधिक आवाज करणारे ध्वनिक्षेपक, ध्वनिवर्धक आणि अशी अन्य उपकरणे आवाज निर्माण करताना आढळल्यास, ती जप्त व सरकारजमा करण्यासाठी राज्यशासनाने तरतूद केली पाहिजे.

२. ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २००० याच्या नियम ३ मध्ये सभोवतालच्या हवेमधील आवाजाच्या संबंधातील हवेच्या गुणवत्तेच्या दर्जासंबंधीची तरतूद करण्यात आली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत/झोनमध्ये आवाजाच्या दर्जाचे कार्यान्वयन करण्यासाठी घालून देण्यात आलेल्या दर्जाची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तो प्राप्त करण्यासाठी प्राधिकरणे प्राधिकृत करण्यात आली आहेत. असा दर्जा ठरविण्यासाठी आणि जेथे प्राधिकरणे अधिसूचित करण्यात आली नसतील तेथे अशी प्राधिकरणे अधिसूचित करण्यासाठी केंद्रशासन/राज्यशासन उपाययोजना करील.

लोकहिताचा विचार करून वरीलप्रमाणे देण्यात आलेल्या निदेशांना अनुसरून जरी प्रकरणे मिटविण्यात येत असली तरी जेव्हा आणि जशी गरज निर्माण होईल तेव्हा आणि तसे विशेषतः निदेशांचे पालन करण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण निर्माण झाल्यास आणखी निदेश मागण्याचे स्वातंत्र्य राहील.

ध्वनिप्रदूषण नियमांच्या नियम ५ मधील २००२ च्या सुधारणेला न्यायालयात

आव्हान देण्यात आल्यानंतर सर्वोच्च न्यायालयाचे विद्वान न्यायमूर्ती आर. सी. लाहोटी आणि अशोक भान यांनी ही सुधारणा अयोग्य असल्याचे सांगून त्या संबंधात अधिक सखोल सुनावणी होईपर्यंत ही सुधारणा अमलात आणली जाऊ नये असे तात्पुरते निदेश दिले. या निदेशांच्या परिणामी अगदी ऐन सणासुदीच्या दिवसांत आवाजी वाद्ये, मोठ्या आवाजाचे फटाके यांच्यासाठी मिळणारी रात्री १० ते १२ वाजेपर्यंतची दोन तासांची सवलत देणे राज्यशासनाला शक्य झाले नाही. परिणामी लोकांच्या मनात बराच क्षोभ निर्माण झाला. या निदेशांच्या विरोधात बऱ्याच प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या व या निर्णयाविरोधात न्यायालयाकडेही धाव घेण्यात आली. या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून नवरात्रोत्सवाच्या वेळी न्यायालयाने या नियम ५ चा आधार घेऊन शासनाच्या परवानगीने आणि परवानगी असेल तेवढ्याच दिवसांपुरती ही दोन तासांची सवलत वापरण्याची तात्पुरती परवानगी दिली. त्यानंतर ऑक्टोबर अखेरीस या बाबतीतली अंतिम सुनावणी होऊन हा नियम ५ वैध असल्याचा न्यायालयाने निर्णय दिला आणि त्यानुसार आता सर्व संबंधित राज्यांना आपापल्या राज्यात एका कॅलेंडर वर्षामध्ये सर्व मिळून एकूण १५ दिवस निश्चित करता येतील व त्या काळात ध्वनिप्रदूषणाच्या संबंधात रात्री १० ते पहाटे ६ पर्यंत पाळावयाचे निर्बंध रात्री १० ते रात्री १२ पर्यंत असे दोन तास शिथिल करता येतील. हे दिवस कोणते असावे- हे ते ते राज्य शासन त्या राज्यात साजरे होणाऱ्या धार्मिक उत्सवाचे दिवस किंवा इतर सार्वजनिक व सामाजिकदृष्ट्या महत्त्वाचे दिवस विचारात घेऊन निश्चित करील. राज्य- शासन असे दिवस पूर्वघोषित करील, आणि फक्त अशा, शासनाने घोषित केलेल्या दिवसांपुरतीच ही सवलत वापरता येईल असा हा अंतिम निर्णय आहे.

या सर्व गोष्टी करताना समाजाने नेहमीच ध्वनिप्रदूषण – त्याची कारणे, परिणाम व ते टाळण्यासाठी योजावयाचे उपाय याचा विचार केला पाहिजे. समाजातील प्रत्येक व्यक्तीने या बाबतीत जागरूकता दाखवली पाहिजे आणि ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी सर्व उपाय योजले पाहिजेत. आपले धार्मिक आणि सामाजिक कार्यक्रम उत्साहाने साजरे करणे हा जसा आपला घटनादत्त हक्क असतो, तसाच तो. समाजातील इतर व्यक्तींचाही असतो, म्हणून, आपण आपल्या हक्कांचे संरक्षण करताना आणि त्याचा उपभोग घेताना अन्य कोणाच्या अशाच हक्कावर विपरीत परिणाम होणार नाही, इतरांचेही सर्वच प्रकारचे स्वातंत्र्य अबाधित राहील याची काळजी घेणे अतिशय आवश्यक आहे. ध्वनिप्रदूषण टाळण्यासाठी आपण पुढील गोष्टी करू शकू –

### ध्वनिप्रदूषणावर नियंत्रण ठेवण्यासाठी काय करता येईल?

पर्यावरणाचे संरक्षण हे किती आवश्यक आहे हे आपण सर्वचजण आता चांगलेच जाणतो. या पर्यावरण रक्षणाचा एक भाग म्हणूनच आपल्याला ध्वनिप्रदूषणाचा विचार करणे भाग आहे याचा आता आपल्याला अंदाज आलाच आहे. तरीही या विषयाच्या संबंधात संपूर्ण समाजात जागृती निर्माण होणे गरजेचे आहे. ध्वनिप्रदूषणात जसा विविध



निर्मितिप्रक्रिया, विविध यंत्रणांचे कामकाज यांचा हातभार असतो, तसाच मानवी जीवनात दररोज आणि सतत घडत असणाऱ्या विविध घटना, सततचे सण-उत्सव, समारंभ, सभा व इतर करमणुकीचे कार्यक्रम यांचाही सहभाग असतो. या सर्वच बाबतींत समाजास सतत जागृत करीत राहणे, ध्वनिप्रदूषणाच्या दुष्परिणामांची व्याप्ती, याबाबतीत जनमनात सतत जाणीव निर्माण करीत राहणे, अगदी आपल्या रोजच्या जीवनातही शक्यतो चालता- बोलताना आवाजाच्या पट्टीचे भान ठेवणे गरजेचे आहे आणि यासाठी सतत समाज प्रबोधन करणे ही काळाची गरज आहे. एक बांधीलकी म्हणून ही मोहीम राबवणे हे आपणा सर्वांचेच कर्तव्य आहे व त्याचबरोबर अशाप्रकारचे कार्य करणे ही ज्या यंत्रणेची जबाबदारी आहे, तिला आवश्यक ते सहकार्य करणे हीही आपली जबाबदारी आहे. या संबंधात काही उपाययोजनांचा विचार करता येईल त्या अशा-

(१) ध्वनिप्रदूषणाचा अर्थ, त्याचे परिणाम व त्यासंबंधात करता येणारी उपाययोजना या दृष्टिकोनातून मार्गदर्शक तत्त्वे तयार करणे व त्यांचा लोकप्रिय माध्यमांद्वारे प्रसार व प्रचार करणे.

(२) शासनाने या बाबतीत केलेल्या उपाययोजनांचा अभ्यास करणे व त्या संपूर्ण समाजाप्रत पोहोचवणे.

(३) शासनाने ध्वनिप्रदूषण रोखण्यासाठी आखून दिलेल्या विविध ध्वनिपातळ्यांचे त्या-त्या पातळीवर काटेकोरपणे पालन करणे.

(४) या गोष्टींचे महत्त्व व निकड लक्षात घेऊन योजावयाच्या उपाय-योजनांसाठी कालमर्यादा विहित करणे.

(५) ध्वनिप्रदूषणाच्या संबंधातील तक्रारी तातडीने व योग्य त्या रीतीने दाखल करण्यासाठी लोकांच्यात जागृती निर्माण करणे.

(६) आलेल्या तक्रारींची वेळीच दखल घेतली जावी यासाठी योग्य ती यंत्रणा उपलब्ध करून देणे.

(७) या संबंधातल्या प्रकरणांचा निकाल योग्य व वेळीच व्हावा या दृष्टीने त्यासाठी स्वतंत्र न्यायालये निर्माण करणे.

(८) प्रकरणांचा निकाल कालबद्ध पद्धतीने करण्यासाठी तरतूद करणे.

(९) ध्वनिक्षेपकांच्या वेळा, आवाजाची मर्यादा यासंबंधात फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १४४ अन्वये मनाई आदेश काढण्यासाठी पुरेसे सक्षम अधिकारी नेमणे आणि त्यांना पुरेसे अधिकार देणे.

(१०) ध्वनिप्रदूषणाच्या संबंधात समाजप्रबोधन करण्यासाठी, तसेच, लोकजागृती करण्यासाठी प्रसारमाध्यमांना सहभागी करून घेणे आणि या माध्यमांचा प्रभावी वापर करणे.

(११) विद्यार्थिदशेपासून या विषयाची जाणीव निर्माण करण्यासाठी शिक्षणाच्या सर्वच पातळ्यांवर पर्यावरण संरक्षण, हवाप्रदूषण, ध्वनिप्रदूषण, घनकचरा व्यवस्थापन यांसारखे मानवी जीवनाशी अगदी जवळचा संबंध असणारे विषय अनिवार्य



CamScanner

म्हणून शिकवण्याची व्यवस्था करणे.

(१२) ध्वनिप्रदूषणाच्या संबंधातल्या सक्षम प्राधिकाऱ्यांनी या प्रश्नाकडे अधिक गंभीरपणाने पाहणे आणि आपल्या अधिकारांचा अधिक काटेकोरपणे, कठोरपणे वापर करणे भाग पाडणे.

(१३) केंद्रशासनाने तसेच, सर्वच राज्यशासनांनी या छुपेपणाने प्रहार करणाऱ्या व भावी पिढीवर बहिरेपणासारखे गंभीर परिणाम लादणाऱ्या शत्रूचा योग्य सामना करण्यासाठी अधिक व्यापक, अधिक प्रभावी उपाय योजणे.

(१५) सणांच्या निमित्ताने योजल्या जाणाऱ्या कार्यक्रमांच्या संबंधात ध्वनिप्रदूषण नियमांचे काटेकोर पालन करण्याचे बंधन विविध गृहनिर्माण संस्था, समाजसेवी गट आणि एकूणच जनता यांच्याकडे सोपवणे व त्याबाबतीत आवश्यक असेल तर सहज उपलब्ध अशी मदतयंत्रणा सज्ज ठेवणे.

(१६) विविध आनंदोत्सवांच्या प्रसंगी, तसेच, सणासुदीच्या निमित्ताने लावण्यात येणाऱ्या फटाक्यांच्या बाबतीत विशेष लक्ष पुरविणे व आवाजाची पातळी ओलांडणाऱ्या व्यक्ती किंवा संस्था यांच्यांवर कठोर उपाय योजणे.

(१७) [illegible]ठ्या आवाजाचे व धोकादायक फटाके निर्माण करणे व विकणे या दोन्ही [illegible] [illegible]ंदी लागू करणे व त्यांचा भंग करणाऱ्यांवर तातडीने व कठोर उपाय योजणे.

(१८) कोणत्याही ध्वनिप्रदूषणाच्या बाबतीत वेळेची मर्यादा पाळण्याच्या बाबतीतही काटेकोर नियम व त्यांचे काटेकोर पालन आवश्यक करणे व त्यामध्ये समाजघटकांना अंतर्भूत करून घेणे.

(१९) प्रश्नाचे गांभीर्य विचारात घेता त्याचा नियतकालिक आढावा घेणे, उपाययोजनांचे मूल्यमापन करणे आणि नवीन उपाय सुचविणे यासाठी एक तज्ज्ञ समिती नेमणे व तिच्या बैठकीतील निष्कर्ष जाहीर करणे.

(२०) लोकांच्या सूचना मागविणे व त्या विचारात घेणे, व त्याबाबतीतले निष्कर्ष जाहीर करणे.

■



CamScanner

प्रकरण पाच

**केंद्रीय मंडळाचा अर्थसंकल्प**

१५. कलम ३४ खालील, अर्थसंकल्पाचा नमुना. १७७

प्रकरण सहा

**केंद्रीय मंडळाचा वार्षिक अहवाल**

१६. कलम ३५ खालील वार्षिक अहवालाचा नमुना. १७८

प्रकरण सात

**केंद्रीय मंडळाचे हिशेब**

१७. कलम ३६ खालील केंद्रीय मंडळाच्या हिशेबाच्या वार्षिक विवरणपत्राचा नमुना १७८
अनुसूची एक ते तीन १७८

**ध्वनिप्रदूषण (विनियमन आणि नियंत्रण) नियम, २०००**

१. संक्षिप्त नाव आणि प्रारंभ १९१
२. व्याख्या १९१
३. वेगवेगळ्या क्षेत्रांसाठी/झोनसाठी आवाजाच्या संबंधातील सभोवतालच्या हवेच्या गुणवत्तेचा दर्जा १९२
४. ध्वनिप्रदूषण नियंत्रण उपाययोजना अमलात आणण्याची जबाबदारी १९३
५. लाऊडस्पीकर (ध्वनिक्षेपक)/सार्वजनिक ध्वनिवितरण यंत्रणा यांच्या वापरावरील निर्बंध १९३
६. शांतता क्षेत्राचा/झोनचा कोणताही भंग केल्याचा परिणाम १९४
७. प्राधिकरणाकडे तक्रार करणे. १९४
८. संगीताचा आवाज किंवा ध्वनी चालू ठेवण्यास प्रतिबंध इ. करण्याचे अधिकार १९४
अनुसूची १९६

**मुंबई-पोलीस अधिनियम, १९५१ व ध्वनिप्रदूषण** १९७
**मोटार वाहन अधिनियम व मोटार वाहन नियम व ध्वनिप्रदूषण** २०१

■



# पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६

## (१९८६ चा अधिनियम, क्रमांक २९)

[२३ मे, १९८६]

### अधिनियमाचा उद्देश व कारणे

दिवसेंदिवस वाढत जाणाऱ्या यांत्रिकीकरणामुळे व विविध प्रकारच्या नवनवीन उद्योगधंद्यांमधून बाहेर सोडल्या जाणाऱ्या द्रवरूप, वायुरूप वा अन्य स्वरूपातील पदार्थांमुळे वातावरणातील नैसर्गिक घटकांना त्यांच्या वाढीला आणि टिकून राहण्याला विरोध होत आहे व परिणामी या सर्वांचाच मानवी जीवनावरही प्रतिकूल असाच परिणाम होत आहे. या सर्वांमधून योग्य अशी उपाययोजना करून त्याद्वारे बाहेर पडणाच्या दृष्टीने या अधिनियमाची गरज निर्माण झाली. जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथे झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरणासंबंधीच्या परिषदेत मानवी पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी समुचित उपाययोजना करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आला होता. या परिषदेच्या आधी आणि नंतरही पर्यावरण संरक्षणविषयक अनेकविध उपाययोजना योजण्यात आल्या. मात्र या उपाययोजनांची अधिक चांगली अंमलबजावणी होण्यासाठी एक सर्वसाधारण असा कायदा असणे गरजेचे असल्याचे जाणवल्यावरून असा कायदा करण्याचा निर्णय घेण्यात आला.

पर्यावरणविषयक अनेक कायदे अस्तित्वात होते. मात्र हे सर्व कायदे एखाद्या विशिष्ट प्रकारच्या प्रदूषणाविषयी किंवा एखाद्या पर्यावरणाला घातक अशा पदार्थाविषयी होते व त्यामुळे संपूर्णपणे सर्वसमावेशक अशा उपाययोजनांचा अशा कायद्यामध्ये अभाव असल्याचे आढळून येत होते. म्हणून पर्यावरणाचा आणि त्याच्यावर परिणाम करणाऱ्या सर्वच प्रकारच्या घटनांचा, पदार्थांचा आणि इतर घटकांचा विचार करून पर्यावरण व मानवी आरोग्य यांना पूरक अशा उपायांची योजना करण्याच्या उद्देशाने हा कायदा करण्यात येत आहे.

**पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा यांकरिता आणि त्याच्याशी निगडित अशा बाबींसाठी तरतुदी करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी**, जून १९७२ मध्ये स्टॉकहोम येथील संयुक्त राष्ट्रांच्या मानवी पर्यावरणासंबंधीच्या ज्या परिषदेमध्ये भारताने भाग घेतला होता त्या परिषदेत, मानवी

पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी समुचित उपयोजना करण्यासंबंधी निर्णय घेण्यात आले होते;

**आणि ज्याअर्थी**, उपरोक्त निर्णय हे पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा आणि मनुष्यप्राणी, इतर जीवसृष्टी, वनस्पती व संपत्ती यांना पोचणाऱ्या जोखमीस प्रतिबंध करणे यांच्याशी संबंधित आहेत तेथवर ते आणखी कार्यान्वित करणे आवश्यक वाटत आहे;

**त्याअर्थी**, याद्वारे भारतीय गणराज्याच्या सदतिसाव्या वर्षी संसदेकडून पुढीलप्रमाणे अधिनियमित होवो–

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.**

(१) या अधिनियमास "पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६" असे म्हणावे.

(२) त्याचा विस्तार संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा *दिनांकास तो अमलात येईल आणि या अधिनियमाच्या वेगवेगळ्या तरतुदींकरिता आणि निरनिराळ्या क्षेत्रांकरिता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.[1]

**२. व्याख्या.**

या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,–

(अ) "पर्यावरण" या संज्ञेमध्ये, पाणी, हवा व जमीन आणि मनुष्यप्राणी, इतर जीवसृष्टी, वनस्पती, सूक्ष्मजीव आणि संपत्ती यांच्यामध्ये आपापसात आणि या दोहोंमध्ये परस्पर असलेला संबंध, यांचा समावेश होतो;

(ब) "पर्यावरणविषयक प्रदूषण" याचा अर्थ, पर्यावरणास अपायकारक असेल किंवा तसा ठरू शकेल अशा संकेंद्रणात विद्यमान असलेला कोणताही घनरूप, द्रवरूप किंवा वायुरूप पदार्थ असा आहे;

(क) "पर्यावरणविषयक प्रदूषण" याचा अर्थ, पर्यावरणात कोणताही पर्यावरणविषयक प्रदूषकाचे अस्तित्व असणे असा आहे;

(ड) कोणत्याही पदार्थांच्या संबंधात, "हाताळणे" याचा अर्थ, अशा पदार्थांची निर्मिती करणे, त्यावर प्रक्रिया करणे, त्याचे संस्करण करणे, त्याची पुडकी बांधणे, साठा

* १९ नोव्हेंबर, १९८६.

१. संपूर्ण भारतामध्ये तो १९ नोव्हेंबर, १९८६ रोजी व तेव्हापासून अमलात आला. पहा- भारताचे राजपत्र क्रमांक ५२५, दिनांक १२ नोव्हेंबर, १९८६ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक जी. एस. आर. ११९८ (ई), दिनांक १२ नोव्हेंबर, १९८६.



करणे, परिवहन, वापर करणे, तो गोळा करणे, त्याचा नाश करणे, त्याचे रूपांतर करणे, तो विक्रीकरिता, हस्तांतरणाकरिता किंवा तत्सम कामाकरता देऊ करणे, असा आहे;

(ई) "जोखमीचा पदार्थ" याचा अर्थ, आपल्या रासायनिक किंवा भौतिक-रासायनिक गुणधर्मामुळे किंवा हाताळण्यामुळे माणसांना, इतर जीवसृष्टीस, वनस्पतींना, सूक्ष्मजीवांना, संपत्तीला किंवा पर्यावरणाला अपाय करू शकतो असा कोणताही पदार्थ किंवा सिद्ध पदार्थ, असा आहे;

या ठिकाणी 'जोखमीचा पदार्थ' या शब्दाचा अर्थ देण्यात आला असून माणसांना व अन्य जीवसृष्टीला तसेच पर्यावरण, संपत्ती इत्यादीला अपाय करू शकणारा पदार्थ किंवा सिद्ध पदार्थ असा अर्थ देण्यात आला आहे. वीज ही सुद्धा विशिष्ट परिस्थितीत 'जोखमीचा पदार्थ' ठरू शकते व या कलमानुसार तसे मानता येते असा निर्णय **मध्यप्रदेश इलेक्ट्रिसिटी बोर्ड, जबलपूर वि. जिल्हाधिकारी, मांडला ए.आय.आर २००३ एमएडी १५६ या प्रकरणात देण्यात आला आहे.**

(फ) "भोगवटादार" याचा अर्थ, कोणत्याही कारखान्याच्या किंवा जागेच्या संबंधातील त्या कारखान्याच्या किंवा जागेच्या कारभारावर ज्या व्यक्तीचे नियंत्रण आहे ती व्यक्ती, असा आहे आणि त्यामध्ये कोणत्याही पदार्थाच्या संबंधात, तो पदार्थ कब्जात असणाऱ्या व्यक्तीचा समावेश होतो;

(ग) "विहित" याचा अर्थ, या अधिनियमान्वये केलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे.

## प्रकरण दोन

## केंद्र सरकारचे सर्वसाधारण अधिकार

**३. पर्यावरणाचे संरक्षण व सुधारणा करण्यासाठी उपाययोजना करण्याचा केंद्र सरकारचा अधिकार.**

(१) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, पर्यावरणाचे संरक्षण करण्याच्या आणि त्याचा दर्जा सुधारण्याच्या आणि पर्यावरणी प्रदूषणास प्रतिबंध करण्याच्या, त्याचे नियंत्रण करण्याच्या आणि त्या उपशम करण्याच्या प्रयोजनांकरिता आवश्यक किंवा समयोचित वाटतील असे सर्व उपाय योजण्याचा अधिकार केंद्र सरकारला असेल.

(२) विशेषत: आणि पोटकलम (१) च्या तरतुदींच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, अशा उपायांमध्ये पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधातील उपाययोजनांचा समावेश असू शकेल, त्या बाबी अशा–

(एक) राज्य शासनाने, अधिकारी आणि–

(अ) या अधिनियमाखालील किंवा त्याखाली केलेल्या नियमांखालील;



CS CamScanner

किंवा

(ब) या अधिनियमाच्या उद्दिष्टांशी ज्यांचा संबंध जोडता येईल अशा, त्या त्या वेळी अमलात असणाऱ्या कोणत्याही इतर कायद्याखालील, इतर प्राधिकारी यांच्या कार्यांचा समन्वय करणे;

(दोन) पर्यावरणी प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्यांचे नियंत्रण व उपशम यासाठी एक राष्ट्रव्यापी कार्यक्रम आखणे व त्याची अंमलबजावणी करणे;

(तीन) पर्यावरणाच्या विविध स्वरूपांच्या संबंधात दर्जाविषयक मानके विहित करणे;

(चार) कोणत्याही विविध साधनांपासून होणाऱ्या पर्यावरणविषयक प्रदूषकांच्या उत्सर्जनासंबंधी किंवा निस्सारणासंबंधी मानके घालून देणे;

परंतु, वेगवेगळ्या साधनांपासून पर्यावरणविषयक प्रदूषकांचे जे उत्सर्जन किंवा निस्सारण होते त्याचा दर्जा व घटकरचना लक्षात घेऊन, या खंडान्वये अशा साधनांकरिता उत्सर्जनाची व निस्सारणाची वेगवेगळी मानके घालून देता येतील;

(पाच) कोणतेही उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया अथवा उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया यांचे वर्ग जेथे पार पाडता येणार नाहीत किंवा विवक्षित संरक्षण तरतुदींच्या अधीनतेने पार पाडता येतील अशा क्षेत्रांवरील निर्बंध;

(सहा) ज्या अपघातांमुळे पर्यावरणविषयक प्रदूषण होण्याची शक्यता असेल अशा अपघातांना प्रतिबंध करण्याच्या कार्यपद्धती आणि संरक्षण तरतुदी आणि अशा अपघातांवरील सुधारात्मक उपाययोजना घालून देणे;

(सात) जोखमींचा पदार्थ हाताळण्याची कार्यपद्धती व संरक्षक तरतुदी विहित करणे;

(आठ) पर्यावरणविषयक प्रदूषणास कारणीभूत ठरू शकतील अशा निर्मितीप्रक्रिया, सामग्री आणि पदार्थ यांची तपासणी करणे;

(नऊ) पर्यावरणी प्रदूषणाच्या समस्यांशी संबंधित अन्वेषणे आणि संशोधन करणे आणि त्याचा पुरस्कार करणे;

(दहा) कोणत्याही जागा, संयंत्र, सामग्री, यंत्रसामग्री, निर्मिती किंवा इतर प्रक्रिया, सामग्री किंवा पदार्थ यांचे निरीक्षण करणे आणि पर्यावरणविषयक प्रदूषणास प्रतिबंध करण्याचे, त्याचे नियंत्रण आणि उपशम करण्याचे उपाय योजण्याकरिता त्यास आवश्यक वाटतील अशा प्राधिकाऱ्यांना, अधिकाऱ्यांना किंवा व्यक्तींना असे निदेश आदेशाद्वारे देणे;

(अकरा) या अधिनियमान्वये, पर्यावरणविषयक प्रयोगशाळांकडे आणि संस्थेकडे सोपवलेली कामे पार पाडण्याकरता अशा पर्यावरणविषयक प्रयोगशाळा व संस्था यांची स्थापना करणे किंवा त्यांना मान्यता देणे;

(बारा) पर्यावरणविषयक प्रदूषणाशी संबंधित बाबींसंबंधीची माहिती गोळा



करणे आणि तिचा प्रसार करणे;

(तेरा) पर्यावरणविषयक प्रदूषणास प्रतिबंध करणे, त्याचे नियंत्रण व उपशम यांच्याशी संबंधित नियमपुस्तिका, संहिता किंवा मार्गदर्शिका तयार करणे;

(चौदा) या अधिनियमाच्या तरतुदींचे प्रभावी कार्यान्वयन साध्य करण्याच्या प्रयोजनाकरिता केंद्र सरकारला आवश्यक आणि समयोचित वाटतील अशा इतर बाबी.

(३) या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता तसे करणे केंद्र सरकारला आवश्यक किंवा समयोचित वाटत असेल तर, त्यास, **शासकीय राजपत्रात** प्रकाशित केलेल्या आदेशाद्वारे, या अधिनियमाखालील केंद्र सरकारचे अधिकार व कार्ये (कलम ५ अन्वये निदेश देण्याचे अधिकार धरून) वापरण्याच्या आणि पार पाडण्याच्या प्रयोजनाकरिता आणि त्या आदेशामध्ये विनिदेश करण्यात येईल त्याप्रमाणे पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या बाबींच्या संबंधात उपाययोजना करण्याकरिता, त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा नावाने किंवा नावांनी प्राधिकरण किंवा प्राधिकरणे घटित करता येतील, आणि केंद्र सरकारच्या पर्यवेक्षणाच्या आणि नियंत्रणाच्या आणि अशा आदेशाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जणूकाही ते अधिकार वापरण्याचा किंवा ती कार्ये पार पाडण्याचा किंवा अशा उपाययोजना करण्याचा अधिकार अशा प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणांना या अधिनियमान्वयेच प्रदान करण्यात आली असल्याप्रमाणे अशा प्राधिकरणाला किंवा प्राधिकरणांना त्या आदेशामध्ये निर्देशिलेले अधिकार वापरता येतील, किंवा कार्ये पार पाडता येतील किंवा उपाययोजना करता येतील.

भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१ च्या तरतुदीनुसार भारताच्या प्रत्येक नागरिकाला जे मूलभूत हक्क दिले आहेत त्यातला प्रदूषणमुक्त, आरोग्यपूर्ण जीवन जगणे हा एक हक्क आहे. या गोष्टीसाठी पूरक म्हणून शासनाने विविध कायदे केले असून त्या सर्वांचा योग समावेश करणारा पर्यावरण (संरक्षण) अधिनियम हा अतिशय महत्त्वपूर्ण असा अधिनियम आहे. या अधिनियमाद्वारे नागरिकांना देण्यात आलेल्या संरक्षक तरतुदींचा भंग करून जर कोणी कायद्याची पायमल्ली करीत असेल, तर त्याविरोधात संविधानाच्या अनुच्छेद ३२ अन्वये हक्काची मागणी करण्याचा हक्क नागरिकाला तर आहेच तसेच एखाद्या समाजसेवी गटाने अशा हक्काची मागणी करणे हेही कायद्याला अनुसरून आहे. **पाहा- सुभाष कुमार वि. बिहार राज्य, ए.आय.आर. १९९१ एस.सी. ४२०.**

पर्यावरण (संरक्षण) अधिनियम, १९८६ हा पर्यावरणाच्या हितासाठी म्हणजे पर्यायाने आरोग्यपूर्ण नागरी जीवनासाठी आहे तसाच तो विकासासाठीही प्रोत्साहकच आहे. उद्योगधंद्यांचा विकास हा पर्यावरणाचा विचार करूनच व्हावा, म्हणजेच विकास आणि पर्यावरण संरक्षण यांचा मेळ हाच या अधिनियमाचा उद्देश आहे. **पाहा- इस्सार ऑईल लिमिटेड वि. हलदर उत्कर्ष समिती, ए.आय.आर. २००४ सर्वोच्च न्यायालय, १८३४ (२००४) २. एस.सी.सी. ३९२.**



CS CamScanner

## ४. अधिकाऱ्यांची नियुक्ती आणि त्यांचे अधिकार व कार्ये.

(१) कलम ३, पोटकलम (३) च्या तरतुदींना बाध न येता केंद्र सरकार, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, त्याला वाटतील ती पदनामे असलेले अधिकारी नियुक्त करू शकेल आणि या अधिनियमाखाली त्याला योग्य वाटतील अशा असे अधिकार व कार्ये त्यांच्याकडे सोपू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये नियुक्त केलेले अधिकारी, केंद्र सरकारच्या किंवा त्या सरकारने तसा निदेश दिला असल्यास कलम ३, पोटकलम (३) अन्वये कोणतेही प्राधिकरण किंवा प्राधिकरणे घटित करण्यात आले किंवा आली असल्यास, त्यांच्याही, किंवा कोणत्याही इतर प्राधिकाऱ्यांच्या किंवा अधिकाऱ्याच्या सर्वसाधारण नियंत्रणाच्या आणि निदेशाच्या अधीन असतील.

## ५. निदेश देण्याचा अधिकार.

कोणत्याही इतर कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु या अधिनियमाच्या तरतुदींना अधीनतेने, केंद्र सरकारला[1], या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करताना आणि आपली कामे पार पाडताना, कोणत्याही व्यक्तीला, अधिकाऱ्याला किंवा कोणत्याही प्राधिकाऱ्याला लेखी निदेश देता येतील आणि अशी व्यक्ती, अधिकारी किंवा प्राधिकारी अशा निदेशांचे[2] अनुपालन करण्यास बांधलेली राहील.

---

१. या अधिनियमाच्या कलम ५ द्वारे केंद्र सरकारकडे निहित असलेल्या शक्ती, केंद्र सरकार, आंध्र प्रदेश, आसाम, बिहार, गुजरात, हरयाणा, हिमाचल प्रदेश, कर्नाटक, केरळ, मध्यप्रदेश, मिझोराम, ओरिसा, राजस्थान, सिक्कीम आणि तमिळनाडू या राज्य शासनांना प्रत्यायोजित करील, मात्र सार्वजनिक हिताच्या दृष्टीने अशी कृती करणे क्रमप्राप्त असल्याचे केंद्र सरकारचे मत असल्यास, केंद्र सरकारने शक्ती प्रत्यायोजित केलेल्या सर्व किंवा एखाद्या किंवा अधिक राज्य शासनांच्या बाबतीत असे प्रत्यायोजन रद्द करील किंवा या अधिनियमाच्या कलम ५ च्या उपबंधानुसार स्वत: त्यांचा अवलंब करील, अशी शर्त राहील, राजपत्र क्रमांक ५४, दिनांक १० फेब्रुवारी, १९८८ यात प्रसिद्ध झालेली त्याच दिनांकाची अधिसूचना क्रमांक एस. ओ. १५२ (ई) खालील राज्य शासनांना देखील या शक्ती उपरोक्त शर्तींच्या अधीनतेने प्रत्यायोजित करण्यात आल्या आहेत. मेघालय, पंजाब आणि उत्तर प्रदेश, पाहा- राजपत्र क्रमांक २०५, दिनांक १४ एप्रिल १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ३८१ (ई), दिनांक १४ एप्रिल, १९८८, महाराष्ट्र, पाहा- राजपत्र क्रमांक २५५, दिनांक १७ मे १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ४८८ (ई), दिनांक १५ मे, १९९८, गोवा व जम्मू आणि काश्मीर, पाहा राजपत्र क्रमांक ७४९, दिनांक २२ सप्टेंबर १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ८८१ (ई), दिनांक २२ सप्टेंबर १९८८.

पश्चिम बंगाल, मणीपूर, पाहा- राजपत्र क्रमांक ३१९, दिनांक ६ जून १९८९ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ४०८ (ई), दिनांक ६ जून १९८९ त्रिपुरा, पाहा- राजपत्र क्रमांक ४१४, दिनांक २५ जुलै १९९१ मध्ये प्रसिद्ध झालेली अधिसूचना क्रमांक एस. ओ. ७९ (ई), दिनांक २५ जुलै १९९१.

२. निदेश देण्यासाठी पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ४ पाहा.



**स्पष्टीकरण–** संशय निवारणासाठी, याद्वारे घोषित करण्यात येते की, या अधिनियमान्वये निदेश देण्याच्या अधिकारामध्ये पुढील निदेश देण्याच्या अधिकाराचा समावेश आहे:

(अ) कोणताही उद्योग, कार्यचालन, किंवा प्रक्रिया बंद करणे, त्यास मनाई करणे किंवा त्याचे नियमन करणे; किंवा

(ब) विजेचा किंवा पाण्याचा पुरवठा किंवा कोणतीही इतर सेवा रोखून ठेवणे किंवा तिचे नियमन करणे.

उद्योगधंद्यांचा विकास, नवनवीन उद्योगधंदे सुरू करणे ही जशी सामाजिक गरज आहे तशीच या गोष्टी करताना त्या गोष्टींमुळे त्याच्यामुळे निर्माण होणाऱ्या घातक पदार्थांची योग्य प्रकारे वासलात लावणे, त्यांचा परिणाम पर्यावरणावर आणि त्या परिसरातल्या लोकजीवनावर प्रतिकूलपणे होणार नाही याची काळजी घेणे हेही आवश्यकच नाही तर अपरिहार्य आहे. वाढत्या औद्योगिकीकरणामुळे जे औद्योगिक नि:सृतांचे साठे तयार होतात त्यांची काळजीपूर्वक वासलात लावणे हे कायद्याने बंधनकारक आहे. कारण असे न केल्यास विकासाबरोबरच समाजजीवनावर होणारा विपरीत परिणाम वाढत जाईल म्हणून या दोन्ही गोष्टींचा एकाच वेळी योग्य प्रकारे होणे आवश्यक आहे. यासाठीच्या सावधगिरीच्या उपाययोजना या विपरीत परिणामाच्या पूर्व अंदाजाने आधीच करणे अपेक्षित असते. तसे न झाल्यास त्या विरोधात तक्रार नोंदवता येते. मात्र, अशा तक्रारीला आधार असणेही तितकेच महत्त्वाचे आहे. **पाहा- एम. सी. मेहता वि. युनियन ऑफ इंडिया, एआयआर २००४ एससी ४०१६.**

सार्वजनिक हिताचे सुधारविषयक प्रकल्प हाती घेताना सरकारला त्या उद्योगाचे हित तसेच समाज जीवनाची सुरक्षा व आरोग्यपूर्णता, पर्यावरणाचा समतोल या सर्वच गोष्टींचा संतुलित अभ्यास करूनच उपाययोजना करावी लागते. याबाबतीत न्यायालयाची भूमिकाही समोर आलेल्या साधकबाधक बाबींचा काळजीपूर्वक विचार करणे आणि त्या अनुषंगाने मार्गदर्शन करणे इतक्याच मर्यादेपुरती सीमित असणे. **पाहा- डहाणू तालुका पर्यावरण संरक्षक गट वि. बॉम्बे सबर्बन इलेक्ट्रिसिटी सप्लाय कंपनी लिमिटेड (१९९१) २ एस.सी.सी. ५३९.**

## ६. पर्यावरणी प्रदूषणाच्या नियमनाकरिता नियम.

(१) केंद्र सरकार, कलम ३ मध्ये निर्देशिलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबींच्या संबंधात, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, नियम करू शकेल.

(१) विशेषत: आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध न आणता, अशा नियमांद्वारे पुढीलपैकी सर्व किंवा कोणत्याही बाबींकरता तरतुदी करता येतील, त्या बाबी अशा –

(अ) विविध क्षेत्रांकरिता आणि प्रयोजनांकरिता हवा, पाणी किंवा माती यांच्या



CamScanner

दर्जाची मानके[१];

(ब) विविध क्षेत्रांकरिता विविध पर्यावरणी प्रदूषकांच्या (आवाज धरून) संहतीच्या मान्य कमाल मर्यादा;

(क) जोखमीचे पदार्थ हाताळण्याची कार्यपद्धती आणि संरक्षण तरतुदी[२];

(ड) विविध क्षेत्रांमध्ये जोखमीचे पदार्थ हाताळण्यास मनाई आणि निर्बंध[३];

(ई) उद्योगांची ठिकाणे आणि प्रक्रिया पार पाडणे आणि कार्यचालन यांस विविध क्षेत्रांत असलेली मनाई आणि निर्बंध[४];

(फ) ज्या अपघातांमुळे पर्यावरणी प्रदूषण होण्याची शक्यता असेल अशा अपघातांना प्रतिबंध करण्याच्या आणि अशा अपघातांवरील सुधारात्मक उपाययोजनांकरिता तरतुदी करण्याच्या कार्यपद्धती आणि संरक्षण तरतुदी[५].

प्रकरण तीन

## पर्यावरणी प्रदूषणास प्रतिबंध, नियंत्रण आणि त्यांचा उपशम

**७. उद्योग, कार्यचालन इ. पार पाडणाऱ्या व्यक्तीने मानकांपेक्षा अधिक प्रमाणात पर्यावरणी प्रदूषकांचे उत्सर्जन किंवा निस्सारण न होऊ देणे.**

कोणताही उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया पार पाडणाऱ्या व्यक्तीने, घालून देण्यात येतील अशा मानकांपेक्षा अधिक प्रमाणात कोणत्याही पर्यावरणविषयक प्रदूषकांचे उत्सर्जन किंवा निस्सारण करता कामा नये किंवा त्यास परवानगी देता कामा नये[१].

**८. जोखमीचे पदार्थ हाताळणाऱ्या व्यक्तींनी कार्यपद्धतीगत संरक्षक तरतुदींचे अनुपालन करणे.**

घालून देण्यात येतील अशा कार्यपद्धतींना अनुसरून आणि अशा संरक्षक तरतुदींचे अनुपालन केल्यावर असेल त्या व्यतिरिक्त कोणत्याही व्यक्तीने जोखमीचे पदार्थ हाताळता कामा नये किंवा तसे हाताळले जाण्याची व्यवस्था करता कामा नये.[२]

**९. विवक्षित प्रकरणांना प्राधिकाऱ्यांना आणि अधिकारणांना अशी माहिती पुरविणे.**

(१) एखाद्या अपघातामुळे किंवा इतर अनपेक्षित कृतीमुळे किंवा घटनेमुळे कोणत्याही पर्यावरण प्रदूषकाचे विहित मानकांपेक्षा अधिक प्रमाणात निस्सारण घडून आले असेल किंवा घडून येण्याची आशंका असेल तेव्हा, अशा निस्सारणास जबाबदार असणारी व्यक्ती आणि ज्या ठिकाणी असे निस्सारण घडून आले किंवा घडून येण्याची आशंका असेल ते ठिकाण ताब्यात असणारी व्यक्ती अशा निस्सारणाच्या परिणामी होणाऱ्या पर्यावरणविषयक प्रदूषणास प्रतिबंध करण्यास किंवा ते सौम्य करण्यास बांधलेली राहील, आणि तो विहित करण्यात येतील अशा प्राधिकाऱ्यांना किंवा अभिकरणांना–

(अ) अशी घटना घडल्याची किंवा घडण्याची आशंका असल्याची वस्तुस्थितीसुद्धा तत्काळ कळवील; आणि

(ब) तसे फर्मविण्यात आल्यास, सर्व प्रकारे साहाय्य करण्यास बांधलेली राहील.[३]

(२) पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेल्या स्वरूपाची कोणतीही घटना घडल्याची वस्तुस्थिती किंवा तशी आशंका असल्याची माहिती त्या पोटकलमाखालील सूचनेद्वारे किंवा अन्यथा मिळाल्यानंतर, पोटकलम (१) मध्ये निर्देशिलेले प्राधिकारी किंवा अभिकरणे, शक्य होईल तितक्या लवकर, पर्यावरणविषयक प्रदूषणास प्रतिबंध करण्याची किंवा ते सौम्य करण्यासाठी आवश्यक असतील अशा सुधारात्मक उपाययोजना करण्यासाठी व्यवस्था करतील.

(३) पोटकलम (२) मध्ये निर्देशिलेल्या सुधारात्मक उपाययोजनांच्या संबंधात

---

१. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ३ आणि त्यातील अनुसूची पाहा.
(एक) अनुसूची एकमध्ये उद्योगधंदे, प्रक्रिया किंवा अन्य व्यवहार यातून निर्माण होणाऱ्या पर्यावरणी प्रदूषणात्मक उत्सर्जनाच्या किंवा निस्सारणाच्या मानकांची आणि त्यांच्या कमाल अनुज्ञेय संहितीकरणाच्या मर्यादांची यादी देण्यात आली आहे.
(दोन) अनुसूची दोनमध्ये उत्सर्जित पदार्थांच्या सर्वसाधारण मानकांची व त्याच्या संहितीकरणाच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांची यादी दिलेली आहे.
(तीन) अनुसूची तीनमध्ये भोवतालच्या हवेच्या दर्जाची ध्वनिप्रदूषणांच्या संदर्भातील मानके आणि त्याच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांची यादी दिलेली आहे.
(चार) अनुसूची चारमध्ये मोटार वाहनांपासून निघणारा धूर व बाष्प यांच्या उत्सर्जनाची मानके आणि त्यांच्या कमाल अनुज्ञेय मर्यादांची यादी दिलेली आहे;

२. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम, १३ आणि
(एक) धोकादायक टाकाऊ वस्तू (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९८९;
(दोन) धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण व आयात नियम, १९८९; आणि
(तीन) धोकादायक मायक्रोऑरगॅनिझम, जेनेटिकली-एन्जिनिअर्ड ऑरगॅनिझम किंवा सेल्स यांची निर्मिती, वापर, आयात, निर्यात व साठवण यांबाबतचे नियम पाहा.

३. वरील नियम १३.

४. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ५ पाहा.

५. पाहा. पर्यावरण (संरक्षण) नियमातील नियम १२ आणि अनुसूची दोन आणि धोकादायक टाकाऊ वस्तू (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण व आयात नियम व धोकादायक मायक्रोऑरगॅनिझम, जेनेटिकली एन्जिनिअर्ड ऑरगॅनिझम किंवा सेल्स यांची निर्मिती, वापर, आयात निर्यात व साठवण यांबाबतचे नियम.



१. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ३ आणि अनुसूची १ पाहा.

२. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ नियम १३, आणि
(एक) धोकादायक टाकाऊ (व्यवस्थापन व हाताळणी) नियम, १९८९;
(दोन) धोकादायक रसायनांची निर्मिती, साठवण व आयात नियम, १९८९; आणि
(तीन) धोकादायक मायक्रोऑरगॅनिझम, जेनेटिकली-एन्जिनिअर्ड ऑरगॅनिझम किंवा सेल्स यांची निर्मिती, वापर, आयात निर्यात व साठवण नियम पाहा.

३. प्राधिकरणे किंवा अभिकरणे यासाठी पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम १२ आणि अनुसूची दोन पाहा.



CamScanner

कोणत्याही प्राधिकाऱ्यास किंवा अभिकरणास काही खर्च करावा लागला असल्यास, तो खर्च, तसेच, खर्चाची मागणी करण्यात आल्यास त्या तारखेपासून तो खर्च चुकता केला जाण्याच्या तारखेपर्यंतचे व्याज (शासन आदेशाद्वारे निश्चित करील अशा, वाजवी दराने) जमीन महसुलाची किंवा शासकीय येणे रकमेची थकबाकी म्हणून, अशा प्राधिकाऱ्यास किंवा अभिकरणास संबंधित व्यक्तीकडून वसूल करता येईल.

**१०. प्रवेश करण्याचा आणि निरीक्षण करण्याचा अधिकार.**

(१) या कलमाच्या तरतुदीच्या अधीनतेने, केंद्र सरकारने या बाबतीत[१] शक्ती प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीला, तिला आवश्यक वाटेल अशा सहाय्यानिशी, कोणत्याही वाजवी वेळी पुढील प्रयोजनांसाठी कोणत्याही जागेत प्रवेश करण्याचा हक्क राहील–

(अ) केंद्र सरकारने तिच्याकडे सोपवलेल्या कामांपैकी काम पार पाडण्यासाठी;

(ब) अशा कामांपैकी कोणतीही कामे करावयाची असल्यास, ती कोणत्या पद्धतीने करावयाची अथवा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमाच्या तरतुदींचे किंवा या अधिनियमान्वये बजावलेल्या कोणत्याही नोटिशीचे, काढलेल्या आदेशाचे, दिलेल्या निदेशाचे किंवा मंजूर केलेल्या प्राधिकारपत्राचे अनुपालन करण्यात येत आहे किंवा कसे हे ठरविण्यासाठी;

(क) कोणतीही साधनसामग्री, औद्योगिक संयंत्र, अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज किंवा कोणतीही इतर महत्त्वाची वस्तू तपासण्यासाठी किंवा तिची चाचणी घेण्यासाठी किंवा हा अधिनियम किंवा त्याखाली केलेले नियम याखालील एखादा अपराध त्याठिकाणी करण्यात आला आहे किंवा करण्यात येत आहे किंवा करण्यात येणार आहे असे त्यास सकारण वाटत असेल अशा कोणत्याही इमारतीची झडती घेण्यासाठी आणि अशी कोणतीही साधनसामग्री, औद्योगिक संयंत्र, अभिलेख, नोंदवही, दस्तऐवज किंवा इतर महत्त्वाची वस्तू यामुळे हा अधिनियम किंवा त्याखालील केलेला नियम या अन्वये शिक्षापात्र असलेला एखादा अपराध करण्यात आल्याचा पुरावा मिळू शकेल किंवा पर्यावरणी प्रदूषणास प्रतिबंध करण्यासाठी किंवा ते सौम्य करण्यासाठी असे अभिग्रहण आवश्यक आहे, असे त्यास सकारण वाटत असेल तर, ते अभिग्रहण करण्यासाठी.

(२) कोणताही उद्योग, कार्यचालन किंवा प्रक्रिया चालवणारी किंवा कोणतेही जोखमीचे पदार्थ हाताळणारी प्रत्येक व्यक्ती, पोटकलम (१) अन्वये, त्या पोटकलमाखालील कामे पार पाडण्याकरिता, केंद्र सरकारने अधिकार प्रदान केलेल्या व्यक्तीला सर्व साहाय्य देण्यास बांधलेली राहील आणि कोणत्याही वाजवी कारणाशिवाय किंवा सबबीशिवाय

१. केंद्र सरकारने (इंग्रजी पृष्ठ २५१) वरील तक्त्यातील यादी दिलेल्या ६० व्यक्तींना शक्ती प्रदान केलेल्या आहेत, पाहा- भारताचे राजपत्र क्रमांक ६६, दिनांक १६ फेब्रुवारी १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ८३ (ई) आणि भारताचे राजपत्र क्रमांक ४२, दिनांक १८, जानेवारी १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६३ (ई).



तिने तसे करण्यास कसूर केली तर, ती या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(३) जर पोटकलम (१) अन्वये केंद्र सरकारने अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, तिची कामे पार पाडण्याच्या कामी कोणत्याही व्यक्तीने जाणूनबुजून विलंब लावला किंवा अडथळा केला तर, अशी व्यक्ती या अधिनियमाखालील अपराधाबद्दल दोषी ठरेल.

(४) फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे उपखंड किंवा काश्मीर राज्याच्या संबंधात किंवा ती संहिता जेथे अमलात नाही अशा कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात, त्या राज्यात किंवा क्षेत्रात अमलात असलेल्या कोणत्याही तत्सम कायद्याच्या तरतुदी हे जसे, उक्त संहितेच्या कलम ९४ अन्वये किंवा, प्रकरणपरत्वे, उक्त कायद्याच्या तत्सम तरतुदीन्वये काढलेल्या वॉरंटाच्या प्राधिकाराअन्वये घेण्यात आलेल्या कोणत्याही झडतीस किंवा केलेल्या अभिग्रहणास लागू होतात, तसे ते या कलमाखालील कोणत्याही झडतीस किंवा अभिग्रहणास, शक्य होईल तितपत, लागू होतील.

**११. नमुना घेण्याचा अधिकार व त्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती :**

(१) केंद्र सरकारला किंवा त्याने या बाबतीत अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याला[१] विहित करण्यात येतील अशा रीतीने विश्लेषणासाठी कोणत्याही कारखान्यातून, जागेतून किंवा इतर ठिकाणाहून तेथील हवेचे, पाण्याचे, मातीचे किंवा इतर पदार्थांचे नमुने घेण्याचा अधिकार असेल.[२]

(२) पोटकलम (१) अन्वये घेतलेल्या नमुन्याच्या विश्लेषणाचा निष्कर्ष हा, पोटकलमे (३) आणि (४) यांच्या तरतुदींचे अनुपालन करण्यात आल्याशिवाय, कोणत्याही वैध कार्यवाहीमध्ये पुरावा म्हणून ग्राह्य होणार नाही.

(३) पोटकलम (४) च्या तरतुदींच्या अधीनतेने पोटकलम (१) अन्वये नमुना घेणारी व्यक्ती–

(अ) त्याचे अशा प्रकारे विश्लेषण करून घेण्याचा आपला हेतू असल्याबद्दल भोगवटादारावर किंवा त्याच्या अभिकर्त्यावर किंवा त्या जागेच्या प्रभारी व्यक्तीवर विहित करण्यात येईल अशा नमुन्यात, तेथल्या तेथे, एक नोटीस बजावील.

(ब) भोगवटादाराच्या किंवा त्यांच्या अभिकर्त्यांच्या किंवा व्यक्तीच्या समक्ष

१. केंद्र सरकारने कलम ११ च्या पोटकलम (एक) अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून (इंग्रजी पृष्ठ २५४) वरील तक्त्यातील यादीमधील ६० अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान केलेल्या आहेत; पाहा- भारताचे राजपत्र क्रमांक ६६, दिनांक १६ फेब्रुवारी, १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ८४ (ई) आणि भारताचे राजपत्र क्रमांक ४२, दिनांक १८, जानेवारी, १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६२ (ई).

२. नमुना घेण्याविषयीच्या कार्यपद्धतीसाठी पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ६ देखील पाहा.



CamScanner

विश्लेषणाकरिता नमुना घेईल.

(क) नमुना एक वा अनेक पात्रांमध्ये ठेवला जाण्याची व्यवस्था करील व ती पात्रे चिन्हांकित करून मुद्रांकित करण्यात येतील आणि नमुना घेणारी व्यक्ती आणि भोगवटादार किंवा त्यांचा अभिकर्ता किंवा व्यक्ती हे दोघेही त्यावर सह्या करतील.

(ड) ते पात्र किंवा पात्रे विलंब न लावता, कलम १२ अन्वये केंद्र सरकारने स्थापन केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेकडे पाठवील.

(४) जेव्हा पोटकलम (१) अन्वये, विश्लेषणासाठी नमुना घेण्यात आला असेल, आणि नमुना घेणाऱ्या व्यक्तीने भोगवटादारावर किंवा त्याच्या अभिकर्त्यावर किंवा व्यक्तीवर पोटकलम (३) च्या खंड (अ) अन्वये नोटीस बजावली असेल, तेव्हा-

(अ) भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यक्ती जाणूनबुजून गैरहजर राहील अशा प्रकरणी, नमुना घेणारी व्यक्ती विश्लेषणाकरता नमुना घेऊन तो एका वा अनेक पात्रात ठेवील आणि ती पात्रे चिन्हांकित आणि मुद्रांकित करण्यात येतील आणि नमुना घेणारी व्यक्ती त्यावर सहीदेखील करील. आणि

(ब) भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यक्ती नमुना घेण्याच्या वेळेस हजर असेल, परंतु पोटकलम (३) च्या खंड (क) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे नमुन्यात चिन्हांकित व मुद्रांकित पात्रावर किंवा सही करण्यास त्याने नकार दिला असेल अशा प्रकरणी नमुना घेणारी व्यक्ती चिन्हांकित व मुद्रांकित पात्रावर किंवा पात्रांवर सही करील आणि नमुना घेणारा व्यक्ती विलंब न लावता ते पात्र किंवा पात्रे कलम १२ अन्वये स्थापन केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठवील आणि अशी व्यक्ती कलम १३ अन्वये नियुक्त केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या शासकीय विश्लेषकाला, भोगवटादार किंवा त्याचा अभिकर्ता किंवा व्यक्ती जाणूनबुजून गैरहजर राहिल्याबद्दल किंवा[१], प्रकरणपरत्वे, पात्रावर किंवा पात्रांवर सही करण्यास तिने नकार दिल्याबद्दल लेखी कळवील.

## १२. पर्यावरण प्रयोगशाळा.

केंद्र सरकारला,[२] **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे-

(अ) एक किंवा अधिक पर्यावरण प्रयोगशाळा स्थापन करता येतील.

१. केंद्र सरकारने कलम ११ च्या पोटकलम (एक) अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या शक्तींचा वापर करून (इंग्रजी पृष्ठ २५४) वरील तक्त्यातील यादीमधील ६० अधिकाऱ्यांना शक्ती प्रदान केलेल्या आहेत; पहा- **भारताचे राजपत्र** क्रमांक ६६, दिनांक १६ फेब्रुवारी, १९८७ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ८४ (ई) आणि **भारताचे राजपत्र** क्रमांक ४२, दिनांक १८ जानेवारी १९८८ मध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश ६२ (ई).

२. केंद्र सरकारने या अधिनियमाच्या कलम १२ याचे पोटकलम (एक) खंड (ब) आणि कलम १३ यांखालील आपल्या शक्ती केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रत्यायोजित केल्या आहेत. पहा- राजपत्र क्रमांक १२८, दिनांक २७ फेब्रुवारी १९६९ यामध्ये प्रसिद्ध झालेला स्थायी आदेश १४५.



(ब) या अधिनियमान्वये एखाद्या पर्यावरणविषयक प्रयोगशाळेकडे सोपवावयाची कामे पार पाडण्यासाठी एक किंवा अधिक प्रयोगशाळांना किंवा संस्थांना पर्यावरणविषयक प्रयोगशाळा म्हणून मान्यता देता येईल.[१]

(२) केंद्र सरकार, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे पुढील गोष्टी विनिर्दिष्ट करणारे नियम करू शकेल-

(अ) पर्यावरणी प्रयोगशाळेची कार्ये;[२]

(ब) उक्त प्रयोगशाळेला विश्लेषणासाठी किंवा चाचण्यांसाठी हवेचे, पाण्याचे, मातीचे किंवा इतर पदार्थांचे नमुने सादर करण्याची, प्रयोगशाळेच्या त्यावरील अहवालाचा नमुना आणि अशा अहवालासाठी प्रदेय असलेली फी;[३]

(क) उक्त प्रयोगशाळेला आपली कामे पार पाडणे शक्य होण्यासाठी आवश्यक व समयोचित असतील अशा इतर बाबी.

## १३. शासकीय विश्लेषक.

केंद्र सरकार कलम १२ च्या पोटकलम (१) अन्वये स्थापन केलेल्या किंवा मान्यता दिलेल्या कोणत्याही पर्यावरण प्रयोगशाळेकडे विश्लेषणासाठी पाठवण्यात आलेल्या हवेच्या, पाण्याच्या, मातीच्या किंवा इतर पदार्थांच्या नमुन्यांचे विश्लेषण करण्याच्या प्रयोजनार्थ, त्यास योग्य वाटतील अशा विहित अर्हता[४] धारण करणाऱ्या व्यक्तींना शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे "शासकीय विश्लेषक" म्हणून नियुक्त करू शकेल किंवा मान्यता देऊ शकेल.

## १४. शासकीय विश्लेषकांचे अहवाल.

जो दस्तऐवज, शासकीय विश्लेषकाने स्वाक्षरित केलेला अहवाल असल्याचा दिसतो असा कोणताही दस्तऐवज त्यात नमूद केलेल्या तथ्यांचा पुरावा म्हणून या अधिनियमाखालील कोणत्याही कार्यवाहीत वापरता येईल.

## १५. या अधिनियमाच्या तरतुदी आणि नियम, आदेश आणि निदेश यांच्या उल्लंघनाबद्दल शास्ती.

(१) जो कोणी या अधिनियमाच्या तरतुदींचे किंवा त्याखाली केलेल्या नियमांचे किंवा काढलेल्या आदेशांचे किंवा दिलेल्या निदेशांचे अनुपालन करण्यात कसूर करील किंवा त्यांचे उल्लंघन करील त्यास अशा प्रत्येक कसुरीबद्दल किंवा उल्लंघनाबद्दल पाच वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा एक लाख रुपयांपर्यंत असू

१. पर्यावरण प्रयोगशाळा म्हणून मान्यताप्राप्त प्रयोगशाळा/संस्था व शासकीय विश्लेषक म्हणून मान्यताप्राप्त व्यक्ती यांची यादी इंग्रजी पृष्ठ २२३ वरील तक्त्यामध्ये देण्यात आलेली आहे.

२. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ९ पहा.

३. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम ८ पहा.

४. शासकीय विश्लेषकांच्या अर्हतेसाठी पहा. पर्यावरण (संरक्षण) नियम, १९८६ चा नियम १०.



CS CamScanner

CamScanner